# श्रीमत् देवी भागवत



**खंड तिसरा**

(प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांनी
श्री देवी भागवतावर केलेले निरुपण)

**सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन**

प्रकाशन दिवस
**गुरुद्वादशी**
१८ ऑक्टोबर २००६

मुद्रक
**ग्राफिक प्रिंटर्स**
वझिरा नाका, बोरिवली (पश्चिम),
मुंबई - ४०० ०९१.
दूरध्वनी क्र. २८९९ ९३३०, २८९९ ९२३९, ९३२२८४०८४६

प्रकाशक
**श्री भगवती प्रकाशन**
६/१, साईविहार, कर्वेनगर,
पुणे - ४११ ०५२

मुल्य : २५ रु.

आजपासून देवीचा नवरात्रोत्सव चालू झाला आहे. देवीची नित्य उपासना करणारीही मंडळी आहेत. कुलदेवीही प्रत्येकालाच आहे. निदान या नवरात्रामध्ये कांही उपासना मनापासून करता आली तर करावी. हा उद्देश व्यास महर्षींनी सांगितला आहे. आणि त्या प्रसंगाने त्यांनी जनमेजयन राजाला सोमवंशात आणि सूर्यवंशात जन्माला आलेल्या मोठ्या मोठ्या देवी भक्त राजांची चरित्रे मुद्दाम सांगितली आहेत. त्यांच्याकडे दिव्य प्रज्ञा आणि योगसामर्थ्य होते. भूत, वर्तमान आणि भविष्यकालात घडलेल्या, घडणाऱ्या घटनांचे, त्यांना योगसामर्थ्याने, सर्व ज्ञान होत असे. त्यामुळे या मोठ्या मोठ्या राजे लोकांची चरित्रे आपल्याला समजतात. धर्माचरण आणि योगाभ्यासाचे हे फल आहे.

**पतंजल महर्षींनी प्रत्येक योगांगाचे फल सांगत असताना सत्य पालनाचे फल सांगितले आहे. जे जे सत्य कर्म आपल्याकडून घडते त्याचे निश्चित फल मिळते. त्याप्रमाणे सत्याची प्रतिष्ठा झाली तर त्याचे फल मिळते. शरीराने, वाणीने, मनाने सत्यनिष्ठ राहाणे म्हणजे मनानेच मनाचा निग्रह करणे इकडे लक्ष पाहिजे. मनामध्येसुद्धा असत्य येऊन उपयोग नाही. मनाच्या निग्रहाने वाणीचा निग्रह शक्य आहे. त्याच प्रमाणे शरीराचा निग्रह.** तर असे योगांगाचे फल महर्षींनी सांगून ठेवले आहे. संपूर्ण वेदाभ्यास ज्यांचा झाला, समाधीअवस्था ज्यांना प्राप्त झाली आणि त्या समाधी अवस्थेमधून राहून परमेश्वराचे चरित्र त्यांनी जाणले आहे.

**श्रीमत भागवत म्हणून जो प्रसिद्ध ग्रंथ आहे त्याचेही कर्ते व्यास आहेत.** नारदांनी हा मार्ग त्यांना सांगितला. भगवंताचे गुण तुम्ही लोकांपुढे मांडा. नारदांचे लोकसंग्रह हे उद्दिष्ट आहे. लोकांची वाममार्गाकडे जी नैसर्गिक प्रवृत्ती आहे, ती बंद झाली पाहिजे. अनंत वासना मनात आहेत. त्या वासनांप्रमाणे चांगले वाईट विचार मनात असतात.

**अधर्म धर्ममिति या मन्यते तमसावृता।**
**सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धीः सा पार्थ तामसी ।।८.३२।।**

म्हणतात भगवान्. **बुद्धी आहे पण त्या बुद्धीने काय समजावून घ्यायचे ? ज्ञान संपादन करणे हेच बुद्धीचे कार्य आहे. त्या बुद्धीमध्ये जर तमोगुण अधिक वाढला तर काय होते ते भगवान् सांगताहेत. ती बुद्धी मग अधर्मालाच धर्म समजते. अविवेक निर्माण होतो. विपरित सर्व भासते.**

भगवान् शंकराचार्य महाराजांनी ''विवेकचूडामणि'' नांवाचा ग्रंथ लिहीला आहे. अशा मोठ्या मोठ्या महात्म्यांच्या मनांत लोकांचे कल्याण व्हावे हाच उद्देश असतो. त्यांची बुद्धी चांगली व्हावी. **बुद्धी चांगली झाल्यावर पुढे मग सगळंच चांगलं होतं. अधर्मालाच जर धर्म समजू लागली बुद्धी आणि तसेच आचरण जर शेवटपर्यंत राहिले तर या अविवेकाचे किती फल त्या मानवाला भागावे लागेल!**

विवेकचूडामणिमध्ये आचार्यांनी मानव जन्म दुर्लभ कां आहे हे ही सुचिवलेले आहे. **विवेक हे मोठे साधन आहे. प्रपंचामध्येही विवेक पाहिजे आणि परमार्थामध्ये तर पाहिजेच पाहिजे. एखाद्याकडे पैसा पुष्कळ असेल, सत्ता असेल, मानसन्मान असेल पण विवेक जर नसेल तर त्याला स्वत:लाही शांती नाही आणि मग तो इतरांना शांती, समाधान काय देऊ शकणार?**

तर योगाभ्यासाने मनाचा निग्रह करुन विवेकसंपन्न झालेल्यांपैकी व्यास महर्षी एक आहेत. अनेक महर्षी झालेले आहेत. लोकसंग्रह करून लोकांची बुद्धी शुद्ध करणे हा उद्देश त्यांच्या समोर आहे. म्हणून व्यास महर्षींनी राजाला राजांची चरित्रे सांगितली. जनमेजय राजाने त्यांचा मोठा मानसन्मान केला होता. म्हणून व्यास महर्षी सांगत होते किंवा लिहीत होते असे नाही. **जिज्ञासू पाहिजे. जे रहस्य त्यांना समजलंय ते घेणारा कोणी आहे का? याचे ते वाट पाहताहेत. अधिकारी जो असेल त्याला ज्ञान द्यायचं. वाट्टेल त्याला सांगून उपयोग काय? तामसी बुद्धीच्या माणसाला सांगून काय उपयोग? त्याला सगळे विरुद्धच वाटणार. त्या ज्ञानाबद्दल त्याला काही आस्था राहणार नाही.**

जनमेजय राजा परीक्षित राजाचा मुलगा. आणि प्रसंगाने हे देवी चरित्र सांगायला व्यास महर्षींनी आरंभ केलेला आहे. दुर्गादेवीचे चरित्र आत्तापर्यंत त्यांनी सांगितले. शताक्षी, दुर्गा, शाकंबरी अशी तिची नावे आहेत. दुर्गम दैत्याने तपश्चर्या करून ब्रह्मदेवांना संतुष्ट करून घेतले. स्वार्थाकरता तरी देवाचे नाव घ्यावे ना! असूर मंडळी या दृष्टीने विश्वास ठेवणारी आहेत असे म्हणायला हरकत नाही. स्वत:ची इच्छा पूर्ण व्हावी. सर्वाधिकार पाहिजेत. त्याकरता शास्त्रीय मार्गाचे अवलंबन करणं, तपश्चर्या करणं, वगैरे त्यांना मान्य आहे. शरीर, मन, यांचा निग्रह करणे, तप करणे म्हणजे एक प्रकारे त्रासच आहे ना!

ब्रह्मदेवांना जगन्नियामक, सृष्टी उत्पन्न करणारी शक्ती असे म्हणतात. या सत्यलोकाधिष्ठित असलेल्या ब्रह्मदेवांना तप करुन, शरीराला कष्ट देऊन प्रसन्न करुन द्यायचे आणि आपली इच्छा त्यांच्यापुढे मांडायची. इच्छा फलद्रूप होईल एवढी तपश्चर्या करून त्यांच्यासमोर

मांडायची. नाहीतर ब्रह्मदेवांचे दर्शन होईल कसे ? त्याकरता शास्त्राने सांगितल्याप्रमाणे कष्ट करून, तपश्चर्या करून त्या दुर्गम दैत्याने ब्रह्मदेवांना प्रसन्न करून घेतले आणि सर्व वेदज्ञान त्याला मिळावे असा वर मागितला. चांगल्या कामाकरता मागितले तर हरकत नाही. ब्रह्मदेव काय देण्याला तयार आहेत. **ज्ञान जर ईश्वराच्या प्रसादाने मिळाले तर त्या ज्ञानाचा बुद्धीवर उत्तम परिणाम होतो.** पण या दैत्यांची तपश्चर्या करताना - अव्यवस्था निर्माण करायची आहे. आपल्या इच्छेने, आपल्या सत्तेने तसे घडवून आणायचे. विवेक नाहीये. वेदाध्ययन करणाऱ्या विप्रांचे सर्व वेदज्ञान याच्याकडे आलेले आहे. त्यांना वेदज्ञानाची विस्मृती झाली. कर्मज्ञान राहीलं नाही त्यामुळे कर्म बंद झाली. यज्ञयागादिक कर्मयोगच बंद पडला. अशी सगळीकडे स्थिती झाली. मग सर्वांनी जगदम्बेची प्रार्थना केल्यामुळे तो अवतार झालेला आहे.

कर्म नाही म्हणजे धनधान्य नाही. सर्वांना कष्ट व्हायला लागले. अन्न नाही, पाणी नाही. अशा परिस्थितीत जगदम्बेने त्या दुर्गमासुराचा नाश करून पुन्हा सर्व व्यवस्था पहिल्याप्रमाणे निर्माण केली. धान्य तयार झाले. विप्रांना वेदज्ञान परत मिळाले. विप्र, ऋषीमंडळी, आपापल्या आश्रमाच्या भोवती धान्य पिकवून त्यावर उपजिविका करून सगुणाचे, निर्गुणाचे, परब्रह्माचे चिंतन करीत कालक्रमणा करीत. हे कार्य करणाऱ्या मंडळींचेही ज्ञान काढून घ्यावे अशी वासना असणारा दुर्गमासुर निर्माण झालाच त्यावेळेला. ब्रह्मदेवांनाही वर द्यावा लागला ना! अधिकाऱ्याचा पक्षपातीपणा दिसून येऊ नये. या दैत्याला आपण जर वर दिला तर देवांचे काय होईल ? ब्राह्मणांचे काय होईल ? त्यांची सगळी कर्म बंद पडतील वगैरे ब्रह्मदेवांना काय समजले नाही काय ? तुला हे देता येत नाही असे सांगू शकत नाही. तो दैत्य जो वर मागायला उभा राहिला, तो योग्यता मिळवूनच उभा राहिलाय. ब्रह्मदेव काय नाही म्हणतील! हात पसरून जायचे नाहीये. तशी योग्यता मिळवूनच तो आलेला आहे. त्यामुळे त्याला वर द्यावा लागला.

हे चरित्र सांगून झाले आणि राजा आता काय विचारतो आहे ? व्यास पाहतायत. आणखी कुठल्या राजाचे चरित्र सांगा असे म्हणणार की काय ? व्यास महर्षी म्हणाले, ''राजांची चरित्रे ऐकणे हे मुख्य नाही बाबा!, ज्या जगदम्बेच्या कृपेने राजे लोक श्रेष्ठ ठरले. त्या जगदम्बेकडे मुख्य लक्ष पाहिजे.'' पण हे नुसते सांगून कसे होणार ? नैसर्गिक बुद्धी अशी पाहिजे की आपण जगदम्बेचे चरित्र ऐकावे. त्या जगदम्बेची ज्ञानशक्ती किती आहे! क्रियाशक्ती किती आहे! नियामक शक्ती किती आहे! हे समजून घेऊन आपलं मन तिच्याकडे लागावं, हा मुख्य उद्देश आहे.

श्री गणेशदत्तगुरुभ्योनम;

# श्रीमत् देवी भागवत

## (खंड तिसरा)

(प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांनी
श्री देवी भागवतावर केलेले निरुपण)

आचार्य महाराजांनी विवेकचुडामणी या ग्रंथाच्या सुरुवातीच्या श्लोकात एक महत्वाची सुचना केली आहे.

**दुर्लभं त्रयमेवैतद् देवानुग्रह हेतुकम्।**
**मनुष्यत्वम् मुमुक्षत्वम् महापुरुषसंश्रय।।**

या तीन गोष्टी जगामध्ये दुर्लभ आहेत असे आचार्य महाराज सांगताहेत. आचार्य महाराज पूर्ण विवेकसंपन्न आहेत. विवेक करूनच त्यांनी पुढे मांडला आहे. हे ही बरंय, ते ही बरंय. हा ही पक्ष चांगला आहे, तो ही पक्ष चांगला आहे. यात काय अर्थ आहे ? निश्यचात्मक बुद्धी नसेल तर काय उपयोग आहे ? आमची बुद्धी अनिश्चित आहे. मनाचाच व्यापार अधिक आहे. बुद्धीचा व्यापार कमी आहे. त्यामुळे निश्चय करायचे कधी माहीतच नाही. 'गतानुगतिको लोका:।' या म्हणण्याप्रमाणे स्थिती होणार.

पण पूर्ण विवेक ज्यांच्या मनामध्ये आहे, त्यांना योग्य काय ? अयोग्य काय ? दुर्लभ काय ? आपण काय मिळवलं ? काय मिळवलं पाहिजे ? याचा विचार आहे. मनुष्यत्व हे त्यांनी पहिले दुर्लभ सांगितले आहे. आपल्याला मिळालेले आहे, त्यामुळे त्याच्याबद्दल आठवणही नाहीये. सर्व जन्मांमध्ये मनुष्यजन्म अत्यंत दुर्लभ आहे. जन्ममरण परंपरा ही अखंड चालू आहे. कर्माचं फल आहे; शास्त्रज्ञ सांगताहेत. केलेल्या कर्माचे फळ भोगण्याकरता जीवाला कोणत्या तरी शरीराचा आधार घ्यावा लागतो. त्याशिवाय सुखदु:ख भोगणार कसे ? सुखदु:ख भोगण्याचे स्थान म्हणजे जी शरीरं आहेत. ती अनेक आहेत. ८४,००,००० योनी आहेत म्हणतात. शास्त्रज्ञांनी कशी गणना केली ? त्याबद्दल कसे ज्ञान मिळवले ? सांगणे कठीण आहे. आपण अंदाजाने काम करतो. लोकसंख्या किती ? हे आपण अंदाजाने ठरीवतो. सुख किंवा दु:ख भोगण्याकरता जी अनंत शरीरं आहेत, त्यापैकी श्रेष्ठ शरीर कोणचे ? आचार्य महाराजांनी 'मनुष्यत्वं' म्हटलेले आहे. ते म्हणतात, ''मनुष्य शरीर अत्यंत दुर्लभ आहे.'' ते मिळवायचे म्हणजे कठीण आहे. मी अमुक शरीर मिळवीन असा कोणाला आग्रह धरता येत नाही. कर्माप्रमाणे फलाचा उपयोग घेण्याकरता ब्रह्मदेव त्या जीवाला तसे शरीर देतात. तो निर्णय घेण्याची शक्ती आपल्याजवळ नाही. एखादा महात्मा असेल तसा. तोही आपल्या इच्छा शक्तीच्या प्रभावाने मनुष्यजन्म प्राप्त करून घेतो. देह सोडायचा नाही म्हणतात.

सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज पत्नीला घेऊन गंगाखेडला गेले. तिथे पत्नी प्लेगमध्ये गेली. आणि चौथ्या पाचव्या दिवशी यमधर्म आले. ''तुम्हालाही आम्ही घेऊन जाणार!'' म्हणाले. महाराज म्हणाले, ''मी येणार नाही. मला अजून संन्यास घ्यायचाय.

देवाची उपासना करायची आहे.'' शरीर घेऊन जाण्याकरता साक्षात यमधर्म आले असताना जे निक्षून सांगू शकतात, असेही महात्मे जगात आहेत. ''नाही !, येणार नाही !'', म्हणाले. ''अशौचामध्ये माझा देहांत कसा होईल ? म्हणजे आपल्या पुण्याबद्दल एवढा विश्वास मनामध्ये आहे.'' इतकी बुद्धी निश्चयात्मक आहे. त्यांना सहाय्य करणारा परमात्मा आहे. त्यामुळे त्यांनी यमालासुद्धा ''नाही !'' सांगितले. ''काळ बदला तुम्ही. तुमच्या सोयीप्रमाणे मी येणार नाही.'' असे थोडे महात्मे आहेत.

तर, मनुष्यजन्म जो आहे, हा अत्यंत विवेक संपन्न आहे. **आपल्याला विवेक संपादन करता येतो. वाढीवता येतो; आणि त्या विवेकाच्या बळावर पुढची सर्व साधनं जी आहेत, ती सगळी आपण प्राप्त करून घेऊ शकतो.** म्हणून आचार्य महाराज मनुष्यजन्म श्रेष्ठ म्हणतात. पण नुसतं मनुष्य शरीर मिळून काय उपयोग ? मुमुक्षुत्वं हे त्यांनी सांगितले आहे मुद्दाम. मुमुक्षा म्हणजे मोक्षाची इच्छा. मोक्ष म्हणजे काय ? मोक्ष म्हणजे दु:खाची पूर्ण निवृत्ती. सर्वही दु:ख पूर्ण जाणं याला मोक्ष म्हणतात. मोक्ष नकोय कोणाला ? मोक्ष शब्द असेल; संस्कृत भाषाच आता परिचयाची राहिली नाही. त्यामुळे असे शब्द ऐकले की वाटते आपल्याला, ''मोक्ष-बिक्ष काय करायचाय !'' तर त्याचा अर्थ दु:खाची कायमची निवृत्ती. हे नको कोणाला ? कोणाला ही इच्छा होणार नाही ? एकदा दु:ख गेल्यानंतर पुन्हा दु:ख येऊ नये. आजारी पडतो आपण. औषध घेतो. आरोग्य प्राप्त होते. कायमचे असे म्हणता येते का ? कायमची होणारी रोगनिवृत्ती, दु:खनिवृत्ती कुठेही पाहायला मिळत नाही. पण ते फळ आहे. ईश्वराच्या कृपेने प्रगट झालेले जे शास्त्र आहे, त्यात हे दाखविले आहे. आमच्या डोळ्यासमोर जेवढे आहे, तेवढेच समजायचे आणि त्याच्याकरताच प्रयत्न करीत राहायचे; दु:ख घालवायची; पुन्हा दु:ख यायची; ती घालविण्यासाठी पुन्हा प्रयत्न करायचा; याशिवाय पूर्ण दु:खनिवृत्ती अशी कल्पनाही आमच्या मनामध्ये नाहीये. ते फल पुढे मांडलेले आहे, शास्त्रकारांनी.

मोक्षाची इच्छा सर्वांनाच होणे साहजिक आहे. अत्यंत दु:खनिवृत्ती. दु:खाची पूर्णतया निवृत्ती होणे. दु:खही नाही आणि दु:खाची साधनेही नाहीत. रोगच होणार नाही, मग दु:ख कसले होणार ?

मोक्षाची इच्छा झाली पाहिजे. हे अतिशय कठीण आहे; अतिशय दुर्लभ आहे; मनुष्यजन्म चाललेला आहे. पण सर्व दु:खांचा अनुभव आम्ही घेतो आहोत. शारिरीक दु:ख आहेत; मानसिक दु:ख आहेत, वाचिक दु:ख आहेत, अध्यात्मिक दु:ख आहेत, अधिभौतिक दु:ख आहेत. अशा अनेक प्रकारच्या दु:खांचा अनुभव येत असताना सुद्धा ती दु:ख दूर

व्हावीत अशी इच्छा आम्हाला उत्पन्न होत नाही असे म्हणता येईल ? दु:ख भोगायची आणि दु:ख जावीत असे वाटणार नाही ? असे जर खरोखर वाटत असेल तर मग त्या दु:ख निवृत्तीच्या मार्गाकडे प्रवृत्ती का होत नाही ? तत्कालिक दु:ख निवृत्ती होणं, ते दु:ख घालवणं, त्याच्याकरता उपचार करणं, गेलं म्हणजे संपलं असं समजून घेणं, तसे समाधान मानणं म्हणजे दु:खनिवृत्ती नाही.

इंद्रादिक देव तपश्चर्या करुन स्वर्गलोकात जाऊन राहतात. त्यांना भरपूर आयुष्य आहे. स्वर्गामध्ये सुखसमृद्धी आहे. तिथे इच्छा करण्याबरोबर ते पदार्थ प्राप्त होतात. तिथं काही ठराव करायला नको, संप करायला नको, राजशासनाला घेराव घालायला नको, काही नाही. इच्छा झाली की पदार्थ तयार असे विशेष स्थान आहे ते. आणि यांचे पुण्यकर्म आहे. इतकी सगळी सुख-समृद्धी असताना दु:ख कायम आहे. देव स्वर्गात येऊन राहिले. पण त्यांचे प्रतिस्पर्धी दैत्य आहेत, त्यांचेही हे स्थान हिरावून घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. देवांचे स्थान आम्हाला राहायला का मिळू नये ? त्यांनीच तिथे का राहावे असे दैत्यांना वाटते. मग ते तपश्चर्या करतात. त्यांना शुक्राचार्यांसारखा मार्गदर्शन करणारा कोणीतरी महात्मा भेटतो आणि त्यामुळे दैत्यांचे देवाच्यावर आक्रमण होते. नेहमीच होते असे नाही. पण मनांत ती भीती आहे. अशांती, आणि त्यामुळे दु:ख असेल तर बाहेर सुख असून काय उपयोग आहे ?

ही मनाची स्थिती जाण्याकरता मुमुक्षा उत्पन्न व्हायला पाहिजे. मोक्ष पदार्थ हा समजला पाहिजे. पूर्ण सुख आहे, ज्यामध्ये दु:खाचा संबंध नाही हे समजले पाहिजे. आणि सर्वही दु:खाची निवृत्ती अशी एक भूमिका आहे. जीवात्म्याला ती प्राप्त करून घेता येणे शक्य आहे. अनेक शरीरे अनेक जन्म धारण केली असली तरीसुद्धा ती बुद्धी इतकी निश्चित झाली असली पाहिजे की शास्त्राने, महात्म्यांनी जे उपाय सांगितले आहेत त्याचे आचरण करायचे. सर्व दु:ख संपली पाहिजे. फल हे खरं आहे, हे निश्चित झाल्याशिवाय उपायांकडे प्रवृत्ती होत नाही. दु:खाची पूर्ण निवृत्ती मानवाला करून घेता येणे शक्य आहे. मानवजन्म मिळाल्यावर ही सगळी साधनं करता येतात. हा विचार मनामध्ये पक्का झाल्यानंतर त्या साधनांना आरंभ होतो.

आणि तिसरी दुर्लभ गोष्ट म्हणजे महापुरुष संश्रय: म्हणताहेत आचार्य महाराज. महापुरुष निराळा आणि नुसता पुरुष निराळा. पुरुष शब्दाचा अर्थ स्त्री असाही आहे. पुरुष आणि स्त्री शब्दांचा अर्थ मराठी भाषेत वेगळा असेल. शरीरामध्ये असणारा त्याला पुरुष म्हणायचे. शरीरामध्ये स्त्रीही आहे, आत्मा आहे तो, त्याला शरीर धारण करूनच सगळं कार्य करायचंय.

तर पुरुष शब्दाने विश्वातले सर्व जीवात्मे घेता येतात. पण महापुरुष हा काही निराळा आहे.

महापुरुषाने महत्व प्राप्त करून घेतले आहे. सर्व दु:खाची निवृत्ती त्याची झाली आहे. त्याने इतका आनंद मिळवला आहे, की त्यात कोणताही उणेपणा नाही. न्यूनता नाही. आनंद कमी आहे. आपलं सुख कमी आहे असं वाटल्यावर दु:खाला सुरुवात झाली. मला ५,००० रु. मिळतात आणि त्याला १०,००० रु. मिळतात. हा विचार समोर आला की संपले. पण ज्याला एक पैसाही मिळत नाही त्यापेक्षा हा ५,००० रु. मिळविणारा किती सुखी आहे! हे सुख असतानासुद्धा दुसऱ्यापेक्षा आपले सुख कमी आहे, या अविवेकाने दु:खात पडतो आहे. आशा, लोभ निर्माण होतो. जास्ती धन मिळीवलं पाहिजे अशी इच्छा उत्पन्न होते. हा मनाचा स्वभावच आहे. त्यासाठी मनाचा निग्रह कसा करावा? काय करावा? याचा विचार केला पाहिजे. मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह केला म्हणजे सगळी सुखं सोडून द्यायची असा त्याचा अर्थ नाही.

नवरात्र चालू आहे. पहाटे लवकर उठायचे आहे, देवाची पूजा लवकर करायची आहे. काय हो? कशाकरता इतक्या लवकर उठायचे? झोप घ्यावी असे वाटणे स्वाभाविक आहे. स्वभाव तसा बनून गेलाय. सवयच नाही ना! मनाच्या, इंद्रियांच्या निग्रहाचा उपयोग होतो.

त्या निग्रहामुळे मानसिक शक्तीचा विकास होऊ शकतो. मन किंवा बुद्धी याचीसुद्धा योग्य कल्पना आपल्याला नाहीये. शास्त्र श्रवण याकरता व्हायला पाहिजे. हे सगळे पदार्थ शास्त्रकारांनी आपल्यासमोर मांडून ठेवले आहेत. शरीर म्हणजे काय आहे? शरीरामध्ये किती पदार्थ आहेत? शरीराच्या अंतर्गत आणखी एक शरीर कोणचे आहे? सूक्ष्म शरीर ज्याला म्हणतात. ही इंद्रियं म्हणजे काय आहेत? मन म्हणजे काय आहे? बुद्धीतत्व म्हणजे काय आहे? हे सगळं शास्त्रज्ञ पुरुषांनी आपल्यासमोर मांडले आहे. मन कसे आहे? इंद्रिये कशी आहेत? हे प्रत्यक्ष त्यांना समजू शकते. ध्यान करणाऱ्या महात्म्यांनी ज्या वस्तूचे ध्यान करण्यास सुरुवात केली असेल, त्या वस्तूचा साक्षात्कार त्यांना होतो.

भागवतामध्ये एक कथा आहे. बाणासुराची कन्या उषा. तिला स्वप्नात प्रद्युम्नाचा मुलगा अनिरुद्ध भेटला. एकदम अदृश्य झाला. झोपेतून जागी होऊन ती रडायला लागली. बाणासुराच्या प्रधानाची मुलगी चित्रलेखा उषेची मैत्रीण होती. चित्रलेखा चित्रकलेत अत्यंत निष्णात व उत्तम योगाभ्यास केलेली होती. आपल्या मैत्रिणीला तिने विचारले, ''काय झाले?'' उषा म्हणाली, ''मदनासारखा एक सुंदर पुरुष मला आत्ता स्वप्नामध्ये दिसला आणि एकदम दिसेनासा झाला.'' चित्रलेखा म्हणाली, ''रडू नकोस! थांब!, माझ्या बाजूला

बैस!'' आणि तिने कागद पेन्सिल घेऊन चित्र काढायला सुरुवात केली. आता अनिरुद्ध द्वारकेमध्ये, ही आहे बाणासुराच्या अंत:पुरामध्ये. परंतु चित्रलेखाचे मन योगाभ्यासाने इतके तयार बनलेले आहे की तिने उषेने केलेल्या वर्णनाप्रमाणे अनिरुद्धाचे अचूक चित्र काढले. अनिरुद्ध म्हणजे म्हणून समजले नाहीये, समजून घ्यायचंय. देवांची, गंधर्वांची चित्रे काढून झाल्यावर मानवांची चित्रे काढायला सुरुवात केली. वासुदेव, राम, कृष्णांची चित्रे काढली. अगदी हुबेहुब चित्रं. ती पाहते आहे उषा. प्रद्युम्नाचे चित्र काढले आणि लगेच अनिरुद्धाचेही चित्र काढले. ते पाहिल्यावर उषेने सांगितले, ''हो!, यांचेच मला दर्शन झाले. पत्ता लागला.''

चित्रं काढायचं म्हणजे नुसतं वर्णन ऐकून किंवा समोर बसवून चित्र काढायचं नाहीये. योगाभ्यासाने त्या चित्रलेखाने आपल्या मानसिक शक्तीचा इतका विकास करून घेतला की ज्या व्यक्तीचे चित्र काढायचे मनामध्ये आल्याबरोबर ती व्यक्ती समोर आहे आणि बरोबर चित्र काढले. म्हणजे मनाचा त्या व्यक्तीशी संबंध होऊ शकतो. हा शक्तीचा विकास आहे.

आम्हाला बुद्धीवाद मान्य नाही असे नाही. शास्त्रकारांना, संत महात्म्यांना बुद्धीवाद मान्य आहे. त्यांना बुद्धीचे सामर्थ्य माहित आहे. प्रपंचामध्येही बुद्धीची श्रेष्ठता प्राप्त करून घेणारे महात्मे आहेत. **प्रपंच, संसार दिसत असतानासुद्धा तो बुद्धीच्या सहाय्यानं मनातून काढून टाकायचा. जगदंबेचे फक्त आनंदस्वरुप मनामध्ये ठेवायचे. बाकी मनांतला सबंध संसार काढून टाकायचा.** ही केवढी शक्ती आहे. बुद्धीची! तर बुद्धीशक्ती आपली वाढू शकते. म्हणून अगोदर फलाबद्दल विश्वास असला पाहिजे. ईश्वराच्या, जगदंबेच्या कृपेने सर्वही प्राप्त होऊ शकतं असा प्रथम विश्वास असल्यानंतर तसा प्रयत्न करण्याकडे प्रवृत्ती होणार. नाहीतर कशी होणार?

तर महापुरुष त्यांना का म्हणायचे? कारण आरंभापासून त्यांचा या मार्गावर विश्वास आहेच आहे. **आपली शक्ती अगदी कमी आहे, हे ही समजले पाहिजे.** आणि सर्वात मोठी शक्ती ईश्वराची आहे; जगदंबेची आहे; हे ही तितकंच पक्कं समजलं पाहिजे. आपल्या शक्तीवर फाजील विश्वास उपयोग नाही. आमची बुद्धी सगळं समजणारी आहे. समजून उपयोग काय? मानवाची शक्ती किती अपूर्ण आहे, याची कल्पना पाहिजे. कबूल केले पाहिजे. पूर्णता नाही आपल्याकडे. आणि अशी पूर्णता ज्यांच्याजवळ आहे, असे महात्मे आजही जगात आहेत. असे ईश्वररुप महात्मे आहेत, असाही विश्वास पाहिजे. म्हणजे मग त्या उपायांकडे प्रवृत्ती होणार.

अशी पूर्ण विकसित झाली पाहिजे. पूर्ण आनंद आपल्याला घेता आला पाहिजे. सर्व दु:ख

दूर करता आली पाहिजे. हे सगळे बुद्धीने करून घेता येते ना! अशी बुद्धी मिळविणं, हाच प्रयत्न आहे. त्या प्रयत्नाला सुरुवात पूर्ण विश्वास असल्याशिवाय होत नाही. महात्म्यांनी अनेक जन्म पुष्कळ प्रयत्न करून ईश्वराच्या, जगदंबेच्या, सद्गुरुंच्या कृपेने असा विश्वास मिळीवलेला असतो. त्यांचे आयुष्य काही एवढेच नाही. मानवाचे अनेक जन्म त्यांना प्राप्त करून घेता आलेले आहेत. आणि त्या त्या जन्मामध्ये तो प्रयत्न चालूच असतो. तो फुकट जात नाही की विसरत नाही. भगवान सांगतात, आधीच्या जन्मात केलेला प्रयत्न पुढच्या जन्मामध्ये पुढे सुरु होतो. अर्जुनाला जरी मागचा किंवा पुढचा जन्म माहीत नसला तरी भगवंतांना तो दिसतोय. तेव्हा आपण चालू केलेला प्रयत्न फुकट जात नाही. केलेले पाप किंवा पुण्यकर्म फुकट जात नाही. पुण्य केले तर त्याचेही फळ मिळणार, पाप केले तर त्याचेही फळ निश्चित मिळणार. ते फळ मिळाल्याशिवाय राहात नाही. त्यामुळे पुन्हा जन्म आला तरी तसेच संस्कार तशाच वासना घेऊन जन्माला आलेला तो जीवात्मा, पुन्हा त्याला कोणी ज्ञानी महात्म्याची संगती मिळते; त्यांच्याकडून मार्गदर्शन होते, आणि पुन्हा प्रयत्न सुरु होतो. हा काही अंधविश्वास नाही. जीवात्म्याचा प्रयत्न किती काळ चालला पाहिजे, हे ही शास्त्राने सांगितले आहे. तो चालू राहू शकतो. मृत्यू आला की सगळं संपलं असं नाही. देह आला म्हणजे आलं आणि देह गेला म्हणजे सगळं गेलं!; जात नाहिये.

ही शक्ती प्राप्त करून घेणाऱ्या महात्म्यांनी पूर्ण आनंद मिळीवलेला आहे. सच्चिदानंदघन भगवती आहे, तिची प्राप्ती त्यांना झाली आहे. 'अहम्' विसरून गेले आहेत. नुसता संसार विसरून चालणार नाही. 'अहम्' विसरणे मुख्य आहे. अहम् कायम राहिला आणि संसार विसरला असं होत नाही. तो अहम् मनात असतोच. शेवटी आनंद प्राप्त करून घेणारे महात्मे अहम् ही टाकून देतात. काही संबंध नाही. असंग आहेत. आत्मचैतन्य हे आनंदरूप, असंग आहे. कोणाचाही संबंध नाही. हा विवेक पूर्णपणे प्राप्त करून घेऊ शकतात आणि दुसऱ्यालाही विवेकसंपन्न बनिवतात आणि आपल्या बरोबर या मार्गावर घेऊन जातात. हे त्यांचे सामर्थ्य आहे ना!

नुसत्या राजशासनाचे कायदे करून जनतेची बुद्धी सुधारल्याचे उदाहरण नाहीये. वसिष्ठपुत्र शक्ती हे पराशर मुनीचे वडील. त्यांना एका राक्षसाने मारले. पराशर मुनींना अनावर दु:ख झाले. कोणीतरी येऊन त्यांची समजूत काढली; शोक आवरायला सांगितला. आपल्या पित्याच्या हत्येचा सूड म्हणून किती राक्षस मारणार ? काही तरी शिल्लक राहणारच. तसं आहे.

बुद्धीचा उपयोग कसा करायचा, कशासाठी करायचा हे सगळे समजावून सांगणारे महात्मे भेटले पाहिजेत. पण अशा महात्म्यांची भेट होणे फार कठीण आहे. महापुरुषसंश्रय फार

कठीण आहे. हे महत्व त्यांच्याजवळ आहे. दुसऱ्याची बुद्धी बरोबर ओळखणारे त्याच्या बुद्धीतले दोष जाणून ते कसे जाऊ शकतील हे बरोबर सांगू शकतात. भवरोगवैद्यच त्यांना म्हणतात. या संसारात येणारे जाणारे लोक पुष्कळ आहेत. त्यातही एखाद्या रोगाचा स्पेशल विषयाचा अभ्यास करणारेही पुष्कळ आहेत. त्यांचे जास्ती महत्व आपण मानतो. स्पेशल अभ्यास केलेल्या डॉक्टरकडे आपण जातो. पण हे ज्ञानी महात्मे तर भवरोगवैद्य आहेत. आपल्यासमोर आलेला जीवात्मा कोणचे कर्म घेऊन आलेला आहे, त्याचा भवरोग कसा घालवायचा याचे त्यांना पूर्ण ज्ञान असते. त्यांच्या दृष्टीने असाध्य रोग नाहीच आहे. 'आपणासारखे करिती तत्काल।' हे सामर्थ्य आहे, म्हणून त्यांना महापुरुष म्हणायचे. आम्ही सगळे पुरुष आहोत. शरीर घेऊन येणारे, शरीर सोडणारे असे आम्ही या जन्ममृत्यूच्या चक्रातच सापडलो आहोत.

महापुरुष शरीरापासून बाजूला होऊ शकतात. शरीराचा काही संबंध नाही. सगळी कर्म संपली. त्यामुळे पुन्हा शरीर धारण करण्याचे कारण नाही; पुनर्जन्म नाही. पुन्हा मृत्यू नाही, काही नाही. ही  तयारी करून ठेवली आहे. आणि आपली जशी योग्यता आहे, तशी योग्यता दुसऱ्यात निर्माण करु शकणारे म्हणून त्यांना महापुरुष म्हणायचे. अशा महात्म्यांचा संश्रय, संगती, कृपा असणे हे अतिशय दुर्लभ आहे, असे आचार्य महाराजांनी सांगून चौथी गोष्ट सुचीवलेली आहे. त्याचा विचार आता पुढे करावयाचा आहे.

मनुष्यजन्म मिळण्याकरता देवाचा अनुग्रह पाहिजे. मनुष्यजन्म मिळाल्यावर मोक्षाची इच्छा होण्याकरता देवाचा अनुग्रह पाहिजे. आणि महात्म्यांची भेट होण्याकरताही देवाचा अनुग्रह पाहिजे. म्हणजे चौथी गोष्ट आहे त्यात 'त्रयमेव दुर्लभम्' म्हणून गेले ते. म्हणून तीनच गोष्टी आपण विचारात घेतो. दुर्लभम् जरी म्हणाले असले तरी देवाच्या अनुग्रहाने प्राप्त होऊ शकते. त्या देवाचे स्वरूप काय आहे ? हा ही विचार करायचाय. ते समजावून सांगणारे महात्मे आहेत; व्यास महर्षीसारखे आहेत. व्यास महर्षींनी जनमेजय राजाला तोच उपदेश करायला आरंभ केला आहे.

**कायेन वाचा मनसेंद्रियेवा।**
**बुद्ध्यात्मनावा प्रकृती स्वभावात्।।**
**करोमि यद्यत् सकलं परस्मै।**
**नारायणायति समर्पयामि।।**

## दुसरा दिवस

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके।**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते।।**

जनमेजय राजा व्यास महर्षींच्या मुखातून देवीचं चरित्र श्रवण करतो आहे. राजाला राज्य करायचे आहे. पण एक भक्ती आहे. जगन्माता म्हणून एक कोणी मोठी शक्ती आहे असा विश्वास आहे. आणि ते चरित्र श्रवण करून ती कृपा जर आपल्याला मिळाली, तर आपलंही कल्याण होईल अशा समजूतीने राजा ऐकतो आहे.

भगवान् शंकराचार्य महाराजांनी पारमार्थिक दृष्टीने तीन गोष्टी महत्वाच्या म्हणून सांगितल्या आहेत. 'मनुष्यत्वं, मुमुक्षत्वं, महापुरुषसंश्रय:।।' मनुष्य शरीर प्राप्त होणं. मनुष्य शरीराशिवाय पारमार्थिक उन्नती साध्य होऊ शकत नाही. देवादिकांची शरीरे आहेत. पुण्यवान आहेत, देवही. सर्व सुखांची समृद्धी आहे. काही कमी नाही. परंतु शांती नाही, समाधान नाही, विवेक नाही. **भोगाची तृष्णा अधिकाधिक आहे. त्यामुळे ईश्वराची उपासना करावी, आत्मविचार करावा, अशी इच्छा होत नाही. कोण आहोत आपण? कुठून आलोत? कुठे जायचंय? अहम् कोण आहे? वगैरेंकडे लक्षं नाही.**

मनुष्यजन्मामध्ये हे शक्य आहे म्हणतात. मनुष्यांमध्येसुद्धा सर्वांनाच अशी इच्छा होते असे नाही. भगवान् सांगतात, "**हजारो मनुष्यांमध्ये एखादाच इकडे येणारा आहे.**" आपल्याला ज्याच्यामध्ये कोणतीही न्यूनता नाही असा परिपूर्ण आनंद मिळावा, सर्व दु:खाची निवृत्ती व्हावी, मोक्षसिद्धि व्हावी, अशी इच्छा होत नाही. देवादिकांच्यामध्ये जास्त समृद्धी असल्यामुळे जास्त भोगांची इच्छा आहे. मानवांच्यामध्ये तशी स्थिती नाहीये. तरीसुद्धा दुसऱ्या वासना निर्माण होतोहेत. पण एक संभवनीय आहे. मनुष्यजन्मामध्येच शक्य आहे. मनुष्यजन्मामध्ये मोक्षाची इच्छा झाली, आणि महापुरुषांची संगती घडली, तर सर्वही कल्याण होऊन जाते. देवादिकांच्या जन्मामध्ये महापुरुषांची गाठ पडली तरी बुद्धी चांगली राहत नाही. देवसभेचे सुधर्मासभा म्हणून नाव आहे. मोठी सभा आहे. कितीतरी देव, ऋषी वगैरे मंडळी त्यात बसू शकतात. सगळ्यांना सिंहासने आहेत. तहान, भूक तिथे लागत नाही म्हणतात. असं काही त्या स्थानाचे महत्व आहे. त्या सभेमध्ये देवेंद्र आपल्या सिंहासनावर बसला आहे; आणि जवळच त्याची पत्नी आहे. सर्वही देवमंडळी आपल्या आपल्या स्थानावर बसली आहेत. इतक्यात देवगुरु बृहस्पति दरवाजातून आत यायला लागले. सर्व देवमंडळी उठून उभी राहिली. आपले गुरुजी आहेत, मार्गदर्शक आहेत, हा आदरभाव त्यांच्या मनात आहे.

'आचार्य देवो भव।' देव दुसरा नाही म्हणतात, शास्त्रकार. 'मातृ देवो भव।', 'पितृ देवो भव।', 'आचार्य देवो भव।', 'अतिथी देवो भव।' अशी आमच्यासमोर असणारी कितीतरी देवांची रुपं त्यांनी (शास्त्रकारांनी) सांगितली आहेत.

आचार्य महाराज सभेमध्ये आल्यावर सर्व मंडळी उठून उभी राहिली. पण उठला नाही. परिचय आहे ना!, अति परिचयात अवज्ञा म्हणतात. 'अहंकार!' मी देवेंद्र आहे. देवगुरु असले म्हणून काय झाले? आमचे आश्रित आहेत. ही भावना आहे. आम्ही त्यांना ठेवून घेतलेले आहे. हा अहंकार चित्तामध्ये उत्पन्न झाल्यामुळे सर्व देवमंडळी उठून निघून गेली. आणि हा मात्र तसाच बसून राहिला. बृहस्पतींनी नुसतं पाहिलं पाठीमागे आणि निघून गेले. देवेंद्र असूनसुद्धा त्याला अहंकार झालेला आहे; असू दे! काही हरकत नाही. ते निघून गेल्यावर देवेंद्राला पश्चाताप झाला. बृहस्पतींच्या आश्रमात जाऊन चूक झाली, क्षमा मागतो वगैरे वगैरे म्हणाला, पण त्याला दर्शन मिळाले नाही. संगती मिळालेली आहे चांगली, पण त्या संगतीचा उपयोग करून घेणारी बुद्धी नाही. देवेंद्र झाला तरी नाही. त्यामुळे त्याचे राज्य गेले. शुक्राचार्यांच्या आश्रयाने दैत्यांनी त्याचा पराभव केला. असे हे नेहमीच चालू आहे.

त्यामुळे आचार्य महाराजांनी महापुरुष संश्रयाचे महत्व सांगितले आहे. अगदी पूर्णावस्थेला पोहोचलेले आहेत ते महापुरुष. कोणाचाही विकार त्यांच्या मनामध्ये नाही. सर्वांच्यामध्ये मुख्य म्हणजे अहंकार आहे. तो या महापुरुषांच्यात नाहीये. त्यांची सर्व ठिकाणी परमेश्वर भावना आहे. सच्चिदानंदघन जगन्माता भगवती सर्व ठिकाणी भरून आहे. त्यांना ही ज्ञानदृष्टी मिळालेली आहे. त्यांचे ऐकून त्याप्रमाणे वागणाऱ्याला ती ज्ञानदृष्टी प्राप्त होते. नुसती त्यानी दृष्टी देऊन काही उपयोग होत नाही.

विश्वरुप पाहण्याची इच्छा अर्जूनाला उत्पन्न झाली. संपूर्ण विश्व म्हणजे परमेश्वरस्वरूप आहे हे मला दाखवा अशी त्याने प्रार्थना केल्यावर भगवंतांनी त्याला तेवढ्यापुरती दिव्यदृष्टी दिली. आणि ते रूप पहायला लागल्यावर तो घाबरायला लागला. त्याच्या मनात भीती उत्पन्न झाली आणि मग आपण सांगायला लागला, ''नको! नको!, तुमचं आपलं पहिलंच रूप मला बरं वाटतं. चतुर्भुजरूप चांगलं आहे. म्हणजे पारमार्थिक दृष्टीने, ईश्वराचे रूप नुसते पाहूया म्हणून उपयोग नाही. दाखिवणारे आहेत. आपल्याच तोंडाने नको म्हणायची पाळी येईल. **महात्म्यांची कृपा त्यांच्या इच्छेने झाली पाहिजे. आपण आग्रह करून झालेली कृपा खरी ठरत नाही.**''

तर आचार्य महाराज म्हणतात, हा दुर्लभ मनुष्यजन्म मिळाला. आपली सर्व दु:ख दूर झाली पाहिजेत अशी तळमळ लागली पाहिजे. ही मोक्षाची इच्छा आहे आणि मार्गदर्शक अशाप्रकारे

महापुरुष भेटलेले आहेत. तर हे सांगत नाही. आचार्य महाराज सांगताहेत. ''देवानुग्रहहेतूकम।'' पण देवाचा जर अनुग्रह असेल, जगदंबेची कृपा असेल, तर या तिन्ही गोष्टी मिळतात. मनुष्य जन्म मिळतो, मोक्षाची इच्छा उत्पन्न होते आणि मार्गदर्शक महात्मे भेटतात. ते शोधतच असतात. शुक्राचार्य महाराज परीक्षित राजाला भागवत सांगण्याकरता निघालेले होते. परीक्षित राजाला काय माहिती की भागवत आता श्रवण करायचे की काय करायचे. सात दिवस आयुष्य उरले आहे. सातव्या दिवशी आपण जाणार. शरीर जाणार. पण तू जाणार म्हणजे कोण जाणार ? तू कोण आहेत ? हे सर्व समजावून सांगणारे त्याला भेटले. त्यामुळे स्वत: ते शुक्राचार्य महाराज आपण होऊन निघालेले आहेत. हे त्या राजाचे पुण्य आहे. देवाची कृपा आहे. 'देवानुग्रहहेतुकम्।' आणखी मध्ये देवमंडळी आली. शुक्राचार्य महाराज भागवताचे मोठे अधिकारी. भगवतभक्त आणि ज्ञानी आहेत. 'वासुदेव: सर्वम्।' हे समजलेले आहे त्यांना. म्हणून कुठेही मन गुंतलेले नाही. सर्वच वासुदेवरूप आहे. हा अनुकूल आहे आणि तो प्रतिकूल आहे, ही बुद्धीच नाहीये. सर्वच ईश्वररूप आहे. असे ज्ञानसंपन्न महर्षी त्या परीक्षित राजाला भागवत सांगणार आहेत. तो मोठ्या संकटात आहे. हे समजल्यामुळे देवमंडळींनी त्यांची वाटेत भेट घेतली. नमस्कार केला.

त्यांनी प्रार्थना केली, ''आचार्य महाराज!'', आम्हाला भागवत ऐकायची इच्छा आहे. आपण इथेच थांबा. आम्ही सगळी व्यवस्था करतो. आपण आम्हाला भागवत सांगा. परीक्षित राजाला आम्ही इथे बोलावून घेऊ. सातव्या दिवशी त्याचा नाश होणार आहे ना ! आम्ही स्वर्गलोकात राहणारे देव. आम्हाला रोज अमृत मिळते म्हणून आम्हाला अमर म्हणतात. परीक्षित राजाला बोलावून घेऊ. त्याला हे अमृत आपण देऊ. आम्हाला आपण भागवतरूपी अमृत द्या. त्याच्याबद्दल हे अमृत त्या राजाला देऊ.

भागवत म्हणजे काय आहे ? भगवंतांची चरित्रं अमृताप्रमाणे आहेत. अमृताने अमर होणे शक्य असेल तर देव अमर होतात का ? अमर याचा अर्थ मृत्यु नाही असा नाही. जास्ती काल आयुष्य आहे एवढाच त्याचा अर्थ आहे. 'क्षीणे पुण्ये मर्त्यलोकम् विशन्ति।', हे सांगताहेत. म्हणून शुक्राचार्य महाराजांनी त्यांना वाटेला लावून दिले. ''पाहू!'', म्हणाले. ''आज सवड नाहीये.'' म्हणजे श्रवण करण्याच्या इच्छेने अनेक देवमंडळी आली पण एकट्या परीक्षित राजाला भागवत सांगायचे आहे.

महापुरुष शोध करतात. पुण्यशील जीवात्मा कुठे आहे याचा त्यांना बरोबर शोध लागतो. त्याला मार्गदर्शन करून त्याचा उद्धार करायचा आहे. ही त्यांची सद्बुद्धी आहे. इतर कोणाला सांगायचे नाही असा अर्थ नाही. ज्याच्या ज्याच्या बुद्धीमध्ये जशी योग्यता असणार त्याप्रमाणे

तो घेणार. तर खरा श्रोता म्हणजे परीक्षित राजा. ही त्यांची खात्री झालेली आहे. सर्व राज्य सोडून देऊन गंगातीरावर येऊन बसलेला आहे. परमेश्वराची प्रार्थना करतो आहे. त्यामुळे आचार्य महाराज सांगतात त्याप्रमाणे देवाचा अनुग्रह ही चौथी गोष्ट यामध्ये मुद्दाम त्यांनी दाखीवलेली आहे. दुर्लभ तीनच आहेत म्हणतात. पण देवाच्या कृपेशिवाय मिळत नाहीत.

तर देवाच्या अनुग्रहाची ही तीन फले सांगितली. **देवाची कृपा म्हणजे काय ? मनुष्यजन्म मिळणे. मुमुक्षा उत्पन्न होणे.** प्रपंच, संसार हा दु:खमय आहे. एक दु:ख संपले की दुसरे दु:ख पाठोपाठ आहे. संपत नाही कधीही. मानसिक चिंता अनंत आहेत. वासना अनंत आहेत. त्यामुळे ती मानसिक दु:ख, शारीरिक दु:ख, भौतिक दु:ख, सर्व प्रकारची दु:ख सारखी त्यात आहेत. हे केव्हा संपेल अशाप्रकारची इच्छा उत्पन्न होणे, हा एक देवाचा अनुग्रह आहे आणि धीर देऊन, आश्वासन देऊन या सर्व दु:खातून दूर करून मोक्ष मिळेपर्यंत त्याच्याबरोबर राहणारे, **मार्गदर्शन करणारे महात्मे भेटणे** हा एक देवाचा अनुग्रह आहे. तीन गोष्टी दुर्लभ आहेत याचा अर्थ देवाचा अनुग्रह हा जर या तीन गोष्टींनी मिळाल्या तर खरा अनुग्रह आहे, असे आचार्यांना सांगायचे आहे. प्रयत्नांनी मिळणाऱ्या नाहीत.

तर ही ईश्वराची कृपा परीक्षित राजाने संपादन केली असल्यामुळे सर्व राज्य त्याग करून तो गंगातीरावर ईश्वराची प्रार्थना करीत बसला आहे. एवढ्यात शुक्राचार्य महाराज येऊन पोहोचलेले आहेत. ज्ञानसमुद्रातला चंद्र असे त्यांना म्हणतात. पूर्ण ज्ञान आहे. त्यांना नुसते पाहिले, त्यांच्या नुसते जवळ गेले तरी मनातले सर्व विकार शांत होतात. आनंद उत्पन्न होतो. तो आनंद त्यांच्याजवळ किती असेल ! बाहेरून नुसते सान्निध्य मिळाले तरी दु:ख नाहीशी झाली आहेत असे आपल्याला वाटतंस. हे त्यांचे सामर्थ्य आहे, असे शुक्राचार्य महाराज येऊन पोहोचलेले आहेत. हा देवाचा अनुग्रह आहे. आत्तापर्यंत आयुष्य गेले. राज्य उत्तमप्रकारे केले. कलीलासुद्धा सांगितले, ''माझ्या राज्यात गडबड करायची नाही.'' कली आणखी गडबड करू लागला होता. तोही भिऊन थांबलेला आहे. हे सामर्थ्य आहे. पण भगवंताची खरी कृपा, खरा अनुग्रह आज झालेला आहे की सात दिवस आयुष्य शिल्लक राहिलेले आहे. अजून आयुष्य आहे. काय गडबड काय आहे ? पाहू, पुढे म्हातारपणी पाहू. असे विचार मनामध्ये येतात आणि पारमार्थिक म्हणून काही उन्नतीचा मार्ग आहे की नाही याचा शोध घेण्याची प्रवृत्ती होत नाही. धर्माचरण करणे, महात्म्यांची सेवा करणे, हे तर दूरच. देवाच्या कृपेने महात्म्यांची कृपा होणारी आहे. देवाच्या अनुग्रहामुळे महात्मे भेटतात. नाहीतर भेटत नाहीत.

तेव्हा परीक्षित राजाला शुक्राचार्य महाराज भेटलेले आहेत. सात दिवसपर्यंत त्यांचा संवाद झाला. त्याला सर्व समजले; पटले. ऐकले आणि पटले त्याला. ऐकलं तरी सर्वांनाच पटत

नाही ना! कितीही ऐका, कितीही वाचा, काही उपयोग नाही. पटत नाही. केव्हा पटायचे कोणाला ठाऊक! शेवटचा श्वास आला तरी मनाची खात्री नाहीये.

तर याप्रमाणे देवाचा अनुग्रह झाला म्हणजे महात्मे भेटताहेत, याचे दुसरे एक उदाहरण शुक्राचार्यांनी राजाला ध्रुवाचे चरित्र सांगून दिले. ध्रुव पाच वर्षाचा मुलगा आहे. मनुष्यशरीर दुर्लभ आहे, महात्म्यांची भेट दुर्लभ आहे, वगैरे सगळे त्याला बिचाऱ्याला काय माहित! पाच वर्षाच्या वयामध्ये हा कसला विचार असणार! पण राजपुत्र आहे. तेजस्वी आहे. सभेमध्ये जाऊन आपल्या पित्याच्या मांडीवर जाऊन बसावे अशी त्याला इच्छा उत्पन्न झाली. आणि तो निघाला असताना त्याच्या सावत्र आईने, सुरुचीने त्याचा अपमान केला. ती म्हणाली, ''तो तुझा अधिकार नाही. या सिंहासनावर माझ्या गर्भातून जो जन्माला आलेला आहे, तोच बसू शकतो. तुला जर या सिंहासनावर बसायची इच्छा असेल तर वनामध्ये जा, देवाची कृपा संपादन कर, नंतर माझ्या गर्भातून जन्माला ये. म्हणजे तुला सिंहासनावर बसता येईल.'' हा अहंकार आहे. **अहंकाराने लोकांचा अपमान करण्याची बुद्धी उत्पन्न होते.**

**कोणाही जीवाचा न घडो मत्सर।**
**वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे।।**

बाह्यपूजा ही आहेच, षोडशोपचार, पंचोपचार वगैरे पुष्कळ उपचार आहेत. चतुषष्टी उपचार आहेत राजोपचार आहेत. गायन, वादन, नृत्य ही सगळ्या प्रकारांनी देवाची पूजाच आहे. पण मुख्य पूजा तुकाराम महाराज सांगतात, ''कोणाचाही मत्सर करु नये. कोणाचाही उपमर्द होईल असे बोलू नये.''

भीष्माचार्य सर्व धर्माचे सार सांगताहेत. खरे धर्माचरण, खरी देवाची पूजा, खरी भक्ती कोणची? आपल्याला जे प्रतिकूल वाटतं तसं लोकांना प्रतिकूल वाटू नये असं वागलं पाहिजे.

कोणीही माझी निंदा करू नये. कोणीही मला बोलू नये. माझ्याविरुद्ध कोणीही वागू नये हे जे आपल्याला प्रतिकूल जे वाटत तसं लोकांबरोबर न वागायचा आपण प्रयत्न केला पाहिजे. हा **खरा धर्म आहे**. हे धर्म सर्वस्व आहे म्हणतात, भीष्माचार्य महाराज.

पण त्या राजपत्नीला हे काय समजणार! अनुकूलता जास्ती जास्त झाली म्हणजे चांगले असते की वाईट असते हा काही निर्णय करता येत नाही. संयमाने राहणारे महात्मे कितीही अनुकूल परिस्थिती असली तरी कोणाचा उपमर्द करत नाहीत. निर्मत्सरता हा त्यांचा नैसर्गिक अभ्यास आहे. द्रोह नाही कोणाचा.

तर याप्रमाणे अपमान झाल्यावर ध्रुवाच्या मनावर परिणाम झाला. लहान मुलगा आहे तो. सिंहासनावर बसायला तू लायक नाहीस असे भर सभेमध्ये बोलल्यावर कोणाला बरे वाटेल ? लहान मुलगा असला म्हणून काय झाले ? ते राजेसाहेबही तसेच खाली मान घालून बसले. म्हणजे सत्ता त्या राजाची होती की राणीची होती ? काय निर्णय करायचा ? निराश झालेला ध्रुव रडत आपल्या आईकडे आलेला आहे. आईलाही समजलेले आहे. पण तिला प्रारब्ध अनुकूल नाही ना ! ती नावडती होती. काय कारण कोणाला ठावूक ! पूर्व ऋणानुबंध असतात. कोणाबद्दल प्रेम वाटावे आणि कोणाबद्दल प्रेम वाटू नये काही सांगता येत नाही. काही तरी कारणे असतात.

त्याच्या मातेने, सुनितीने त्याला सांगितले, ''काही हरकत नाही. तुझ्या आईने तुला काय वाईट सांगितले बाळ ? अपमान कशाला समजतोस ? अरण्यामध्ये जाऊन ईश्वराचा कृपाप्रसाद संपादन करायला तिने सांगितले, हे चांगले मार्गदर्शन नाही का ? असं सांगणारे लोक भेटतील ?''

कोणी विरोधी बोलल्यानंतर तो विरोध जास्त वाढीवण्याचाच प्रयत्न आपण करतो. पैशून्य म्हणतात याला. चहाडखोरपणा ! तुम्हाला हे असं असं बोलले. आमच्याबद्दल असे उद्गार काढले. म्हणजे पुन्हा त्याच्यामध्ये जास्तीच भर पडते. संपणार नाही, द्वेष.

तर ती माता प्रत्यक्ष सांगती आहे आपल्या मुलाला, ''बाळा ! **मनुष्यजन्म मिळाल्यावर ईश्वराची कृपा संपादन करणे आपले कर्तव्य आहे.**'' तोच उपदेश तुला तुझ्या त्या आईने केला. ती आई काय ? आणि मी काय !, सारखीच. मी सांगितले म्हणजे चांगला उपदेश आणि सावत्र आईने सांगितले म्हणजे चांगले नाही असे नाही. 'बालादपि सुभाषितम्' – गुणग्राहक दृष्टी पाहिजे. चांगले कोणचे ? आणि वाईट कोणाचे ? हे आपल्या बुद्धीने समजून घेता आले पाहिजे. कोणचं ग्राह्य आहे ? आणि कोणचं अग्राह्य आहे ? हा विवेक करता आला पाहिजे. त्यासाठी अभ्यास पाहिजे. मार्गदर्शक तसे भेटले पाहिजेत. ही आई त्याला भेटली. ''ते चांगले आहे बाळ !, वाईट काय झाले ? वनामध्ये जायची तयारी कर. तुझ्या पितामहांनी ईश्वराची कृपा संपादन केल्यामुळे ते आज मोठे राजे झाले आहेत. योगी आहेत. धर्मशास्त्रज्ञ आहेत. सर्व राजधर्म त्यांना माहिती आहे. ऋषीमंडळींनीसुद्धा त्यांच्याबरोबर विचार केला आहे. त्या ऋषींनाही सर्व धर्म त्यांनी समजावून सांगितला आहे. ही देवाची कृपा त्यांनी मिळविली. केवळ राज्य पाहिजे असेल, राजसिंहासनावर बसायचे असेल तर 'दाता एक रघुनंदन' ही बुद्धी ठेवल्याशिवाय तुला मिळणार नाही म्हणाले !'' कोण देणार ? मागून मिळतं का ? **प्रयत्नवाद हा ध्रुवाच्या चरित्रामध्ये आणखी मोठा आहे.**

देवानुग्रहामुळे मनुष्यजन्म मिळतो, देवानुग्रहामुळे मुमुक्षा उत्पन्न होते आणि महात्म्यांची भेटही देवानुग्रहामुळेच होते. हा सिद्धांत आचार्य महाराजांनी सांगितला आहे. त्याकरता व्यास महर्षी जनमेजय राजाला देवीचे चरित्र सांगताना म्हणतात, ''जगदंबेची कृपा संपादन केली पाहिजे.'' पाच वर्षाचा मुलगा, आईची आज्ञा झाली, समजूत पटली. सावत्र आई म्हणाली म्हणून चुकीचे आहे असं जर वाटलं असतं तर बाहेरचं राहीला असता तो. तिचे म्हणणे योग्य आहे. सावत्र आईच्या मुखातून निघाली तरी चांगले आहे, कल्याण करणारे आहे. कल्याणाचा मार्ग त्याच सावत्र आईने दाखिवला. ती अहंकारी आहे, तिने माझा अपमान केला असे कशाला समजायचे ? हे मार्गदर्शन करणारी सख्खी आई त्याची होती. त्यामुळे आईची अनुज्ञा घेऊन, देवाची कृपा संपादन करण्याकरता पाच वर्षाचा ध्रुवबाळ राजवाडा सोडून अरण्यात जायला निघाला आहे. आईची इच्छा आहे, आपल्या बाळाचं कल्याण व्हावं. आईही देवभक्त आहे, आणि प्रार्थना करते आहे. आणि ध्रुवाच्याही मनामध्ये ती भक्ती निर्माण झाली. मग देवाचा अनुग्रह होण्याला काही वेळ लागेल काय ?

**परमार्थ करून पाहायचा नाही. 'करून पाहूया परमार्थ' असं म्हंटलं म्हणजे फळ लगेच मिळत नाही.** पहा !, करून पहा. त्यातसुद्धा मग चिकित्सा आली. आम्ही चिकित्सा करायला काय असमर्थ आहे का ? तुम्ही बरोबर सेवा केली की नाही ? तुमच्या सेवेत काय न्यूनता आहे ? हे सगळे तो तपासून पाहणार. शुभवासना, अशुभवासना कोणच्या आहेत ? काय आहेत ? ही सगळी तपासणी केल्याशिवाय अनुग्रह होणार नाही.

ईश्वर हा दयाळू आहे. फक्त प्रेम, भक्ती पाहणाराच आहे, बाकी त्याला काहीही लागत नाही. दयासागर आहे तो. अशी सुरुवातीपासून निष्ठा पाहिजे. अशी **शुद्ध भक्ती, शुद्ध प्रेम मनांत ठेवून भक्तीला सुरुवात झाली तर अनुग्रह व्हायला वेळ लागणार नाही.**

अरण्याच्या रस्त्याने ध्रुवबाळ निघालेला आहे. आणखी नारद महर्षी तिकडून यायला लागले आहेत. त्यांना कशी प्रेरणा झाली ? काय झाली ? कोणास ठावूक ! नारदांचे दोन भक्त प्रसिद्ध आहेत. एक ध्रुव आणि दुसरा प्रल्हाद. पाच वर्षाचीच मुले आहेत. पण त्यांच्या आयुष्याचे त्यांनी किती सार्थक केलेले आहे ! महापुरुषसंश्रय देवाच्या कृपेने जर मिळाला तर त्याचे फळ कसे मिळते हे या दोन भक्तांच्या चरित्रावरून दिसते. तसेच त्यावरून नारद महर्षींची योग्यताही समजून येते.

''का रे ध्रुवा ? कुठे निघालास ?'' नारदांनी विचारले. थांबला तो; नारदांना नमस्कार केला. नारदांचा राजवाड्यात सर्वत्र संचार होता. त्यांचं मार्गदर्शन करायचं काम बंद नाहीये. योग्य मार्गदर्शन करत राहायचे. कोणी ऐकलं, कोणाला पटलं, त्याप्रमाणे वागायला सुरुवात

केली तर त्यांचच कल्याण आहे. सांगणं एवढं आपलं काम आहे. म्हणून सर्व ठिकाणी संचार करणं हे नारदांचे काम सांगितले आहे. कुठेही जाऊ शकतात. तसे सामर्थ्य आहे. त्यामुळे ध्रुवालाही नारद महर्षींचे दर्शन घडत असे.

ध्रुवाने उत्तर दिले, ''देवाची कृपा संपादन करण्याकरता निघालो आहे.'' नारदांनी विचारले, ''देवाची कृपा ? कोणी सांगितले तुला ?'' ध्रुव म्हणाला, ''माझ्या आईने सांगितले.''

नारदांनी विचारले, ''आईने सांगितले तुला ? आणि अरण्यात निघाला आहेस ? अरण्यात देव असतो हे तुला कोणी सांगितले ?'' आता या प्रश्नांची उत्तरं तो बालक काय देणार ? नारद म्हणाले, ''अरे ! मोठ्या मोठ्या योग्यांना ईश्वराची प्राप्ती होण्याकरता किती वर्ष अभ्यास करावा लागतो. तरीसुद्धा दर्शन होईल याची खात्री नाही. झालं तर झालं, नाहीतर नाही. अशी परिस्थिती आहे. अरण्यात जाऊन देव कसा भेटेल बाळ ? लहान मुलगा तू. चल माझ्याबरोबर. तुझ्या पित्याला सांगतो. सावत्र आईला ताकीद देतो, तुला असे न बोलण्याबद्दल. मुलांच्या मनावर परिणाम होतो. चांगलं नाही हे. तुला सिंहासनावर बसविण्यास मी राजाला सांगतो.''

पण ध्रुवाची बुद्धी अत्यंत निश्चित बनलेली आहे. महापुरुष म्हणजे त्याची आई त्याला भेटलेली आहे. ही पहिली देवाची कृपा आहे. आईनेच हा बुद्धीभेद केला असता तर ? असू दे बाबा ! आपल्या प्रारब्धाप्रमाणे सगळं घडतं. ''ठेवीले अनंते तैसेची राहावे.'' हे सांगणारे तुकाराम महाराज जरी त्या वेळी नसले तरी त्यांचा हा सिद्धांत होती की ! आपल्या नशिबी अपमानच आहे. असं आई बोलली असती तर ? पण ती आईही तशीच फार मोठी सद्भक्त आहे. विश्वास आहे, ईश्वरकृपा ही मोठी आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष, सर्वही ईश्वरकृपेनेच प्राप्त होते आहे. हा तिचा विश्वास आहे. त्यामुळे महापुरुष म्हणजे त्याची माताच त्याला मिळालेली आहे. जन्मापासूनच हा अनुग्रह देवाने त्याला दिलेला आहे. असा प्रसंग आलाच तर तुझा उद्धार करणारा महापुरुष म्हणजे तुझी माताच आहे – तुझ्याजवळ आहे. तुला काळजी करण्याचे कारण नाही. आणि तिच्या शब्दाचा प्रभाव ध्रुवाच्या बुद्धीवर पडून त्याची निश्चित बुद्धी झाली आहे.

नारद प्रयत्न करताहेत. ''चालायचंच बाबा ! व्यवहारामध्ये नेहमी आपल्याला अनुकूलता मिळाली पाहिजे, मानच मिळाला पाहिजे. असे वाटून कसे चालेल ? संसार म्हणजे असाच आहे. मानही आहे, अपमानही आहे. मान मिळीवण्याची प्रयत्न करायचा, अपमान विसरून जायचे, दुःख घालवायचे.'' असे त्याला समजावले. व्यवहारामध्ये कसे वागावे हे नारदांनी त्याला मुद्दाम सांगितले. त्याची बुद्धी पालटते का पाहिले.

व्यवहारामध्ये उत्तम वागणारा मनुष्य जर असेल तर त्याला काहीही दु:ख होणार नाही. कसं वागावं ? **तीन प्रकारची माणसं जगात आहेत**. आपल्यापेक्षा श्रेष्ठ, उत्तम गुणसंपन्न, आपल्या बरोबरीची आणि आपल्यापेक्षा कमी दर्जाची. त्यापैकी अत्यंत श्रेष्ठ जे असतील त्यांची कृपा, प्रेमाने , नम्रपणे वागून, त्यांच्या आचरणाबद्दल आनंद व्यक्त करून संपादन करावी. श्रेष्ठपुरुषांची कृपा संपादन करण्याकरता विनीतभावाने राहाणं, त्यांच्या आचरणाबद्दल आनंद व्यक्त करणं, म्हणजे ते संतुष्ट असतात.

मात्र ही मंडळी बरोबर निवडता आली पाहिजेत. बरोबरीचे जे असतील, ते कोण आहेत ? आपल्यापेक्षा श्रेष्ठ कोण आहेत ? हे समजण्याची योग्यता बुद्धीमध्ये आली पाहिजे. नाहीतर फसण्याचा संभव असतो. अंधश्रद्धा निर्मूलन यामुळे निर्माण होते ना ! अमुक एक व्यक्ती जास्ती गुणवान आहे, असं आम्हीच आमच्या बुद्धीनेच ठरवायचं आणि नंतर त्यांनी फसवलं म्हणायचं. ते सांगायला आले होते का तुम्हाला ? चार मंडळींशी विचार विनिमय करून श्रेष्ठ पुरुषांची निवड करावी, आणि त्यांची कृपा संपादन करावी.

अत्यंत कमी दर्जाचे जे आहेत, तेच कळून येतील. अशुभ वासना आहेत, आचरण चांगले नाही. ईश्वरभक्ती नाही. काही नाही. वाट्टेल तसे वागणारे – त्यांच्याबद्दल दया उत्पन्न व्हावी. 'अरे ! असं वागू नकोस. तुझं अकल्याण होईल. व्यसनामुळे सगळ्या आयुष्याचा नाश होईल.' म्हणजे त्यांच्याबद्दल दया मनात बाळगून त्यांच्या उपयोगी पडता आले तर पडावे. त्यासाठी दयेचा अभ्यास केला पाहीजे. म्हणजे ती मंडळीही आणखी अनुकूल होतील. आपल्याबद्दल दयेने वागणारा हा मनुष्य आहे, चांगला आहे, असे त्यांना वाटेल.

आपल्या बरोबरीचाही चांगला आहे. एकमेकांबद्दल मैत्रीने, प्रेमाने वागल्यावर कोण दु:ख देईल ? विरोध करायचाच नाही ना कोणाला ! असं वागलं म्हणजे दु:ख वगैरे काही होत नाही.

तेव्हा वनामध्ये जाऊन काही उपयोग नाही बाळ ! देव काय वनामध्ये गेल्यावर भेटणार आहे अशी तुझी कल्पना आहे का ? असे जेव्हा नारदांनी पुन्हा पुन्हा विचारल्यावर ध्रुवाने सांगितले, ''ऋषीमहाराज, राजवाड्यात मला पाऊल ठेवायचे नाही. परत मी येणार नाही. मला माझे स्वत:चे राज्य मिळाले पाहिजे.'' अशी त्याची निश्चित बुद्धी होती. वासना आहे राज्याची. ध्रुव आणि प्रल्हाद यांच्यामध्ये हा फरक आहे. ईश्वराची कृपा मला निर्हेतुक नको आहे, असे ध्रुव म्हणतो. तर प्रल्हादजी निर्हेतुक कृपा मिळविणारे आहेत. ''काही मागण्याकरता मी तुमची भक्ती करीतच नाही. मला कशाला देवा वर देता ?'' असे प्रल्हादजी विचारतात.

ध्रुवाने सांगितले, ''ऋषीमहाराज! तुमच्या सांगण्याप्रमाणे पित्याने मला दिलेले राज्य मी घेणार नाही. मला माझे स्वतंत्र राज्य पाहिजे. पित्याने दिलेले राज्य उष्टे आहे. त्याकरता मी वनामध्ये निघालेलो आहे. त्यासाठी ईश्वराची कृपा एवढीच कारण आहे. माझ्या आईचे मार्गदर्शन आहे.''

नारदांनी विचारले, ''हे तुला जमणे शक्य आहे का ?'' तो म्हणाला, ''नसेल. काय होईल ? आयुष्य संपले की देह पडेल. हरकत नाही. पुन्हा दुसरा देह मिळेल.''

ध्रुव नास्तिक नाहीये. नास्तिक वृत्तीच्या लोकांचा बुद्धीभेद लवकर होतो. अमुक गृहस्थांच्या आग्रहावरून अन्न सत्याग्रहाला सुरुवात करायची, लगेच दुसऱ्या दिवशी तमुक एक गृहस्थांच्या आग्रहावरून अन्न सत्याग्रह सोडून द्यायचा. करायला कोणी सांगितला ? निश्चित बुद्धी कुठाय ? ध्रुवाची बुद्धी निश्चित आहे. पारमार्थिक दृष्टीने ती कमी दर्जाची आहे. माझ्या मालकीचे राज्य झाले पाहिजे. माझा अपमान झाला आहे. तो गेला पाहिजे. ही वासना अद्यापि राहिली आहे. असू दे! पण एक निश्चय आहे, की ईश्वराच्या कृपेने हे सगळे मिळेल.

''म्हणून मी निघालेलो आहे. देवाची कृपा म्हणजे आपले दर्शन मला अनायसे घडले आहे. मला आपण आता मार्गदर्शन करा. कसं करायचं ? तुम्ही देवाची कृपा संपादन केलेली आहे. देवदर्शन प्रत्यक्ष तुम्हाला झालेले आहे. देवाचा अनुग्रह कशाने मिळतो हे सगळं तुम्हाला माहिती आहे. तुमच्या कृपेने मोठे मोठे राजे आणखी उद्धरून गेलेले आहेत. तेव्हा तुम्ही मला मार्गदर्शन करा. तुमच्या सांगण्याप्रमाणे मी वागेन. नाहीतर मी परत येणार नाही.''

नारदांनी ही ध्रुवाची परीक्षा घेतलेली आहे. पाच वर्षाचे वय आहे, पण बुद्धी फार विकसित झाली आहे. देवाचा हा मोठा अनुग्रह आहे. नारद महर्षी समजून गेले. याची उपेक्षा करून उपयोग नाही. पाचव्या वर्षामध्ये देवाबद्दल इतका विश्वास, इतकी श्रद्धा धारण करणारा महात्मा, देवदर्शन नाही झाले तर देह पडेल म्हणाला. इतकं सांगणारा, वागणारा जो आहे, त्याला योग्य मार्गदर्शन करायचं, स्वत:ची शक्तीही त्याला द्यायची असं नारदांनी ठरीवलेले आहे. शक्तीपात ज्याला म्हणतात, हा दिसतो आहे.

त्याला मंत्रदीक्षा देऊन सगळं सांगितलं. त्रिकाल स्नान करीत जा. जप करीत जा. देवाची पूजाही करीत जा. वनामध्ये फुलं मिळतील, फळं मिळतील, काही तरी देवाचे प्रतीक ठेवावे, मन स्थिर होण्याकरता ध्यान करत जा. प्राणायाम करीत जा. आता तिथे काय नारद महर्षींची शाळा होती का ? जिथे प्राणायाम कसा करायचे ते शिकवले ? आणि असं शिकवून प्राणायामाची सिद्धी व्हायला वेळ किती लागणार ? प्राणवायू स्थिर होणं किती कठीण आहे !

पण इथं काही वेळ नाही. नारदांचा संकल्प झाला आहे की या बालकाचे कल्याण व्हायला पाहिजे. अशाप्रकारचे मार्गदर्शन करणारे महात्मे भेटणं आणि त्यांनी ह्याचे कल्याण करायचे ठरविणे हे मोठं आहे. ईश्वराचा हा खरा अनुग्रह आहे. नाहीतर मार्ग सांगून मोकळे होतात. निघून जातात दूसरीकडे कुठेतरी. ऐकणाऱ्यानेही ते लक्षात ठेवून त्याप्रमाणे केलं, नाही तर नाही, असं नाही.

हे सगळं सांगून झाल्यावर शेवटी सांगितलं ध्रुवाला, ''तुझ्या आईने केलेले मार्गदर्शन बरोबर आहे.'' नारदांनी हे कबूल केलं. ''अरण्यामध्ये जाऊन देवाची तू सेवा कर. देवदर्शन तुला होईल. काही काळजी करण्याचे कारण नाही.'' **'अर्थ, कामसुद्धा ईश्वराच्या कृपेने प्राप्त होतात.'** हा सिद्धांत नारदांनी मुद्दाम सांगितला आहे. आणि ज्याला सांगायचाय त्याची बुद्धी पटवून घेण्यासारखी आहे म्हणून सांगताहेत. आधी त्यांनी सांगून पाहिलं, चल राजवाड्यामध्ये, मी तुझ्या पित्याला सांगतो, अमूक करतो. पण नाही. ध्रुवाच्या निश्चयात काही बदल झाला नाही.

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष चारही पुरुषार्थ ईश्वराच्या सेवेने प्राप्त होतात. एकमेव म्हणताहेत. पण तितका निश्चय पाहिजे. अर्थ, काम कसे मिळतील ? देवधर्म करण्यात आपण गुंतलो तर नोकरीवर वेळेवर जाता येईल का ? काम केले नाही, तर प्रतीमास वेतन कसे मिळेल ? आपलं जीवन कसं जाईल ? प्रपंचातील सर्व लोकांचे संगोपन कसे करता येईल ? हे विचार मनामध्ये आल्यानंतर ईश्वराची सेवा बाजूला पडली. अर्थ, कामही ईश्वराच्या कृपेने मिळणे शक्य आहे. हा निर्धार मनामध्ये पाहिजे. हा निर्धार ध्रुवाचा होता. तो अर्थार्थी भक्त होता. राज्य पाहिजे म्हणूनच तो देवाची भक्ती करायला निघाला आहे. पण अर्थार्थी भक्तसुद्धा दृढनिश्चयी पाहिजे. विश्वास पाहिजे. हे ही एक साधन आहे. याही डॉक्टरचे औषध घेऊन बघू. दूसरा डॉक्टर चांगला आहे, समजल्यावर त्याचेही औषध घेऊन बघू. रोज डॉक्टर आणि औषध बदलायचा म्हटलं तर गुण कोणत्या औषधाने येणार ? एक तरी औषध लागू व्हायला काही काळ पाहिजे की नको ? अनिश्चित स्थिती बुद्धीची केव्हाही असून उपयोगी नाहीये. अर्थार्थी असला तरी त्याला अर्थ प्राप्त होतो. जो विरुद्ध वागणारा पिता, तोच अनुकूल झाला शेवटी. अपमान करणारी सावत्र आई, ध्रुव वनातून आला म्हटल्यावर बाहेर येऊन त्याला कडकडून मिठी मारून म्हणते, ''आलास बाळ!, आम्ही फार दु:खी झालो होतो.'' हा देवाचा अनुग्रह आहे. अर्थप्राप्तीला काय वेळ आहे! अर्थप्राप्तासाठी नोकरीच केली पाहिजे असं नाही. अर्थप्राप्तीची साधने सांगतात शास्त्रकार; पैसा मिळेल. त्याच्याकरता प्रत्यक्ष सेवाच केली पाहिजे असं नाही.

इंद्रियनिग्रह हे पहिले कारण आहे. इंद्रिय ताब्यामध्ये आहेत. हे पाहूनच लोकांना आदर

वाटतोय. जिव्हा ताब्यामध्ये आहे. रसनेंद्रिय हे मुख्य आहे. रसनेंद्रिय ताब्यात आले म्हणजे सगळी इंद्रिये ताब्यात आली. तोपर्यंत नाही. ह्याचेच नाव विनय आहे. नम्रता ही जितेंद्रियत्वामुळे आपल्याला अनेक गुण प्राप्त होतात.

समर्थांची सेवा सुरु झालेली आहे. सुंदर कसे लिहावे ? कसे बोलावे ? वगैरे सर्व दासबोधामध्ये लिहून ठेवले आहे. हे सगळे गुण जवळ आहेत. **लोकांना उपयोगी पडणारे गुण ज्या महात्म्याच्या जवळ आहेत, त्याच्याकडे लोक येणारच की.** त्यांचेच कल्याण आहे. कसे वागावे ? – मार्गदर्शन घेण्याकरता येणार. आणि लोकांचा अनुराग उत्पन्न झाला किंवा लोकांचे प्रेम एकदा मिळाल्यानंतर संपत्तीला काही तोटा नाही. नोकरीमुळे संपत्ती मिळेल ही एक कल्पना आहे. हा जर मार्ग व्यवस्थितपणे आचरण केला. जितेंद्रियत्वाने राहिले, आणि त्यामुळे गुणप्रकर्ष जर मिळाला तर लोकांचा अनुराग झाल्यावर काही कमी नाही. याच्या संसाराची काळजी लोकांनाच उत्पन्न होते. काय घरात आहे ? काय नाही ? हे परस्पर लोकंच पाहतात. आणि ते आपोआप घरी येते.

तर नारदांची त्या ध्रुवबाळावर कृपा झाली. मार्गदर्शन उत्तम मिळाले. मार्गदर्शन करणारे भेटूनही बुद्धी चांगली नसली, अनिश्चित असली तर काय करावं ? आपल्याकडून त्रिकाल स्नान कसे होईल ? आपल्याला खायला कोण घालील ? जेवायला आपल्याला कसं मिळेल ? माझी आई तिकडे दूर राहिली. वाघ, सिंह आहेत तिथे आपली काय अवस्था होईल ? हे जर विचार त्याच्या मनामध्ये आले असते तर त्याच्याकडून तर झाले असते का ? पण बुद्धी मिळालेली आहे. देवाची कृपा आहे. त्या देवाच्या अनुग्रहामुळे चांगली बुद्धीही मिळाली, आणि नारद महर्षींचे मार्गदर्शनही लाभले. आणि त्यांची शक्ती मिळाली. स्वत: नारद त्याच्याकडून करवून घेताहेत. त्याची बुद्धी सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न नारदांचा चालू आहे. अदृश्य रूपाने. स्वत:च्या शक्तीचा प्रयोग करून नारदांनी त्याची बुद्धी इतकी स्थिर केली, की त्याने जे क्लेश भोगले, ते आपण खरेसुद्धा मानणार नाही. अन्न नाही. पाणी नाही. वायू नाही. सगळे प्रयोग त्याने करून पाहिलेले आहेत. आणि शेवटी प्राणवायूची स्थिरता झाली. ध्यान सिद्ध झालेले आहे. आणि त्या ध्यानामध्ये चार पाच महिन्यातच भगवंताचे साक्षात दर्शन झाले, कृपादृष्टी झाली.

तर ''देवानुग्रहहेतूकम्।'' हे जे सांगताहेत, हे स्वतंत्र साधन आहे. आचार्य महाराज त्याच्याबद्दल या श्लोकात बोललेले नाहीत. मनुष्यजन्म मिळाला पाहिजे, मुमुक्षा मिळाली पाहिजे, महापुरुषांची संगती मिळाली पाहिजे; हे फार कठीण आहे. पण देवाच्या अनुग्रहाने हे मिळते. अनुग्रह आचार्यांनी जरासा बाजूलाच ठेवला. तो दुर्लभ आहे किंवा नाही वगैरे त्याबद्दल ते काही

सांगत नाहीत. देवाचा अनुग्रह झाला की सगळं आपोआप मिळते. सुलभ होतं म्हणाले.

अशारीतीने नारदमहर्षींचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे देवाचा अनुग्रह मिळवण्याकरता ध्रुव निघालेला आहे. आणि मिळीवला त्याने. अन्नमय शरीर आहे. त्या शरीराच्या अन्नाची व्यवस्था नाहीये. विश्वास उत्पन्न झाल्यानंतर शरीराचीसुद्धा उपेक्षा होऊ शकते. आज काही खायला मिळाले नाही. आज एकादशी आहे, इतके एकादशीचे खाऊनसुद्धा एकादशी लागली; तरीसुद्धा पुन्हा काही मिळाले नाही असे आपण म्हणतो. शरीरातून आपले मन बाहेर जातच नाही ना! देवाची उपासना करण्याकरता शरीराच्या बाहेर पडले पाहिजे ना मन!

तर हे सर्वही पाच वर्षांच्या वयामध्ये ज्याला साध्य झालं, त्याला महात्मे भेटले, आणि देवाचा अनुग्रह त्याने संपादन केलेला आहे. त्यामुळे हे सर्वही कार्य कसे होते हे व्यास महर्षींनी जनमेजय राजाला सांगितले.

**कायेन वाचा मनसेंद्रियेवा।**
**बुद्ध्यात्मनावा प्रकृती स्वभावात्।।**
**करोमि यद्यत् सकलं परस्मै।**
**नारायणायति समर्पयामि।।**

## दिवस तिसरा

भगवान वेदव्यास महर्षी, जगदंबेचे चरित्र सांगताहेत जनमेजय राजाला. त्यांनी सूर्यवंश आणि चंद्रवंश यांच्यात जे प्रसिद्ध राजे होऊन गेले, त्यांची चरित्रे सांगितली. त्या राजांना जगदंबेच्या उपासनेने, कृपेने महत्व प्राप्त झाले.

भगवंतांनीही गीतेमध्ये हेच सांगितलेले आहे. देवाच्या अनुग्रहाने मनुष्यजन्म मिळाला आणि ते सशक्त होऊन महापुरुष झाले. जन्माला आल्यापासून उत्तम संस्कार बुद्धीमध्ये आहेत. नुसतं मनुष्य शरीर मिळालं म्हणजे महत्व प्राप्त होतं असं नाही. सत्व, रज आणि तम या तीन गुणांनी जग उत्पन्न झालं आहे. प्रत्येक पदार्थामध्ये तीन गुणांचं मिश्रण आहे. त्याप्रमाणे बुद्धीमध्येही आहे. बुद्धीत कधी रजोगुण जास्ती असतो. तर कधी तमोगुण. कामक्रोधादिक विकार मनामध्ये, बुद्धीमध्ये उत्पन्न होताहेत म्हणजे तमोगुण जास्त आहे. अंत:करणामध्ये सत्वगुण वाढतो आहे. अशावेळेला वैराग्य आहे. उपभोगाची काही इच्छा नाही. विषयाकडे

लक्ष जात नाही. कोणीही राग येण्यासारखे वर्तन केलेले असतानासुद्धा क्षमा आहे. हे सामर्थ्य फार कठीण आहे. क्षमा ज्याच्या अंत:करणामध्ये उत्पन्न झाली, त्याची सत्वगुणी बुद्धी आहे. कामक्रोध हे सर्वांच्याच मनामध्ये असतातच. रजोगुण, तमोगुण असतो. पण जो महात्मा जन्माला येतानाच सत्वगुण घेऊन येतो, त्याची ती कामक्रोधरहीत बुद्धी मनुष्यदेह धारण केला तरी वाढत जाते. तसे महात्मे भेटतात. त्यांचा आचार पाहून ह्याच्याही मनावर परिणाम होतो. ते किती क्षमाशील आहेत. मानाची इच्छा मनामध्ये बिलकुल नसेल, तर क्षमा उत्पन्न होते. कोणीही कसाही वागला तरी काही वाटत नाही.

**पण मानापमानाच्या कल्पना मनामध्ये, बुद्धीमध्ये जोपर्यंत आहेत, तोपर्यंत क्षमेचा अभ्यास होत नाही.**

वेदांना शब्दब्रह्म म्हणतात. ईश्वराने आपल्याला नेमून दिलेले जे कर्तव्यकर्म आहे, ते शब्दब्रह्म आहे. भगवतीचे स्वरुप आहे. वेद अनंत आहेत. किती त्यांच्यामध्ये विचार केला असेल! 'अभ्युदय आणि नि:श्रेयस' ज्यांच्यामुळे प्राप्त होतात. असा जो धर्म आहे, त्यात धर्माचा किती विचार केला असेल! धर्म कसा उत्पन्न होईल? आणि तो कसा टिकेल? हे ही पाहिलं पाहिजे. चरित्रंही ह्याकरता ऐकायची आहेत. जरी सात्विक बुद्धी असली, धर्माने वागणारी बुद्धी असली, तरी संगतीने ती बदलते.

दुर्योधनाच्या राज्यामध्ये पुष्कळ चांगले लोकही असतील. पण त्याच्या बुद्धीवर काही परिणाम झाला नाही. बारा वर्ष वनवास आणि एक वर्ष अज्ञातवासाची अट त्यानेच घातली होती, कपट द्युत करून. कपटाने जिंकले. वनवासामध्ये त्यांना पाठवून दिले आणि तेरा वर्षे व्यवस्थितपणे झाल्यानंतर राज्य त्यांचे त्यांना द्यायला हरकत आहे? त्यांचे जे राज्य घेतलेय तेही त्यांना मिळणार नाही. बारा-तेरा वर्ष राज्य ताब्यामध्ये आलेलं आहे. ते कसं सोडायचं? लोभ आहे. हा लोभ विकार म्हणजे रजोगुण, तमोगुणाचे कार्य आहे.

रामचंद्र चौदा वर्षानंतर परत आले आणि भरत वाट पाहतो आहे. ''कुठे आहेत रामचंद्र? अजून का आले नाहीत?'' मारुतीरायांनी पुढे येऊन बातमी दिली. ''आले रामचंद्र!, घाबरू नकोस!'' भरताने रामचंद्रांच्या पादुका मागून घेतल्या होत्या. सात्विक बुद्धी कशी बनवायची? याचे हे उदाहरण आहे. भरताची आईच त्याला सांगतेय, ''तुझ्यासाठी मी चौदा वर्ष राज्य मागून घेतले. तुला मिळाले म्हणजे तुझेच ते आता. रामांला काही परत मिळणार नाही.'' बरं!, राम भेटल्यानंतर रामही तेच सांगताहेत. ''पित्याची इच्छा तुला पूर्ण केली पाहिजे. मी राज्य करणार नाही. चौदा वर्षे तरी करणार नाही. माझं कर्तव्य वनात जाऊन राहण्याचं आहे.''

ही बुद्धी आहे. कर्तव्यनिष्ठ बुद्धी धारण करणारे मर्यादापुरुषोत्तम रामचंद्र; त्यांचं राज्य असताना त्यांनी स्वत: भरताला सांगितलं, ''तू राज्याचा अधिकारी आहेस. राज्य तू केले पाहिजेस. मी नाही करणार.'' काय अडचण आहे काय ? धर्माधर्माचा विचार आहे का इथे ? आलेले आहे राज्य. रामांचा अधिकार असताना तेही स्वत: सांगताहेत, ''तूच अधिकारी आहेस.'' पण भरताची स्वत:ची बुद्धी आहे.

भगवत् गीतेमध्ये दैवी संपत्ती असलेल्या बुद्धीची लक्षणे सांगितली आहेत –

**अभयं सत्वसंशुद्धीम्।**

म्हणजे सत्वगुण ज्या बुद्धीमध्ये आहे, तो रजोगुण-तमोगुणाला पुढे येऊन देत नाही. राजस, तामस विचार मनामध्ये येणारच नाहीत. आल्यानंतर इंद्रियांचा, विचारांचा निग्रह करायचा हे कशाला हवंय ? असे तामसी विचार मनात यायचेच नाहीत.

रामांनी कैकयीची स्तुती करावी, ''कैकयीचे माझ्यावर जास्ती प्रेम आहे. भरतापेक्षा माझ्यावर जास्ती प्रेम आहे.'' आणि त्याचे कारणही ते सांगतात, ''मला वनामध्ये जायला सांगितले म्हणून लोक किती कैकयीची निंदा करतात. पण वनात गेल्यावर मल काही काळजी आहे का ? म्हणजे माझ्यावर कैकयीने काहीच जबाबदारी टाकली नाही.'' हे विचार म्हणजे विवेक आहे. सात्विक बुद्धीचे लक्षण आहे. संशुद्धि: म्हणताहेत भगवान्. मनामध्ये द्वेष नाही. द्वेषादिक विकारांना मनामध्ये थारा नाहिये. 'मला राज्याभिषेक करायचे ठरले असताना मला वनात पाठीवले. कसली कैकयी!' काही नाही. ''कैकयीच्या वराने मला केवढी सवलत मिळाली ! आपल्या उपजीविकेपुरते मिळवायचे; संपलं ! काळजी करायची नाही कसली. फार काही कष्ट नाही, काही नाही. आणि त्या भरतावर सर्व राज्याची जबाबदारी टाकलेली आहे. राज्याचा भार पोटच्या मुलावर ठेवला.'' हे विचार त्या कैकयीच्याही मनात आले नसतील. हे रामांच्या मनात आले.

राज्य म्हणजे काही सोपे नाहीये. राजधर्माने ज्यांना वागायचे आहे, त्यांना राज्य म्हणजे फार संकट वाटतंय. कसं होईल ? कुणाचं नुकसान होईल ? कोणी अपराधी नसताना त्याला दंड केला जाईल का ? की अपराधी असताना सुटेल ? दोन्हा दोष आहेत. असं काही होईल का माझ्याकडून ? म्हणून सारखी काळजी आहे.

तेव्हा राज्याचा भार प्रत्यक्ष मुलावरती टाकला. म्हणजे भरताला झोप नाहीये. सतत राजधर्माप्रमाणे वागणारा राजा – त्याला झोप नाहीये. राज्यामध्ये कुठे काय चाललेलं आहे, त्याकडे सारखं लक्ष आहे. कोण दुर्जन आहे ? कोण सज्जन आहे ? सज्जनांना त्रास

कसा कसा होतो ? कितीप्रकारे होतो ? हा सगळा विचार सारखा करावा लागतो.

तर अशारितीने वागणारी कैकयी भरतावर जास्ती प्रेम करणारी आहे ? की रामावर प्रेम करणारी आहे ? हे लोकांनाच विचारावं रामांनी. भरताला वास्तविक वनवासात पाठवायला पाहिजे होते, म्हणजे काही काळजी नाही. ''तू जाऊन राहा रे बाबा ! तुझी सगळी व्यवस्था करू आम्ही. नावाला वनवास.'' पण नाही. व्यवहारामध्ये राहणारे जे संसारी लोक आहेत, त्यांची विचार करण्याची पद्धती वेगळी आहे. परंतु महात्म्यांना जरी मनुष्यशरीर मिळाले तरी त्या शरीरात राहणारी बुद्धी मात्र अत्यंत सात्विक मिळालेली आहे. धैर्य आहे. जातील की चौदा वर्षे. त्याचा परिणाम भरताच्याही मनावर झालेला आहे. त्यामुळे त्याचे रामंच्यावर अत्यंत प्रेम आहे. राज्य गेलं नाही रामांचे. ते गेले असे समजत नाहीये. मनामध्ये कोणत्याही प्रकारे शोक नाही, द्वेष नाही. उलट भरताला सांगताहेत, ''तूच राज्य केले पाहिजेस. तुझे कर्तव्य आहे. तुला माझ्याबरोबर वनात येता येणार नाही. लक्ष्मणाला येऊ दे. त्याच्यावर काही जबाबदारी नाही. आईबापांनी सांगितले आहे. तू राज्य सोडून आला नाहीस तर मला समाधान वाटेल. तिथेच राहिले पाहिजेस.''

आता भरताच्या बुद्धीची परीक्षा आहे. आपला मुलगा राजा व्हावा असं आईला वाटणं स्वाभाविक आहे. तो काही दोष मानायचे कारण नाही. त्याला लोभ म्हणायचे नाही. ते प्रेम आहे. रामचंद्रांनीही कारण सांगितलं आहे. ''तुझा धर्म या वेळेला राज्य करणं हा आहे. तुला वनात येता येणार नाही.'' तो रस्ता बंद झाला. राज्य सांभाळायचे आहे. त्यावेळेला बुद्धीची कसोटी आहे.

सत्वगुण बुद्धीमध्ये आहे ? की रजोगुण आहे ? की तमोगुण ? याचे निरीक्षण केले पाहिजे. मनुष्यजन्म याकरता आहे. प्रसंग सगळे येताहेत. प्रतिकुल परिस्थितीही निर्माण होते. पण त्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपली बुद्धी कशी राहिली आहे ? मन कसं आहे ? ह्याची परीक्षा आहे.

आणि भरताने निर्णय घेतला, रामांची आज्ञा तर अमान्य करायची नाही. तो आज्ञाभंग होईल. त्यांच्या आज्ञेप्रमाणे राज्य करायचं. पण भरताने रामांना सांगितलं, ''तुमच्या पादुका मला द्या. मला पाहिजेत. सिंहासनावर भरत बसणार नाही. तुमची आज्ञा म्हणून राज्य करणार आहे. पण सिंहासन तुमच्या पादुकांचे आहे. तुम्ही घेत नाही त्याला नाईलाज आहे. राज्य माझ्यासाठी मागून घेतलं. मी सांगतोय मी राज्य घेणार नाही. तरी तुम्ही ऐकत नाही. वनातच जायचं म्हणता.'' नुसतं 'भरताला राज्य द्या!' असा वर मागितला असता तर कदाचित रामांना यावं लागलं असतं. तेव्हा भरत म्हणतोय, ''मी राज्य घेणार नाही. आईने

वाटेल ते मागितले असेल.'' ''पण दुसरा वर आहे की रामाने चौदा वर्षे वनवासात राहिले पाहिजे. त्यामुळे मला येता येणार नाही.'' भरत म्हणाला, ''तुमची आज्ञा आहे, तेव्हा राज्य मी करीन पण पादुका सिंहासनावर ठेवणार आहे. सिंहासनावर मी कधी बसणार नाही. छत्र, चामर त्या पादुकांवर राहतील.'' पादुकांची पुजा करून भरताने रामांची चौदा वर्षे उपासनाच केली.

पादुका मागून घेऊन डोक्यावर घेऊन तो राजधानीमध्ये आला; आणि सिंहासनावर त्या स्थापन केल्या. ध्यास लागलेला आहे. एकेक दिवस मोजतो आहे. ''केव्हा येतात राम!'', ही तळमळ मनामध्ये आहे. म्हणजे किती बुद्धीची शुद्धता आहे! सत्वगुण कसा आहे हे त्यावरून कळून येते. ''राज्य सांभाळायचे काम माझ्याकडे आलेले आहे. तेवढे करतो.'' म्हणाला. ''मी कोणताही राजभोग घेणार नाही.'' गोमूत्रामध्ये पीठ कालवून त्याच्या दशम्या करून तो खात होता. एवढा अयोध्येचा राजा असून चटईवर निजत होता. पण नाही. शरीराला सौख्य नाहिये. ज्या शरीराच्या निमित्ताने रामचंद्रांना दु:खकष्ट भोगावे लागले, त्या शरीराला सुख मिळणार नाही. हा ही मनाचा निग्रह आहे. या **मनाच्या निग्रहाला वैराग्य म्हणतात**. संपूर्ण सत्ता हातामध्ये असताना काही नाही. त्याची आसक्ती नाही. राज्य आपले नाहीये. राज्य घेण्याच्या वेळेला राज्य केव्हा सोडायचे हीही त्या महाभागाने ठरीवलेले आहे. केवढे कौतुक आहे! रामायणाचे याकरता वाचन केले पाहिजे. राजशासनातील अधिकारीवर्गाने रामायण वाचले पाहिजे. तर काहीतरी बुद्धीवर परिणाम होईल.

सात्विक बुद्धी कशी असती? भरताचेही राज्य गेले नाही, रामांचेही राज्य गेले नाही. राज्य तिथेच राहिले. पण रामापेक्षा भरताची किर्ती अधिक वाढलेली आहे. वाल्मिकी महर्षींनी हा आदर्श मुद्दाम सर्वांपुढे ठेवला आहे. स्वराज्य मिळाल्यानंतर व्यक्ति -स्वातंत्र्याच्या नावाखाली कोणी काय करावं याला तर अंतच राहिलेला नाही. रामावर काय, सीतेवर काय! कोणावरही आक्षेप घ्यावेत. पण विचार करून पाहा ना! काय आहे! केवढा त्याग आहे! रामांना कबूल करावं लागलं. ''बाबा!, माझ्यापेक्षा तू मोठा आहेस. मला अद्यापि राज्यभिषेक झालेला नव्हता. व्हायचा ठरला होता. इतक्यात वनात जायचं ठरलं. तुझ्या आईनं तुझ्याकरता राज्य मिळवून ठेवलेलं आहे. तुझ्या मालकीचं राज्य असताना तू मागे राहिलास.'' अशी बुद्धी मिळाली पाहिजे. मनुष्यजन्म त्याकरता आहे. ज्यावेळेला अशाप्रकारची बुद्धी प्राप्त होते, तो देवाचा अनुग्रह आहे हे समजलं पाहिजे. दैवीसंपत्ती ज्याला म्हणतात; देवाच्या कृपेने प्राप्त होते.

एकेक दिवस मोजतोय. आणि चौदा वर्ष पूर्ण झाली. पंधराव्या वर्षाचा सूर्योदय होईपर्यंत भरत या भूमीवर राहील असं नाही. ताकीद केली. पुढे भूमीवर भरत राहणार नाही.

रावणाला मारल्याबरोबर रामचंद्रांना यावं लागलं. बिभिषणाला त्यांनी लंका देऊन टाकली. लंकेतही गेले नाहीत. "तू सांभाळ!", म्हणाले आणि गडबडीने अयोध्येला आले आणि ते आल्याबरोबर भरताने ते राज्य आणि पादुका देऊन टाकल्या. भरताला रामांनी नंतर मुख्य मंत्री नेमलेले आहे. राज्य कसं करावं याचा भरताने चौदा वर्षे अभ्यास केलेला आहे. मंत्री झाल्यानंतर सुद्धा त्याचा तो अभ्यास तसाच चालू आहे. संस्कार उत्तम आहेत. मनात दुर्वासना नाहीत.

हे सगळे लोक सांगताहेत. रामांना काही पाहायचे कारण नाही. कसा वागत होता भरत; कडकपणाने ?

**वज्रादपि कठोरानि ....।।**

श्रेष्ठ महात्म्यांचे अंत:करण – बुद्धी अशी आहे. कठोरही आहेत. शिक्षा करण्याच्या वेळेला काही मागेपुढे विचार नाही. निर्भय आहेत. दंड केला पाहिजे हे ठरल्यानंतर मग मागे येणार नाही. दयेची याचना-बिचना इथे नाहीये. मग धर्मशास्त्रात दया नाहीये असं म्हंटले तरी हरकत नाही. न्यायी बुद्धीने एकदा दंड करायचा ठरल्यानंतर तो झालाच पाहिजे. मुलगा जरी असला स्वत:चा, तरी त्यालाही दंड करणारा पिता असला पाहिजे. असा न्याय आहे. आणि अत्यंत मृदूही अंत:करण आहे. स्वत:च्या वैयक्तिक मानापमानाकडे लक्ष नाही. राजशासनाचे महत्व जाणून त्याचे यश कायम टिकविले पाहिजे. रामांचे राज्य आहे हे. या रामांच्या राज्यात वाट्टेल तसे वागता येणार नाही. अशा असंग वृत्तीने, अनासक्तीने वागणारा जो आहे, त्याला अधिकार क्षेत्रामध्ये किती उत्तमरीतीने कार्य करता येईल याचा विचार केला पाहिजे. त्याने कोणालाही दंड केला, कोणालाही शिक्षा केली, तरी ती आणखी निंद्य ठरणार नाही. बरोबर आहे. ह्याच्या हातून अन्याय कधीही होणार नाही अशी सर्व लोकांची खात्री आहे. आणि भीति! हा न्यायी आहे. याच्यापुढे अन्याय कधीही खपणार नाही. ह्या भीतीनेही पुष्कळ लोक अन्यायापासून बाजूला होतात. अन्यायाला सहकार्य देणे हा ही दोष आहे. स्वत: अन्याय करणे हा तर दोष आहेच. पण झालेला आहे अपराध. जाऊ दे! क्षमा करा! असे नाहीये.

तेव्हा हे भारताचे दिव्य चरित्र आहे. देवानुग्रह हा याला कारण आहे. मनुष्यजन्म तरी शुद्ध बुद्धी, क्षमाशील बुद्धी ही देवाच्या कृपेशिवाय मिळत नाही. ह्याने आपल्या बुद्धीनेच निर्णय घेतलेला आहे. रामाच्या पादुकांचे राज्य म्हणजे रामांचे राज्य आहे. प्रत्यक्ष रामचंद्र आपल्याजवळ राहू शकत नाही. आपल्याला त्यांची संगती मिळत नाही, लक्ष्मण मोठा भाग्यवान आहे. त्यांच्याबरोबर राहणार, सेवा करणार. असे वाटले नसेल का भरताला ?

पण रामांनी, ''तुला राज्य करण्याची पित्याची आज्ञा आहे.'' असे सांगून संकट उभे केले. त्यामुळे चौदा वर्ष दूर राहावे लागले. पण त्याने बुद्धीचे संवर्धन केले. आपली बुद्धी विकसित झाली. पाहिजे.

धर्मराज वनामध्ये गेले. खरं-खोटं करत बसले असते, तर त्याच वेळेस लढाई चालू झाली असती. श्रीकृष्ण पांडवांच्या बाजूने होतेच. म्हणजे निर्णय होण्याच्या आधीच लढाई सुरु झाली असती. धर्मराज म्हणाले, ''नको!, आपण आपले वनामध्ये जाऊ.'' राज्य मिळविण्याकरता आणि टिकविण्याकरता मनुष्यजन्म नाहीये, हे त्यांनी जाणलेले आहे. **''कर्तव्यो धर्मसंग्रह:!'' हे मनुष्यजन्माचे मुख्य कर्तव्य आहे. धर्मसंग्रह जास्तीत जास्त करण्याकरता मनुष्यजन्म आहे.**

**सत्कर्मयोगे वय घालवावे।**

समर्थांचे सांगणे आहे. सबंध आयुष्य हे सत्कर्मामध्ये गेले पाहिजे. प्रयत्न करायचा तर त्या करता सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपल्या शरीराने, वाणीने, मनाने, आपल्या हातून चांगली कर्म किती घडली? आणि वाईट कर्म किती घडली? याचे निरीक्षण करून निजावे असे सांगतात. मी आज पशूसारखा वागलो की सत्पुरुषांसारखा वागलो हे निदान पाहावं तरी विचार करून. लोकांनी सांगायचे, निंदा करायची. मन शेवटी निर्लज्ज होऊन जातं. किती अपकीर्ती झाली, वर्तमानपत्रात जाहीर झाले तरी त्याचा परिणाम मनावर होतच नाही. तेव्हा माझा सत्वगुण वाढला की रजोगुण वाढला, की तमोगुण? माझ्याकडून कसे आचरण झाले आहे? हे पाहावं म्हणतात. रोज आत्मनिरीक्षण करून झोपावे; झोप गाढ लागेल. आणि जर एखादे अन्यायी कर्म झाले असेल तर मनाला वाईट वाटेल. आज मी अमक्याला अमुक बोललो, अमक्या विषयी अनुद्गार मी काढले, तमक्याची निंदा केली त्याच्या मनाला मी उद्वेग दिला. हे बरं झालं नाही. अशी उपरती होऊन आपल्या हातून घडलेले कर्म चांगले झाले नाही असे वाटले तर सुधारणा होण्याची शक्यता आहे.

**इथे आमचे सगळेच उलटे चाललेले आहे. आपण कसे वागतो इकडे लक्ष नाही. पण दुसरा कसा वागतो तिकडे मात्र आमचे लक्ष आहे. त्याने अमुक केलं, त्याने दुसऱ्याचे पैसे दिले नाहीत, त्याने द्वेष केला. आणि ते सुद्धा तिसऱ्याच्या जवळ जाऊन सांगायचे. काही त्याचा उपयोग नाही. निर्भयपणा असेल तर त्याच्याच जवळ जाऊन, ''का असं केलंस?, बोललास?'', वगैरे विचारायला काय हरकत आहे?** ''तू अशारितीने पाप का केलंस? त्याला टाकून का बोललास?'', हे त्याला विचारले पाहिजे. ज्याचा काहीही उपयोग नाही अशारितीने एकाचे पापपुण्य दुसऱ्याला

सांगणं, याचा काय उपयोग आहे ? स्वत:चे आयुष्य फुकट चाललं आहे त्याचा काहीच विचार नाहीये. स्वत:च्या पापपुण्याबद्दल विचार नाहीच; बंदच आहे.

तर मनाने विचार कसा करावा ? हे महापुरुष सांगताहेत. स्वत:चे आत्मनिरीक्षण हे मुख्य सांगितलं आहे. अंत:करण सारखं जे बाहेर जातय ते आत गेलं पाहिजे. त्या अंत:करणाने स्वत:चेच जर परीक्षण केले तर शुद्धी शक्य आहे. त्यात काही प्रतिबंध येत असतील तर ते सांगता आले पाहिजेत. कसा विचार केला म्हणजे ते प्रतिबंध दूर होतील ?

रामांनी विचार केला, ''कैकयीचं माझ्यावर प्रेम आहे. तुम्ही उगाच कशाला तिला नावं ठेवता ?'' म्हणजे निंदा करणारे गप्प बसले की नाही ? ''मला काही काळजीत तिनं टाकलं नाही.'' हाच विचार करून त्यांनी मनाचे समाधान करून घेतल्यावर लोकांना काही बोलायची काय जरूर आहे ? कैकयीने रामाला वनात पाठीवलं म्हणून तिला नावं ठेवणारे लोक रामांना राज्य मिळवून देणारे आहेत का ? उगीच आणखी शिष्टमंडळ गेलं, अमुक गेलं, तमुक गेलं, काय उपयोग काय आहे ?

आत्मनिरीक्षण करून आत्मोद्धार करून घेतला पाहिजे. हेच संत महात्म्यांचे सांगणे आहे. आणि त्याकरता तो 'महापुरुषसंश्रय:' लागतो.

ज्ञानेश्वरीच्या शेवटी संतांचे वर्णन ज्ञानराजांनी केले आहे. तीन ओव्या पसायदानात मुद्दाम घातल्या आहेत. संतांचे महत्व त्या तीन ओव्यांमध्ये मुद्दाम दाखीवलेलं आहे. ईश्वराचा प्रसाद असावा वगैरे शेवटी आहेच. पण संतांची कृपा पाहिजे. तर या दृष्टीने व्यास महर्षींनी मोठमोठ्या राजेलोकांची चरित्रं सांगितली. पण त्यांच्यावर जगदंबेची कृपा होती म्हणून ते मोठे झाले आणि 'मोठे होणं' याचा अर्थ अंत:करणातले रजोगुण, तमोगुण कमी झाले पाहिजेत. त्याशिवाय मोठेपणा नाहीये. चार लोक जसं वागतात तसं वागत जाऊन उपयोग काय आहे ? तेही तसे वागतात मग आमची तसं वागण्यात चुक काय झाली ? चुक झालीच नाही म्हटल्यावर सुधारणा होणं शक्य कसे आहे ? ते राजेलोक सर्वसामान्यांप्रमाणे जन्माला आले. पण सर्वांपेक्षा ते निराळे राहिले. जगदंबेची कृपा संपादन केली, आणि संसारातून मुक्त झाले. मोक्ष मिळीवला. सर्वही दु:खातून मुक्त होणं म्हणजे मोक्ष आहे. हे कसं शक्य आहे ? कोणच्या राज्यशासनाला किंवा न्यायधिशाला अशी लोकांना दु:खातून मुक्त होण्याची आज्ञा देता येईल ? असा कोण अधिकारी आहे ? तो कोणीही असला तरी त्याच्या पूर्वसंचितानुसार प्राप्त झालेली सुखदु:खं कोणीही दूर करू शकत नाही. ज्याचा त्याने प्रयत्न केला पाहिजे.

**उद्धरेत आत्मानात्मानम्।**

हा महत्वाचा सिद्धांत आहे. **आपला आपण उद्धार करून घ्यायचा म्हणजे आपल्या मनाचे निरीक्षण** रोज केले पाहिजे. पशूप्रमाणे मी वागलो आज ? की सत्पुरुषांप्रमाणे माझं वर्तन झालं आहे ? हे विचार करून शांत झोप येते, नाहीतर येत नाही. माझ्या विरुद्ध जो वागला आहे, त्याला सरळ कसे करता येईल असे विचार जर मनात आले, तर झोप येणारच नाही. त्याचा उपयोग नाही. **म्हणून खरा आपला उद्धार आपणच करून घ्यायचा.**

सर्वही संत महात्मे जगदंबेच्या कृपेने ईश्वररुप झाले. ईश्वराला दु:ख नाही. कर्म नाही आणि दु:ख नाही. मानवाला, देवांना, गंधर्वांना, ऋषींना, सगळ्यांना दु:ख आहे. कारण कर्म आहे. धर्माधर्म ज्याला आपण म्हणतो – पाप आणि पुण्य – हे घडलं आहे, घडतं आहे ना ! नुसतं घडलंय असं नाही. त्यात भर पडते आहे. क्रियमाण कर्म जे आहे रोजचे, तेही पापपुण्यात्मक आहे. साठा तर आहेच आहे भरपूर. संचित आहे. पण त्या संचितामध्ये ह्या क्रियमाण कर्मफलाची रोज भर पडते आहे. त्यामुळे कर्म असेपर्यंत त्याचे फल भोगायचे. हा सृष्टीचा नियम परमेश्वराने ठरवून टाकलेला आहे. आणि तो बाजूला होतो. ईश्वर म्हणजे व्यवस्थापक आहे. व्यवस्था करु शकतो. 'करावे तसे भरावे' म्हणतात. हा नियम घालून ठेवलेला आहे. त्याप्रमाणे जीवाने जर पाप केले असेल, तर पापाचे फळ मिळेल. पुण्य केले असेल तर पुण्याचे फल मिळेल. त्याचं त्याने असं जर मनाने ठरीवलं असेल की पुण्यकर्म जास्तीत जास्त करण्याचा प्रयत्न करायचा तर तसे सुख मिळेल. मनात अनेक प्रकारच्या वासना असतात. अशुभ वासना मनात असतील, तर पापाचरणाकडे प्रवृत्ती होती. नाही असं नाही. पण ते आवरावं. राग येणार नाही असं नाही. राय यायचाच. आपल्या इच्छेविरुद्ध वागणाऱ्याबद्दल राग येणं स्वाभाविक आहे. पण राग आवरण्याकरता प्रयत्न करायचाय. राग आवरत नाही असं होऊ नये. आवरता आला पाहिजे. नाथ महाराज म्हणतात 'राग येऊच नये.' पण ती त्यांची योग्यता आहे. संतांनी शांतीचा इतका अभ्यास केलेला आहे, की त्यांना राग येतच नाही. नाथमहाराज म्हणतात.

**जरी अंतरी क्रोध आला।**
**तरी तो अशांतची जाहला।।**

पण हे त्यांनीच सांगावं. बाहेर दाखीवला नाही राग; पण आत आलेला आहे. ओळखता येतो. त्याच्या मुद्रेवरून त्याला राग आला की नाही हे कळतं. शत्रु मनुष्य ओळखता येतो. मग त्याने काय राग सोडला ? शांत म्हणायचे ? नाथमहाराज म्हणतात, ''नाही''. त्याला

शांत म्हणता येणार नाही. लोकांनी म्हणू नये हा मनुष्य रागीट आहे म्हणून त्याने राग आवरून धरलाय. म्हणजे राग आला नाही असे नाही. राग आवरणं ही सुद्धा आणखी खालचीच पातळी आहे. येऊच नये राग. ज्या ज्या ठिकाणी आपल्याला मान देणारी मंडळी आहेत, आदरभाव दाखविणारी मंडळी आहेत–

**जेथ स्वगोत्र सोयरे स्वजन। जिही दिधला अति सन्मान।।**
**तया देखता अपमान। अनुद्विग्न जो साहे।।**
**त्यापासी शांती संपूर्ण उद्धवा। निश्चयेसी जाण।।**
**लोकेषणे लागे ज्याचे मन। अशांती जाण तेथ।।**

ही भूमिका मिळवून सांगताहेत नाथमहाराज. सर्व मंडळी आदरभाव दाखिवणारी असताना त्या ठिकाणी अपमानाचा प्रसंग आला तरी ज्याच्या मनामध्ये क्रोध नाही, त्याच्याजवळ संपूर्ण शांती आहे. इतका माझा मानसन्मान होतो आणि आज अपमान कसा झाला? मानापमान नाही काही नाही. 'मानापनानयोस्तुल्य:।' हे ज्ञानी माणसाचे, गुणातीताचे लक्षण आहे.

सत्वगुण जास्तीत जास्त वाढवण्याच्या अगोदर प्रयत्न करायचा. मग सगळेच गुण टाकून द्यायचे. गुणातीत व्हायचंय. गुणामध्ये असणारे तशाप्रकारची कर्मे करीत राहाणे म्हणजे संपणार नाही जन्म. तसा सत्वगुण वाढवावयाचा आपल्याकडून जास्तीत जास्त प्रयत्न झाला आणि देवाच्या कृपेने सत्वगुण वाढला, तर रजोगुण, तमोगुण आपोआप कमी होतात. आणि शांती मिळते. औदार्य उत्पन्न होते. उदार वृत्ती. दु:खामध्ये असणाऱ्याला धनाने, शरीराने, वाणीने उपयोगी पडणं, धनदान करणं हे औदार्य आहे. ही सत्वगुणाची शुद्धी आहे. लोभ राहिला नाही. माझे माझे, मी मिळीवलेले धन आहे अशी जर वृत्ती असेल तर त्या माणसाकडून एक पैसाही दिला जाणार नाही. मलाच कमी पडेल हो. तुम्ही जर मागायला आलात, मी असं जर द्यायला लागलो – कोणा एखाद्या दात्याचे नाव प्रसिद्ध झाले तर शेवटी सांगावे लागते, "ते घरामध्ये नाहीत, भेटणार नाहीत. असे सांगा कोणी आले तरी." प्रत्येकाला देणगी देऊन कसं चालेल? मला पुरलं पाहिजे.

तर ही जी धनाबद्दल आसक्ती आहे – लोभ ज्याला आपण म्हणतो; तो कमी होणं, लोभवृत्ती कमी होणं हे सत्वगुणाचे लक्षण आहे. मिळीवला पुष्कळ पैसा आणि बँकेतच ठेवला ना! माझा, माझा म्हटला तरी रोज काही इतका पैसा लागत नाही. कितीही ऐषआराम करायचा म्हटला तरी इतका पैसा लागणार नाही. पण तो काही दान करायची वासना होणार नाही. कारण लोभ आहे ना! हे द्रव्य माझे आहे. गेलं तर काय होईल?

तर हे जे गुण बुद्धीमध्ये उत्पन्न होतात, ते सत्वगुणाचे लक्षण आहे. सत्वसंशुद्धी ही दैवीसंपत्तीचे लक्षण आहे. आणि त्याच्याकरता विवेक उत्पन्न झाला पाहिजे. ही विवेकसंपन्न बुद्धी ही देवाची देणगी आहे. ''देणे ईश्वराचे।'' सांगताहेत समर्थ. मनुष्याच्या प्रयत्नाने नाहीये.

तर जनमेजयासारखे सगळे राजेलोक – जगदंबेच्या कृपेने त्यांना शुद्ध बुद्धी मिळाली. बुद्धी शुद्ध झाल्यानंतर दु:ख राहातच नाही.

**चित्त शुद्ध पै। शत्रु मित्र होती।।**

तुकाराम महाराजांचा एक अभंग आहे.

ऋषीमंडळी नेहमी अरण्यामध्येच राहायची. त्यांना कोणाचे संरक्षण? त्यांनी योगाभ्यासाने, प्रयत्नाने, विवेकाने जी आपली बुद्धी बनीवली, त्या बुद्धीत कोणाची हिंसा नाहीये. मनात कोणाचाही द्रोह नाही. त्यांचे मन अहिंसात्मक बनून गेले आहे. शरीराने कोणाला मारणे नाही, वाणीनेही मारणे नाही. वाणीनेही हिंसा होते ना! रागाच्या भरात आपण दुसऱ्याला वाट्टेल तसे बोललो म्हणजे त्याच्याही मनाला लागते ना! आपल्याला कोणी वाईट वाटेल असे बोलल्यावर वाईट वाटतं, मग आपण तसे दुसऱ्याला का बोलावे? तो संयम जर बुद्धीमध्ये राहिला, तर तो धर्म आहे.

तर हा सगळा विचार करून ती महर्षी मंडळी निर्भय असतात. बायका मुले आहेत, घरात धान्याचे कोठार नाही. कोणाकडून सामान आणायचे? बँका नाहीत काही नाही. चिंता नाही. तुकाराम महाराजांना बायको होती, मुले होती, सगळं होतं. पण चिंता नाही. आणखी पुष्कळ संपत्ती, पैसा असूनसुद्धा चिंता आहे. कोण श्रेष्ठ? संत कोण आणि असंत कोण याचा निर्णय याच्यावरून लागतो आहे. पैसा पुष्कळ असला म्हणजे तो संत ठरत नाहीये. पैसा पुष्कळ असून झोप नाहीये. राजाचीही भीती आहे. चोरांची भीती आहे. पण आपले लोक जे गरीबीमध्ये आहेत, त्यांना सहाय्य करायला काय हरकत आहे, ते मागायला आले तर? ही सगळ्यांची भीती आहे. आणि झोप नाही. चिंता आहे. अनेक अनर्थ आहेत त्या धनामध्ये.

तर त्या अनर्थाचा संबंध नाही. चिंतामुक्त आहेत ऋषीमंडळी. निर्जन स्थानामध्ये त्यांचे आश्रम होते. तिथे राक्षस राहात होते. पण त्यांना भीती नव्हती. याचे कारण म्हणजे त्यांनी वैर संपवले आहे. आपली बुद्धी अत्यंत शुद्ध, अहिंसात्मक बनीवली. इतकी की त्यांच्याजवळ वैर करणाराच राहात नाही. त्यांच्या आश्रमात राहणारे परस्पर विरोधी स्वभावाचे जे जीव आहेत, तेही आपले वैर सोडून देतात. पतंजली महर्षी सांगतात.

## तत्सन्निधौ वैरत्यागः।

संस्कृत भाषेपासून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजशासनाने इतके दूर नेले आहे, की संपली पुराणं. त्या पुराणामधून ही सगळी वर्णनं आली आहेत. पण पुराणे कोण वाचतो ? प्राचीन श्रेष्ठ माणसे कशी होती हे जाणून घेण्याची जिज्ञासाच संपलेली आहे. व्यासांसारख्यांनी लिहीलेली पुराणे वाचण्याची योग्यताही नाही. इतिहासही बदलून लिहीला आहे. खरा इतिहास आम्हाला माहीतच नाही. ज्ञानापासून आपण किती दूर गेलो, याच्याबद्दल आमच्या मनाला काहीही वाटत नाही. हा काय स्वराज्याचा फायदा झाला म्हणायचे का ? ज्ञान वाढायला पाहिजे ना ? तर या वाङ्मयात काय, ऋषींच्या ग्रंथांमध्ये काय, सगळं लिहून ठेवले आहे. हे सगळे प्रयोग आहेत. प्रयोगशास्त्र आहे. प्रयोग करून बघितल्याशिवाय हे चुकीचे आहे अशी निंदा करून उपयोग नाही. तुम्ही तिथपर्यंत पोहोचणारच नाही. कधीच पोहोचू शकणार नाही. एखादा महात्माच जाऊ शकेल. प्रयोग करून सुखी होईल.

तर त्या ऋषींनी आपली बुद्धी इतकी अहिंसात्मक बनीवली आहे, की त्यांच्या सानिध्यात येणारे पशूपक्षीसुद्धा वैरभाव सोडून देतात. वाघ, गाय, साप, मुंगूस, सगळे एकत्र आहेत. स्थानाचे महत्व आहे. अहिंसेचा प्रसार इतका झाला आहे, की ते स्थान अहिंसामय बनून गेले आहे. त्या जागेमध्ये येणारे क्रूर पशूसुद्धा आपली क्रूरता विसरून जातात. आनंद आहे. गाय आणि वाघ एका ठिकाणी राहाताहेत. हे कोण करू शकेल ?

नुसतं नाही, नाही म्हणून नास्तिकवृत्ती दाखवण्यात काहीही अर्थ नाहीये. प्रयोग करून पाहिला पाहिजे. प्रयोग करून पाहूया. इतकी तर शास्त्राबद्दल आस्तिकबुद्धी ठेवली पाहिजे. महात्म्यांच्या वचनाबद्दल आस्तिक बुद्धी ठेवली पाहिजे. आपल्याला जर प्रयोग करता येत नसेल तर महात्म्यांकडून तो प्रयोग कसा करायचा याचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. प्रयोग करण्याकडे तरी आस्तिक बुद्धीचा उपयोग केला पाहिजे. विमाने पूर्वी होती, हे पाश्चिमात्य संशोधकांनी सिद्ध केलं आहे. त्यांनी संस्कृत ग्रंथ वाचले आहेत. जर्मनीमध्ये कितीतरी संस्कृत ग्रंथ नेले. इंग्रजांनी नेले, अभ्यास केला. आणि त्या प्रमाणे प्रयोग करून सगळे तयार केले आहे.

जगदंबेच्या कृपेने या सर्व राजेलोकांनी आपली बुद्धी शुद्ध करून घेतली. आणि सर्वही दुःखातून ते मुक्त झाले आहेत. सर्व दुःख जाऊ शकतात हा अनुभव त्यांनी घेतला. **त्याकरता त्यांची चरित्रं व्यास महर्षीनी आपल्यापुढे मांडली आहेत.** रामायण, महाभारताचे अनुवाद आता होताहेत. भावार्थ रामायण नाथमहाराजांनीही करून ठेवले आहे. तेवढं जरी रोज थोडावेळ वाचायला मिळालं तरी मनावर पुष्कळ चांगला परिणाम

होईल. त्याकरता जगदंबेच्या कृपेने बुद्धी शुद्ध होऊन पुन्हा मनुष्यजन्म मिळू शकतो. पुन्हा आपला अभ्यास सुरु होतो. सर्व दु:ख जाणं हे फल आहे. मिळवायचंय आपल्याला. प्रयत्न त्याकरता करायचाय. तसा प्रयत्न करणारा कितीही कष्ट पडले तरी तिकडे लक्ष देत नाही. सर्व दु:खातून निवृत्त होण्याकरता थोडीशी दु:ख सोसायला काय हरकत आहे ? कायमची नोकरी मिळेपर्यंत तात्पुरती नोकरी करायची आहे. पण ती खरी नाही. कायमची नोकरी मिळाली पाहिजे. याकरता मुमुक्षा उत्पन्न होते. महात्मे भेटतात. खरा मुमुक्षु कोण आहे याच्या ते शोधात असतात. खरा बुद्धीकडे लक्ष देणारा कोण आहे ? बाहेरच्या व्यवहार, अर्थ, कामाकडे लक्ष द्यायचे,की मनुष्यजन्म मिळाल्यानंतर आपली बुद्धी सुधारण्याकडे लक्ष द्यायचे ? हे आधी ठरले पाहिजे. धर्मराजादि पांडवांनी तिकडे लक्ष दिले. बुद्धी महत्वाची आहे. बुद्धी आपल्याबरोबर येणार आहे. बाकीचे मिळवलेले अर्थ, काम वगैरे इथेच राहणार आहे. पुढच्या जन्मात आपण जे शरीर धारण करू त्या शरीरात आपली बुद्धी येणार आहे. चांगली बुद्धी घेऊन जर आपण दुसऱ्या जन्मात गेलो तर उन्नतीचे उपाय आपण करू शकतो. मिळवू शकतो. महात्मे लोक हाच एक विचार सांगताहेत. बुद्धी चांगली बनवा.

**बुद्धी दे रघुनायका।**

नको ! दुसरं काही देऊन नकोस. चांगली बुद्धी आम्हाला द्या. हे देवाजवळ मागायचं आहे.

**कायेन वाचा मनसेंद्रियेवा।**
**बुद्ध्यात्मनावा प्रकृती स्वभावात्।।**
**करोमि यद्यत् सकलं परस्मै।**
**नारायणायति समर्पयामि।।**

**।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त।।**

## चौथा दिवस

भक्ती मागून घ्यावी लागते. त्याकरताही तपश्चर्या करावी लागते. मोठे मोठे सात्विक महात्मे ईश्वराचा आपल्यावर अनुग्रह व्हावा म्हणून उपासना करतात. आणि ईश्वराजवळ हेच मागतात–

**तुझा विसर न व्हावा।।**

संसारात खुप दु:ख आणि कष्ट आहेत. डोळ्यासमोर हे असताना परमेश्वराचे विस्मरण होऊ नये एवढेच मागणे आहे. व्यासमहर्षी हे स्वत:ला कृतकृत्य समजताहेत. ''जगदंबेची कृपा माझ्यावर झाली आणि मी धन्य झालो.'' असे ते म्हणाले. सर्व वेदशास्त्रांचे ज्ञान व्यासमहर्षींना आहे. सामवेद, ॠग्वेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद असे वेदांचे चार भाग ज्यांनी केले, त्यांची ज्ञानशक्ती किती मोठी असली पाहिजे ! पुराणांची रचना केली. महाभारताची रचना केली. पण त्यांच्या मनात भगवत्‌भक्ती, भगवत्प्रेम जे उत्पन्न झाले, त्याचे त्यांना समाधान आहे. आपल्याजवळ किती ज्ञान आहे, लोकांना मार्गदर्शन करण्याची किती शक्ती आहे, हा विचार नाही त्यांच्या मनात. आपल्या ज्ञानापेक्षा आपल्याला भगवतीचे प्रेम मिळाले आहे, त्याची धन्यता त्यांना वाटते. म्हणून जनमेजय राजाला तेच सांगताहेत.

भागवतामध्ये शुक्राचार्यांनी कथा दिली आहे. ती सांगितली आहे. वृत्रासुर म्हणजे असुर होता. पण पूर्वजन्मात मोठा भगवत्‌भक्त होता. परंतु पार्वतीच्या काही शापामुळे असुराच्या जन्माला आला. तो दैत्यांचा सेनापती झाला. इंद्रादिक देवतांबरोबर युद्ध करण्याचा त्याच्यावर प्रसंग आला. इंद्राची आणि त्याची गाठ पडल्यावर त्याने सांगितले, ''तुम्ही हे राज्य, धन, मान यातच रमा. आम्हाला याची जरूरी नाही. जय मिळावा, राज्य मिळावे अशी आम्हाला काहीही इच्छा नाही. आम्ही काही इच्छा धारण करून जर प्रयत्न करू लागलो, तर तो आमचा प्रयत्न फुकट जातो. देव आमचे ते प्रयत्न यशस्वी होऊ देत नाहीत. आणि ही आम्ही आमच्यावर देवाची कृपाच समजतो. आम्हाला ते अकिंचन बनिवतात. एक परमेश्वराच्या आधाराशिवाय दुसरे काही नाही. पण तो आधार मनाला इतका आनंददायक आहे, की आम्ही अकिंचन आहोत ते बरं आहे. देवेंद्र!, तुम्ही राज्याच्या आसक्तीमध्ये सापडलेले आहात. तुम्हाला अशी वासना होणार नाही. भगवंतांनी लवकर मला बोलवावं; त्यांच्याजवळ वैकुंठलोकात मला राहायला मिळावं एवढीच इच्छा आहे. जय मिळाला नाही तरी चालेल. प्राण गेले तरी हरकत नाही.'' ही भावना मनामध्ये आहे.

परमेश्वराचे स्मरण अखंड राहिले पाहिजे असे **तुकाराम महाराज** म्हणतात. कोणतीही सांसारिक वासना मनामध्ये नाहीये. सर्वही वासना घालिवण्याची शक्ती या भगवत्‌भक्तीमध्ये आहे. हे त्या भक्तांच्या चरित्रांवरून आपल्याला समजून येते. संत महात्म्यांची चरित्रे मनाला आनंद, समाधान देणारी आहेत. त्यांचे अंत:करण निर्वासन कसे झाले ? हा मोठा आश्चर्याचा विषय आहे. तुकाराम महाराजांचा अखंड भगवत् भजनाचा व्यासंग चालू आहे. सर्वच संत महात्मे भगवत्‌भक्तीच्या आनंदात निमग्न असतात. संसार विसरून गेलेले असतात. तेव्हा व्यासमहर्षी जनमेजय राजाला म्हणाले, ''तुला ज्या राजांची चरित्रे मी सांगितली, ते मोठे देवीभक्त होते. देवीच्या कृपेने संसारातून ते मुक्त झाले. संसारातून

बाहेर पडणे फार कठीण आहे बाबा! अनंत जन्मांच्या अनंत वासना मनामध्ये इतक्या भरलेल्या आहेत, पुन्हा पुन्हा त्या वासना अधिकच होत जाताहेत. तृष्णा, आशा, वासना ज्याला म्हणतो.''

ध्रुवाच्या उदाहरणात सांगितले आहे की शेवटी त्याला पश्चाताप झाला. माझ्या मालकीचे राज्य मला मिळाले पाहिजे ही एक मनामध्ये इच्छा, वासना आहे. भगवत्‌भक्ती मोठी आहे. शरीराची पर्वा नाहीये. शरीर नाही राहिले तरी हरकत नाही. पण भगवंताची उपासना, जप, ध्यान हे अखंड चालू आहे. पण इतकेही करून त्याला वर मिळाला, ''तुझ्याकरता ध्रुवपद ठेवले आहे, तिथं जाऊन राहा तू. सर्व लोकांत उच्च स्थान आहे. सर्व नभोमंडल, ग्रहमंडले, नक्षत्रमंडले तुझ्या भोवती फिरताहेत. तुझे स्थान स्थिर आहे.'' स्वतंत्र वर त्याच्याकरता दिला. वडिलांचे राज्यही त्यालाच मिळणार होते. असे सांगून भगवान गेले. आणि मग त्याच्या मनामध्ये विचार उत्पन्न झाला, ''अरेरे!, आपण काय मागून घेतले. माझ्या बुद्धीमध्ये देवांनी काहीतरी दोष निर्माण केला म्हणून मला असे मागण्याची इच्छा उत्पन्न झाली.'' नसताना मागायला काय हरकत आहे? पुष्कळ समृद्धी, कुठे काही कमी नाही. मग मला हे पाहिजे, ते पाहिजे असे मागणे चमत्कारिक दिसते. हा लोभी मनुष्य आहे असे म्हणतील. कितीही मिळाले तरी याचे समाधान नाही. पण ज्याच्याजवळ काहीही नाही, अकिंचन जो आहे, त्याने जर काही मागितले, तर त्यात वावगे काय आहे? मुलेबाळे आहेत, आईवडील आहेत, त्यांची काळजी वाटून काही देवाची उपासना करून देवाजवळ मागितले तर त्यात वावगे आहे का नाही. हा ही एक मोठा विचारणीय प्रश्न आहे. वासना असावी किंवा नसावी? निर्वासन ज्यांचे अंत:करण झालेले आहे असे जे महात्मे आहेत, त्यांचे चरित्र पाहून, त्याचं चिंतन करून आपण हे ठरविले पाहिजे. वासना संपते का? करायला हरकत आहे किंवा नाही हा विचार वेगळा आहे. पण मन संपूर्णपणे निर्वासन होऊ शकते का? हा ही मोठा विचारणीय प्रश्न आहे. वासना संपत नाहीत. जशी जशी इच्छा पूर्ण होत जाईल –

**लाभे लोभोहि वर्धते ।**

आचार्य महाराज सांगतात. नाही म्हणून मागायला काय हरकत आहे? असे समजून आपण प्रयत्न केला. चार लोकांजवळ मागितलं, देवाजवळ मागितलं – काही नाही मला अन्न नाही, पाणी नाही, रहायला जागा नाही म्हणून मी मागितलं. पण मग आवश्यकतेप्रमाणे मिळाल्यावर थांबेल का ती आमची बुद्धी? हा ही एक प्रश्न आहे.

संत मागत नाहीत असं नाही. निर्वाहापुरतं पुष्कळ झाले म्हणतात. पोटापुरतं मागायला हरकत नाही किंवा मिळवायला हरकत नाही. पण ते पोटापुरते होत नाही. सगळं जीवनभर

पुरले पाहिजे. इतकी मंडळी आहेत सगळी. प्रतिपाळ आहे इतका. यांना पुरले पाहिजे. यांचे जीवन सुखाचे झाले पाहिजे. म्हणजे वासना या थांबत नाहीत कधी. संत महात्म्यांनी आपल्या वासना या मर्यादित ठेवल्या आहेत. त्या मर्यादित राहिल्या कशा ? त्यांच्या मनाने गडबड का केली नाही ? आणि आमच्याच मनाने गडबड का करावी ? ईश्वराच्या कृपेने किंवा काही प्रयत्नाने आमच्या वासना जशा जशा पूर्ण होत जातात, तशा तशा त्या वाढत जातात. आणि वासना वाढू लागल्यावर मनाला काही संयम राहात नाही. आपल्या मनात उत्पन्न झालेली इच्छा पूर्ण करण्याकरता धर्म अधर्माचा विचारही मनातून निघून जातो. हे वासनेचे साम्राज्य आहे.

प्रल्हादजी निर्वासन अंत:करणाचे आहेत. मनात काहीही वासना नाही. शरीर जाणार आहे. बाप जीवावर उठलेला आहे. बाप काही सामान्य नाही त्रैलोक्याचा राजा आहे. त्याच्या तोंडातून जी वाणी निघेल ती खरी होते. सगळे देव, दैत्य, मानव, त्याच्या ताब्यामध्ये आहेत. अशी बापाची शक्ती आहे. आणि तो मला मारणार आहे. हे त्याला समजलेलं आहे. दिसतंय. प्रयत्न बापाचे चालू आहेत. पण त्याला भीती वाटली नाही.

वासना अंत:करणामध्ये असेपर्यंत भीती आहे. संतमहात्मे निर्भय झालेले असतात. स्पष्ट आणि निश्चित मनाने ते सांगू शकतात. मार्गदर्शन करू शकतात. ऐकणाऱ्याचे जर काही पुण्य असेल आणि त्याने ऐकले, तर त्याचे कल्याण होते.

तर त्याच्या – प्रल्हादाच्या अंत:करणामध्ये काहीही इच्छा नाहीये. शरीर राहावे अशीही इच्छा नाहीये. ज्याने जग निर्माण केले आहे. त्याच्या इच्छेप्रमाणे सगळे चालले आहे. माझ्या प्रयत्नांनी मी जिवंत राहावे अशी काही इच्छा नाही. इतकं सगळं त्याने ईश्वरावर सोपवून दिलेलं आहे. ईश्वराच्या इच्छेप्रमाणे कार्य चालू आहे. असा पूर्ण विश्वास आहे. आणि शेवटी त्याला प्रतिस्पर्धी अशी त्याच्या पित्याची शक्ती होती. ती व्यर्थ ठरली आहे. काही त्या शक्तीचा उपयोग झाला नाही. शस्त्रांत्रांचा उपयोग झाला नाही. किती प्रयत्न केले त्याने ! जेवढे जेवढे नाश करणारे पदार्थ होते, त्या सगळ्यांचा उपयोग केला. पण प्रल्हादाच्या केसालाही धक्का लागला नाही. अग्नीमध्ये मनुष्याच्या शरीराप्रमाणेच सगळे पदार्थ दग्ध होऊन जातात. त्या अग्नीमध्ये टाकले पण काही उपयोग झाला नाही. प्रल्हादही निर्भय आहे; आणि तोही जास्ती अभिमानाला, अहंकाराला पेटलेला आहे. असे चालू आहे. पाण्यामध्ये टाकले. विष दिले. सगळे प्रयोग करून पाहिले. अभिचारीक मंत्राचे प्रयोग केले. पण काही उपयोग झाला नाही. जगातली कोणचीही शक्ती प्रल्हादला मारू शकली नाही. हे हिरण्यकश्यपूला अनुभवाला आलेले आहे. पण माघार नाहीये. अहंकार ! हट्ट

ज्याला म्हणतो आपण. साधारण एकदा हिरण्यकश्यपूला वाटलं. आपल्यापेक्षा मोठी शक्ती जगामध्ये असावी. याला मारण्याचा मी इतका प्रयत्न केला. पण हा मरत नाही. कोण याचे संरक्षण करतोय ?

श्रीमंतांच्याजवळ हुजरे असतातच. असा नुसता विचार मनात येताच त्यांनी हिरण्यकश्यपूला सांगितले, ''राजेसाहेब!, घाबरण्याचे काही कारण नाही. आपले गुरुमहाराज थोडे बाहेर गेलेत. ते आले म्हणजे आपण सर्व ठरवू. ह्याला मारायला काय वेळ आहे! आपण सगळं त्रैलोक्य जिंकलेले आहे; इतकी शक्ती आहे.'' म्हणजे अहंकार वाढीवणारीच मंडळी जवळ असतात. श्रीमंतांना विवेक सांगणारी, त्यांचा अहंकार कमी करणारी मंडळी भेटत नाहीत. या अहंकारामुळे शेवटी हिरण्यकश्यपू जिवंत राहू शकला नाही. त्याला शेवटी ''विनाशायच दुष्कृताम्।'' ही प्रतिज्ञा आहे देवाची. असे जे सज्जनांचा छळ करणारे लोक आहेत, ते जिवंत राहू शकणार नाहीत. त्यांचा देहात्मवाद आहे, आमचाही देहात्मवाद आहे. त्यांचा देह राहणार नाही. त्यांची बुद्धी राहील पण ती बुद्धी चांगली राहील की नाही हे सांगता येत नाही. प्रल्हादाचा देह गेला तरी त्याला भीती वाटली नाही. देह जाऊ दे म्हणाला. देह जाणारंच आहे. हिरण्यकश्यपूने आज मारलं नाही तरी पुढे कायमचा थोडाच देह राहणार आहे? हा विवेक आहे. देह असेपर्यंत मात्र शुद्धबुद्धीने परमेश्वराचे चिंतन करणं, ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे वागणं, एवढं आपण आपलं कर्तव्य करायचे आहे.

प्रल्हादाच्या मनात एवढी अहिंसा आहे, की प्रत्यक्ष पिताच मारण्याचा प्रयत्न करूनसुद्धा त्याच्या मनात पित्याचा नाश व्हावा असा विचारसुद्धा आलेला नाहीये. त्यामुळे हिरण्यकश्यपूची शक्ती निष्प्रभ झाली आणि त्याचा नाश झाला. भगवंतांना राक्षसजातीचा राग आला. तो शांत व्हावा म्हणून प्रल्हादाने प्रार्थना केली. ब्रह्मदेवांनी लक्ष्मीदेवींना भगवंतांचा राग शांत करायची प्रार्थना केली. ते म्हणाले, ''आम्ही त्यांचा राग पाहून घाबरलोय. आम्हाला जवळ जाता येत नाहीये.'' लक्ष्मीने लांबूनच जाऊन पाहिलं. ती म्हणाली, ''असे रुप मी यापूर्वी कधीही पाहिलेले नाही. तुम्ही जाणे आणि तुमचा देव जाणे.'' मग ब्रह्मदेवाने प्रल्हादला तयार केले. ब्रह्मदेव म्हणाले, ''तुझ्या पित्यावर देव फार रागावलेत. पण तू त्यांचा राग शांत कर.'' म्हणजे कोणालाही देवाचा राग शांत करता आला नाही, तो हा पाच वर्षाचा मुलगा शांत करू शकेल असा विश्वास वाटलेला आहे ब्रह्मदेवांना. इतकी प्रल्हादाजवळ मोठी शक्ती आहे. कारण अंत:करणात अहिंसेची प्रतिष्ठा झाली आहे. मारणाऱ्याबद्दलसुद्धा त्याच्या मनामध्ये द्रोह नाहीये. शुद्ध अंत:करण आहे. प्रल्हादने त्यावेळी केलेली भगवंतांची स्तुती मोठी व प्रसिद्ध आहे. प्रल्हादजींनी विचारले, ''आपण अवतार कशासाठी घेता? राग येतो तुम्हाला. राग आला नाही तर दुर्जनांचा नाश होणार नाही. पण तो राग जर कायम

राहिला तर तुमच्याजवळ कोण जीव येणार ? जीवांचे कल्याण कसे होणार ? तेव्हा जीवांच्या कल्याणाकरता, सर्वांना सुखी करण्याकरता आपण अवतार घेता. त्या असुराचा नाश करण्याचे कार्य झालेले आहे.'' तो असुर गेला म्हणून काय प्रल्हादजींच्या मनाला आनंद झाला नाही. होता तरीसुद्धा दु:ख नाही. भीती नाही. निर्वासन अंत:करणाचे हे फल आहे. मनामध्ये कोणतीही वासना शिल्लक न राहाणे, ही ईश्वराची कृपा आहे. भगवत्‌भक्तीचे हे मुख्य फल आहे. मनामध्ये कोणतीही वासना शिल्लक न राहाणे, ही ईश्वराची कृपा आहे. भगवत्‌भक्तीचे हे मुख्य फल आहे. इच्छाच मनामध्ये काही राहिली नाही. मग मिळालं काय किंवा गेलं काय ! काय वाटेल मनाला ? काही नाही. हर्षही नाही, रागही नाही, विषादही नाही, काही नाही.

तर याप्रमाणे प्रल्हादजींनी स्तुती केली आहे. शांत झाले नरसिंह. आणि ते प्रल्हादजींना म्हणाले,''प्रल्हाद !, तू काहीतरी वर मागून घे. इतक्या लहान वयात तुझ्याकडे केवढी अहिंसा आहे ! तुला मारणारा प्रत्यक्ष तुझा पिता आहे. पण काही नाही. कोणाचाही द्रोह करायचा नाही; हे तुझे नैसर्गिक मन आहे. तुझ्या तपाचं फळ आहे. काय पाहिजे तुला ?''

प्रल्हादजी म्हणाले, ''भगवंता !, मी आजपर्यंत आपल्याकडे कधी काही मागितले का ? काय पाहिजे म्हणून आपण मला विचारता ? जास्ती लोभामध्ये टाकण्याचा हा तुमचा प्रयत्न आहे काय ? मला लोभ नाही. कोणतीही कामना, कोणतीही वासना माझ्या मनामध्ये नाहीये.'' हा मनाबद्दल आत्मविश्वास आहे. हा आत्मविश्वास महात्म्यांच्या जवळ असतो. म्हणून ते निर्भय असतात. 'आपण कधीही चुकत नाही' हे ते सांगू शकतात. भगवंताची आज्ञापालन करणारे महात्मे कर्मयोगी असले तरी ते पूर्ण आत्मविश्वासू असतात.

प्रल्हादजी म्हणाले, ''मी आपला अकाम भक्त आहे. काय मागायचे हे मला समजत नाही. जगात स्थिर काय आहे ?'' मागणारा जिथे स्थिर राहू शकत नाही, तिथे मागून घेतलेले काय राहणार आहे ? सर्वच विनाशी आहे ना !

वेदांत विचार ज्याला म्हणतात, ते ज्ञान त्या महात्म्यांच्या चित्तात आपोआप प्रगट होते. ईश्वराची प्रेरणा आहे ती. भगवंताच्या भक्तीचा उपयोग काय आहे ? प्रयोग आहे तो. करून पाहा, मनातल्या वासना कशा कशा कमी होताहेत ! हा अनुभव येतोय. वासना कमी झाल्यानंतर मनाची शांती कशी आहे ? ह्याचाही विचार मनाने करायचा आहे. आणि कोणचा मार्ग बरा आहे हे ठरवायचे आहे. त्याप्रमाणे प्रल्हादजी म्हणाले, ''माझ्या मनात काहीही इच्छा नाही.'' तरीपण देवाचा आग्रह आहे. त्यांनी पुन्हा तेच सांगितले, ''माझ्या मनात कोणच्याही प्रकारची वासना उत्पन्न होऊ नये. आपण वरच देणार असाल तर हा वर द्या.'' मनामध्ये कोणच्याही

प्रकारची वासना उत्पन्न होऊ नये. **निर्वासन मन झाले पाहिजे. त्याशिवाय भक्ती होणार नाही. भक्ती करणारा मनुष्य जर मागत राहिला आणि एखाद्या वेळेला वेळ लागला मिळायला, तर, ''कशाला भक्ती केली? देवसुद्धा लक्ष देत नाही.'' वगैरे निंदा करायची तयारी आमची होते. आपली भक्ती कोणत्या योग्यतेची आहे? याचा विचार आपण करत नाही. अशावेळेस श्रेष्ठ अशा परमेश्वराचे दोषसुद्धा आपण काढतो. परमात्मा निर्दोष आहे. जगन्माता निर्दोष आहे.** त्यांच्याशिवाय जगामध्ये कोणीही दुसरे नाही. सर्व दोषांच्यात वासना हा मोठा दोष आहे. त्या वासना दोषांनी आपले मन सगळे भरून गेले आहे. तोपर्यंत भगवंताची, जगदंबेची उपासनासुद्धा आपल्याकडून होऊ शकत नाही; शुद्ध उपासना.

त्याकरता जनमेजय राजाची व्यासमहर्षींबरोबर भेट झाली आणि हळूहळू तो या मार्गाकडे वळलेला आहे. राज्यापेक्षा हे बरं. आपला पिता सर्व राज्य सोडून गेला. सात दिवसात त्याचा नाश झाला, तरी तो तरून गेला. हेच बरंय असं त्याला वाटायला लागलं. विवेक उत्पन्न झाला. भगवत्भक्तीचा प्रभाव काय आहे? याचा अनुभव हळूहळू यायला लागला. म्हणजे वैराग्य आपोआप उत्पन्न होते. राग म्हणजे इच्छा, वासना. त्याच कमी कमी होत जातात.

''कोणच्याही प्रकारची कामना माझ्या मनामध्ये उत्पन्न होऊ नये.'' – आणि त्याचे कारण त्याने सांगितले – ज्या मानवाच्या मनामध्ये कोणचीही वासना शिल्लक राहिलेली नाही, त्याची जीवदशा संपलेली आहे. तो प्रत्यक्ष ईश्वररुप झालेला आहे. अंत:करणात कसलीच इच्छा नाही. चांगलीही नाही, वाईटही नाही. अशा भूमिकेवर गेलेला ज्ञानी महात्मा जगाकरता करील का काही? त्याच्यासमोर जग कुठे आहे? लोकसंग्रह म्हणतो आपण, पण त्याचा काही संबंध नाही. ज्ञान झाल्यानंतर वासनाक्षयाचा अभ्यास करावा लागतो. मोक्ष मिळत नाही. तर प्रल्हादजी सांगताहेत, ''भगवंत! – मनातल्या सर्वही वासना ज्यावेळी दूर होतील, शुद्ध मन होईल, त्यावेळी देवाची पूजा करायची आहे, जगदंबेची पूजा करायची आहे, हे ही विसरून जातो तो. पूजा झाली की नाही; काही लक्ष नाही. झोप आली म्हणून देवाकडे लक्ष जात नाही, ते निराळे. झोपेचा नाही संबंध. पण अंत:करण इतके त्या आनंदामध्ये निमग्न झालेले आहे, की त्या आनंदामुळे सगळेही शारीरिक, मानसिक, वाचिक सर्व क्रिया आपोआप बंद झाल्या आहेत. ही स्थिती आणखी उपासनामार्गामध्ये मिळाली पाहिजे. देवाची पूजा विसरायला शिकायचंय. पण अगोदर ती करायला शिकले पाहिजे. नेमाने केली पाहिजे पूजा. जशी शास्त्राने सांगितली तशी पूजा केली पाहिजे. 'देवाला काय हो!, त्याला काही लागत नाही. तृप्त आहे तो. त्याला काही लागत नाही. त्याला जेवण लागत नाही.' आम्हाला

तेवढे लागते सगळे. असे विचार मनामध्ये येऊन उपयोग नाही. आपल्याप्रमाणे सर्व उपचार परमेश्वराला आपण दिले पाहिजेत.

नरसोबाच्या वाडीला शांतानंद नावाचे एक मोठे सत्पुरुष होऊन गेले. व्यवहारामध्ये लोकांना काही कळून यायचे नाही. वर्षातून एक दिवस ते पादुकांची महापूजा करीत. बारा-साडेबाराला महापुजेला आरंभ व्हायचा आणि महापूजा झाल्यावर मग सगळे जेवायला बसायचे. सकाळच्या वेळेला बायाबापड्यांना ते म्हणत, ''थोडेसे फराळाचे लाडूबिडू करून द्या हो मला.'' त्या करून देत. आणि ते सगळे फराळाचे घेऊन ते देवासमोर जाऊन बसायचे. ''महाराज!, आज महापूजा आहे. उशीर होणार आहे जेवायला. आपल्याला भूक लागेल,'' असे देवाला म्हणत. 'यथा देहे तथा देवे।', ही उपासना त्या वेळेलाच होते. खरी भक्ती. अशी देवाला प्रार्थना करायची आणि मग पुढचे व्यवहार व्हायचे.

आपल्याकडून कुठे हे होते? यथाविधी सगळे झाले पाहिजे. शास्त्रमर्यादेप्रमाणे झाले पाहिजे. त्याचं फल सगळं विसरून जाणे. सगळं विसरणं याचा अर्थ अहंकार नाहीसा होणं. म्हणजे सगळं विसरलं. कर्ता मी आहे अशी जोपर्यंत बुद्धी आहे, तोपर्यंत मी केले असे स्मरण आहे. मी अमुक केलं, मी तितकं केलं, मी इतका उपकार केला, अमक्याला, अमक्याला इतकं दिलं, तमुक केलं. मी केलेले आहे. हा अहंकार जोपर्यंत शिल्लक आहे, तोपर्यंत विस्मरण नाहीये. पण मनाची अवस्था बदलून टाकायची आहे. खरा विजय हा आहे की, – अनंत वासना सारख्या मनामध्ये उत्पन्न होताहेत, वाढताहेत, अनेक जन्म त्यामुळे घ्यावे लागताहेत; तरीसुद्धा त्या कमी होऊ शकत नाहीयेत. आपल्या त्या सगळ्या वासना दूर झाल्या पाहिजेत. अनुभवाने – आपल्याला दु:ख मिळतंय – अनुभवाने तरी कमी कराव्यात. पण कमी करता येत नाहीत. सवयच लागली आहे ती. एक वासना मनात आली, वाढली आणि तृप्त झाली की दुसरी मनात आलीच.

'मनोनाश' असे शास्त्रकारांनी त्याला नाव दिले आहे. इथे मनोनाश म्हणजे मनाचा नाश असा अर्थ नाही. तर मनाचा स्वभावच बदलून जाणं. जन्ममरणाला कारण असणाऱ्या अनंत वासना सारख्या वाढताहेत, तरीसुद्धा त्याच्याबद्दल काहीही आपल्याला वाटत नाहीये पश्चाताप. आपल्याला भक्ती हे वासनाक्षयाचं साधन आहे ना!

तर अशारीतीने प्रल्हादजींनी सांगितले –

**विमुञ्चति यदा कामान्मानयो मनसि स्थितान्।**
**तर्ह्येव पुंडरिकाक्ष भगवत्वायं कल्पते ।।**
**(सप्तम स्कंध दशमोध्याय श्लोक ९ - खंड पहिला)**

वासना घेऊन आम्ही जन्माला आलेलो आहोत. त्याच्यामध्ये भरच पडते आहे. मृत्यू येईपर्यंत वासना संपल्यात, मन मोकळे झाले, असे काही नाही. आणि संतमहात्मे, भगवत्‌भक्त जे आहेत, ते भक्तीच्या प्रभावाने अंत:करण एकाग्र करून मोकळे होतात. प्रल्हादजी आणखी श्रेष्ठ भूमिकेचे ज्ञानी भक्त आहेत. माझ्या मनामध्ये कोणतीही वासना, कोणचीही इच्छा राहू नये असे का मागितले याचे कारण ते सांगताहेत – मनातल्या सर्व वासना ज्याला दूर करता आलेल्या आहेत, शुद्ध ज्याचं मन झालेले आहे, तृष्णा नाही, काही आशा नाही, जीवदशा त्याची संपली, तो साक्षात भगवान् झाला.

भगवान् म्हणतात, ''ज्ञानी भक्त आणि मी यांच्यात अंतर नाही.'' तो हा ज्ञानी भगवत्‌भक्त आहे. निर्वासन अंत:करण ज्याचे झालेले आहे तो आहे. म्हणजे जीवात्मा तो राहिला नाही. जीवदशा संपली. पुन्हा जन्म, मृत्यू काही नाही. वासनाच नाही तर कर्म कुठली येणार ? वासनेमुळे कर्म होते. त्या कर्माचे फल भोगण्यासाठी नवीन शरीर धारण करणे भागच आहे. तेव्हा हा सर्वही आणखी कर्मक्षय होणे, कामक्षय होणे, मनोनाश होणे, **मनोनाश याचा अर्थ मन शांत झाले आहे**. त्याची बुद्धी अत्यंत स्थिर झाली आहे. कोणच्याही गुणांमध्ये गुंतलेली नाही. 'सात्विक कार्य केले पाहिजे', असे तरी आपल्याला वाटणार. यात लोकांचे कल्याण होणार. आपण प्रयत्न करून शाळा चालवूया! काहीतरी दवाखाना काढू या. लोकांना उपयोग होईल. परोपकार होईल. इच्छा चांगली आहे; सात्विक आहे; पण ती वासना आहे. त्यामुळे पुन्हा जन्म घ्यावा लागतो. मृत्यूच्या वेळेस जर मनात आले, ''आपल्या संस्थेचे एवढे काम झाले असते तर बरे झाले असते'', म्हणजे पुन्हा जन्माला यायला पाहिजे.

तर प्रल्हादजींचा विवेक इतका पक्का आहे. त्यांची ज्ञानभूमिका, भक्तीभूमिका इतकी पक्की आहे, की वासनाक्षय झाल्यानंतर तो जीव संपला. अहम् गेला त्याचा. अहम् गेला की जीवदशा संपली. मृत्यूच्या वेळेस जीव गेला असे आपण म्हणतो, पण जीव जात नाही. जीव कायम आहे. शरीर गेले. पुन्हा दुसरे शरीर आहे की. भगवत्‌भक्तीची पराकाष्ठा झाल्याशिवाय जीवस्वरुप नाहीसे होत नाही. तर प्रल्हादजी म्हणतात, – मागायचं झालं तर इतका विचार करून मागावं, जे मागितले असता पुन्हा मागायची पाळी येणार नाही. जन्ममरण संपलं. माझ्या वासना संपल्या म्हणजे जीवदशाच संपली. म्हणजे तुमच्या आणि माझ्यामध्ये अंतर काही ठेवू नका. ही केवढी मोठी भूमिका आहे! क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक, देहात्म विवेक त्यांचा पहिल्यापासूनच झालेला आहे. देवाची इतकी कृपा आहे. नारदांना आरंभापासूनच इतकी कृपा केली आहे, की हा जीवात्मा भगवत्स्वरूप झाला पाहिजे. गर्भामध्ये असतानासुद्धा महात्म्यांनी संकल्प करून त्याला सिद्ध करणं, केवढी मोठी पुण्याई आहे! किती जन्मांमध्ये

त्याने सत्कर्म केली असतील ! सत्कर्म ही करीत राहिलं पाहिजे सारखं. पुरे म्हणून उपयोग नाही.

व्यासांसारख्यांना महापुरूष म्हणतात. निर्वासन अंत:करण, भगवत्प्रेम हे त्यांच्याजवळ व्यवस्थित आहे. तोच अभ्यास आहे ना ! ज्ञानी महात्म्याचे वर्णन करताना आचार्य महाराज म्हणतात; – आम्ही भगवान् आहोत असा नुसता अभिमान बाळगून आम्ही आहोत. पैसा आहे आमच्याजवळ. सत्ता आहे. चार लोक मानताहेत. केवढे भाग्य आहे आमचे ! 'नाही !' म्हणतात आचार्य. तुमचं भाग्य नाही. अनिकेत – घर केले की वासना आल्याच. कुठेतरी झाडाखाली राहायचे. चिंतन करायचेय भगवंताकडे मन लागलेले आहे; कुठेही बसल्याबरोबर ध्यान लागते आहे. भंडारा डोंगरावर तुकाराम महाराजांनी जाऊन एकदा 'जय जय रामकृष्ण हरि ।', अशी सुरुवात केली, की संपलं ! 'देहदेहात्म विस्मृती: ।' देहाची आठवण नाही, घराची आठवण नाही. आत्मीय - स्त्री-पुत्र - अहंताही गेली आणि ममताही गेलेली आहे. दोन्ही दोष गेले. अहंकारही नाहीसा झाला, आणि त्या अहंकारामुळे माझं, माझं म्हणून किती ममता उत्पन्न झाली आहे, वासनारुपाने, ते सगळेही विसरून जाण्याचे सामर्थ्य त्या भगवत्भक्तीमध्ये आहे. तो अनुभव तुकाराम महाराजांनीच घेतला. इतरांना शक्य नाही. वाचतो आपण गाथा. परंतु त्यांनी ती भूमिका कशी मिळीवली असेल ? हा विचार केला पाहिजे. सर्व विसरून जायचंय. वासना मनामध्ये असतील, तर विसरणं शक्य नाही. तेव्हा निर्वासन अंत:करण ज्याने करून घेतलेलं आहे, तो जगदंबेचा प्रसाद आहे. आणि हा व्यास महर्षीचा सिद्धांत आहे. ''राजेलोक जगदंबेच्या प्रसादाने संसारातून बाहेर पडले.'' असे व्यास महर्षी म्हणाले. आणि ''मलाही ते मिळालेले आहे'', आपला अनुभवही सांगताहेत. सर्व वेद वाङ्मय त्यांच्या बुद्धीमध्ये आहे. ते म्हणाले, ''सगळे वेद वाङ्मय मी पाहिले आणि त्यातून जगदंबेची भक्ती करावी असे तात्पर्यसार मला मिळाले. आणि त्यामुळे मी कृतकृत्य झालो.''

स्वत:चा अनुभव सांगणारी मंडळी अशी आहेत. मी कोणच्या मार्गाने गेलो आणि माझ्या मनातल्या सर्व वासना जाऊन पूर्ण शांती मला मिळाली. हे अनुभव सांगणारी मंडळी भेटणे हे ही मोठे भाग्य आहे.

झाडाखाली बसून राहायचे आणि दुपारी भूक लागली तर भिक्षा मागायला भांडेबिंडे नको का ? आचार्य महाराज सांगताहेत, ''देवाने आम्हाला सगळे दिले आहे. दोन हात आहेत. घाला भिक्षा. करतल भिक्षा. हातामध्ये जेवढे मिळेल, तेवढेच ग्रहण करायचे. हे दोन हात हेच पात्र आहेत.'' म्हणाले. हात धुवून टाकले की संपले. बाकीची संपत्ती तुच्छ आहे. राहायला स्थान नको, भिक्षेला पात्र नको. सगळी व्यवस्था आहे. तर ही जी अंत:करणाची

भूमिका आहे, निर्वासन अंत:करण त्यांनी करून घेतले आहे.

**कौपिनवंत: खलु भाग्यवंत:।**

खरे भाग्यवान ते आहेत. सांसारिक भाग्य हे खरे नाही. टिकाऊ नाही. ते केव्हा कमी होईल, त्याच्या न्यूनतेमुळे मनाला असमाधान कधी वाटेल, याचा काही नेम नाही. वासनाशून्य अंत:करण झालेले आहे. ते खरे भाग्य असं त्यांनी स्वत:च्या अनुभवाप्रमाणे सांगितले. त्यांच्या अनुभवाप्रमाणे आपण अनुभव घ्यावा अशी इच्छासुद्धा आम्हाला होत नाही. इच्छा झाली तरी त्याला आपण टिकणारही नाही.

त्याप्रमाणे वागायचंय, दोन्ही हातामध्ये राहील एवढीच भिक्षा घ्यायची, जास्त घ्यायची नाही. अधिक आहार घ्यायचा नाही. असे किती नियम आहेत! तर आहार व विहाराचे सगळेही निर्बंध अंत:करणातल्या सर्वही वासना भगवंताच्या कृपेने ज्याने दूर करून घेतल्या आहेत – ते अनेक जन्मांनी सिद्ध होणारे आहे. स्थितप्रज्ञ अवस्था, समाधिअवस्था ज्याला म्हणतात; – आत्मनंदामध्ये मन स्थिर झाले आहे, समाधान आहे. दुसरीकडे मन कुठेही जात नाही. स्मरण नाही. कोण सुखी आहे आणि कोण दु:खी आहे याची आठवणही नाही! स्वत:च्या देहाचीही आठवण नाहीये. तिथे ममता ज्यांच्या ठिकाणी ठेवली, त्यांची आठवण कुठून होणार! त्याशिवाय भगवत् भक्ती अथवा भगवत् प्रेम वाढू शकत नाही. हे व्यास महर्षींनी जनमेजय राजाला मुद्दाम सांगितले. ''चरित्र ऐक म्हणाले तू. जगदंबेने हिमालयापासून अवतार घेतला. हिमालयाची कन्या गौरी, पार्वती तसा दक्षापासून त्याच जगदंबेने सती हा अवतार घेतला. तर असे दोन अवतार धारण केले आहेत जगन्मातेने.'' असे व्यास महर्षींनी जनमेजय राजाला सांगितल्यावर जनमेजय राजाने विचारले, ''महाराज!, जगन्माता हिमालयाची मुलगी झाली. दक्षाची मुलगी झाली आपण म्हणता, पण मूळ अवतार वेगळे आहेत.''

''समुद्रमंथन चालू असताना महालक्ष्मी प्रगट झाली असे सांगतात. त्याचप्रमाणे त्या महालक्ष्मीने, गौरी आदिशक्ती लक्ष्मीदेवी आणि सरस्वती अशी तीन आपली स्वरुपे प्रगट केली. गौरी शंकरांना दिली. लक्ष्मी वैकुंठपतींना दिली आणि सरस्वती ब्रह्मदेवांना दिली. ही त्या देवीने निर्माण केलेली आपली रूपे या सगळ्यांना जगत्कार्य करता यावे म्हणून सशक्तिक तिने बनिवलं. हे मी ऐकलेलं आहे. आणि आता तुम्ही सांगता की हिमालयाची कन्या झाली, दक्षाची कन्या झाली हे कसं काय?'' हा एक प्रश्न आहे.

पुराण वाङमयाचा अभ्यास अतिशय कठीण आहे. पुराणांमध्ये अनेक संदेह निर्माण होताहेत. हे एका ठिकाणी असं सांगितलं, पुन्हा दुसरीकडे तो अवतार झाला असं सांगितलं. याचा

समन्वय कसा साधायचा ? सांगणारी मंडळी पाहिजेत. अभ्यास केलेली मंडळी पाहिजेत. नुसतं वाचून आपल्या बुद्धीने अर्थ लावून होणार नाही. पुराणाचार्य म्हणून असायचे. पुराण वाङमयाचाच अभ्यास त्यांचा अखंड चाललेला असायचा. परस्पर विरोध जिथे येत असेल, तो विरोध दूर करणं. कोणाच्याही मनात संशय राहू न देणं. हे त्यांचं कार्य होतं. पुराणाचार्य होणं फार कठीण आहे. त्याला देवाची कृपा लागते. शंकरांच्या कृपेमुळे मार्कंडेय ऋषी पुराणाचार्य झाले. कोणीही चिकित्सक मनुष्य त्यांच्याजवळ आला, तर त्याचा संदेह दूर करण्याची शक्ती त्यांच्याजवळ आहे. समन्वय करून देताहेत. परस्पर असंगती नाहीये. पुराणाचे कर्ते कोण आहेत ? लोकांचे कल्याण व्हावे, लोकांना योग्य मार्ग दिसावा, त्याप्रमाणे लोकांनी आचरण करावे आणि आपले कल्याण करून घ्यावे. हा त्यांचा उद्देश नाहीये. यशाची प्राप्ती व्हावी ही देखील इच्छा नाहीये. काही नाही. ज्ञानी महात्म्याने अशा उद्देशाने निर्माण केलेली पुराणे, यांच्यात विरोध आहे, विसंगती आहे, असे एकदम आपण बोलून जातो. स्वत:च्या बुद्धीचा हा एक अभिमान आहे; घमेंड ज्याला म्हणतात. त्या अभिमानामुळे कोणालाही बोलायचे. व्यासांची बुद्धिमत्ता किती आहे, योग्यता केवढी आहे, वगैरे काही विचार आम्ही करीत नाही. पुराणामध्ये परस्पर विरोध आहे. असंगता आहे, समन्वय होत नाही असे म्हणतो आपण. पण समन्वय करण्याची बुद्धी आपण मिळीवली पाहिजे. त्याशिवाय समन्वय कसा करता येणार ?

तसेही महाभाग आहेत. समन्वय लावून दाखवणारे आहेत. श्रीकृष्णांचे चरित्र दोषास्पद आहे म्हणणारे पुष्कळ आहेत, पण ते चरित्र निर्दोष आहे, असे ज्यांच्या बुद्धीमध्ये ठाम पटलेले आहे, असे महात्मे –

**मधुराधिपतेरखिलं मधुरं।**

सांगताहेत. काही चूक नाहीये. भगवंताचे संपूर्ण चरित्र हे निर्दोष आहे. जिज्ञासा पाहिजे. आपल्याला संशय आलेला आहे. **संशय येणं हा काही दोष नाही. चिकित्सा करणं दोष नाही.** पण बुद्धी 'काही नाहीच आहे', अशी पहिल्यापासून करून घ्यायची आणि काहीतरी संशय घेऊन, काहीतरी चिकित्सा करून शेवटी सांगणाऱ्याचाही वेळ घालवायचा, आणि आपल्याला तर काही इच्छाच नसते. तर असे महात्मेही जगामध्ये आहेत. मुद्दाम पुराणादिकांचा, वेदांचा, शास्त्राचा सगळा अभ्यास करून आणि त्याप्रमाणे खरा जिज्ञासू जो आहे, त्याच्या मनातला संदेह दूर करून त्याला पुढे न्यायचाय. ज्ञान अनंत आहे. पूर्ण ज्ञानाची भूमिका प्राप्त होईपर्यंत अनेक संशय उत्पन्न होतात. पण ते दूर करणाऱ्या महात्म्यांची जर संगती झाली तर पुन्हा विश्वास निर्माण होतो आणि पुन्हा आचरण होत.

तेव्हा व्यास महर्षी याबद्दल आता विचार मांडणार आहेत. देवीचे अवतार असे झाले म्हणता, पुन्हा कसं झालेलं आहे. तर हे सर्वही चरित्र पुष्कळ मोठं आहे. व्यास महर्षींनी पूर्ण चिंतन करून सांगितलेलं आहे. जनमेजय राजासारख्या ऐकणाऱ्याला.

**कायेन वाचा मनसेंद्रियेवा।**
**बुद्ध्यात्मनावा प्रकृती स्वभावात्।।**
**करोमि यद्यत् सकलं परस्मै।**
**नारायणायति समर्पयामि।।**

## दिवस पाचवा

वेदव्यास महर्षी स्वत:बद्दल समाधान व्यक्त करताहेत. भगवतीची सेवा, पूजा मला घडली. त्यामुळे मी कृतकृत्य झालो. मनुष्यजन्म प्राप्त झाल्यानंतर काहीही कर्तव्य राहिले नाही अशी अवस्था प्राप्त होणं फार कठीण आहे. कितीही वय झालं तरीसुद्धा कर्तव्य शिल्लक राहते. हे राहिलं, ते राहिलं. ही व्यवस्था करायची, ती व्यवस्था करायची आहे. आणि एक दिवस शरीर सोडून जावे लागते. पण शरीर असेपर्यंत ही काहीही चिंता नाहीये. कृतकृत्यता मिळणं हे फार मोठं कठीण आहे.

आचार्य महाराज स्पष्ट सांगतात, व्यवहारामध्ये ज्यांचे चित्त आसक्त आहे, संसारवासना मनामध्ये पूर्ण भरलेल्या आहेत. त्या जीवात्म्यांची अवस्था बालपणापासून कशी असती, हे सांगितलेलं आहे. लहान वय आहे. व्यवहाराचे काही ज्ञान नाही. मानापमान, रागलोभ उत्पन्न होतात. पण लगेच जातातही. हा ही मोठा गुण आहे. बालांच्याप्रमाणे वृत्ती झाली पाहिजे असं म्हणतात. ज्ञानी माणसांनी बाल्याचा अभ्यास करावा. बाल्य याचा अर्थ रागद्वेषरहीत. लहान मुलांचे भांडण आपसात होतं, पण पुन्हा मनामध्ये काही राग नाही, द्वेष नाही, काही नाही. पुन्हा आणखी परस्परांची मैत्री कायम आहे. हा गुण आहे. म्हणून ज्ञान प्राप्त झाल्यावरसुध्दा बाल्य यावं. म्हणजे मन हे रागद्वेषरहीत असणं, त्यामुळे ते निश्चिंत असतात. इतरांना गुणग्राहक बुद्धीने तो गुण घेऊन त्याप्रमाणे वागायचा प्रयत्न करायचाय.

पण आचार्य महाराज जन्माला आल्यापासून माणसाची सर्वसामान्य स्थिती कसी असते हे सांगत असताना म्हणतात, निरनिराळ्या प्रकारच्या खेळांमध्ये त्याचे मन गुंतलेले आहे, अभ्यासाकडेही लक्ष नाही. बाल्यामध्येच अभ्यास केला पाहिजे. विद्यार्जन केले पाहिजे. पण क्रीडासक्त स्थिती बाल्य असेपर्यंत राहाते.

तारुण्य प्राप्त झाल्यावर स्त्रीपुत्रांची, धनाची आसक्ती निर्माण होते. आणि तारुण्यही जाणारच आहे. बाल्यही राहत नाही, तारुण्यही राहत नाही. राहत काहीच नाही. अवस्था आहे ती. कोणचीही अवस्था कायम नाहीये. जीवन ही सुद्धा एक अवस्था आहे. तीही संपणारी आहे.

वृध्दावस्था झाली म्हणजे सेवानिवृत्त होतो ना! सरकारी नियमाप्रमाणे ५५, ५८ वय काय असेल ते. पण काही काही मंडळींना काळ कसा घालवावा याचा मोठा गोंधळ होतो म्हणतात. दिवसभर ऑफिसमध्ये काम करावं लागत होतं, त्यामध्ये वेळ जात होता. आता वेळ कसा जाईल ? प्रथमापासून वाचनाची, चिंतनाची उपासनेची आवड जर असेल तर काळ जायला काय हरकत आहे ? उलट जास्ती वेळ मिळाला म्हणून त्याला समाधान वाटेल.

बाळेकुंद्रीकर महाराजांची पूर्वीची अवस्था सांगतात. ते शाळेमध्ये शिक्षक होते. घरामधून शाळेत जायला बाहेर पडलो की खिशामध्ये माळ ठेवून त्यांचे नामस्मरण चाललेले असे. रस्त्याने काही बोलायचे नाही, काही नाही. एका कडेने जायचे. शाळेतले शिकवायचे काम झाले, की पुन्हा घराकडे येताना पुन्हा खिशातल्या माळेवर नामस्मरण सुरू.

वेळ किती मिळेल आणि त्याचा सदुपयोग कसा करायचा हे ठरविण्याची बुद्धी ईश्वराने द्यावी. ती ईश्वराच्या कृपेने प्राप्त होते.

पण वृद्धावस्थेमध्ये जास्तीत जास्त चिंता उत्पन्न होताहेत. त्याची आधी व्यवस्था करायला नको का ? प्रल्हादजींनी वयाच्या पाचव्या वर्षी त्यांच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांना उपदेश करून त्यांची असुरी वृत्ती बदलून टाकलेली आहे. पिता विरूद्ध आहे. देवाचे नावसुद्धा घ्यायचे नाही. ताकीद आहे. पण प्रल्हादजींना काहीच भय नाही. मी काहीच करत नाही. सांगून मोकळे झाले. खरं, लबाडी नाही. माझं मन त्या हरीकडं जातंय म्हणजे त्याच्या इच्छेने जातंय म्हणाले. मी काही करतच नाही. मी काही करतो असं म्हणू नये. अहंकार सर्वही गेला पाहिजे. ज्ञानेश्वर महाराजांनीही सांगितलं आहे. ईश्वराची उपासना करण्याकडे लक्ष असेल, तर अहंकार दूर करण्याचा प्रयत्न होतो. जातोही अहंकार.

**परि मनें वाचा देहे। जैसा व्यापार तो होये।।**<br>**तो मी करीत आहे। ऐसे न म्हणे।।**

ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत; अर्जुनाला उपदेश करताना भगवान सांगताहे, - कोणचेही काम करीत असाताना चांगले झाले तर मी केले आहे. वाईट झाले असेल तर ? पाप घडल्यानंतर ''मी पाप केले आहे.'' असे जो सांगता, त्याचे पाप जाते. पण ते धैर्य कुठे आहे ? लोक नावे ठेवतील ना ! हा निंद्य आचरण करणारा आहे, याची संगती नको म्हणतील

ते धैर्य नाही. धर्म जर आपल्या हातून झालेला असेल, दानधर्म म्हणा परोपकार म्हणा, आम्ही दरवर्षी वाडीला जातो, अमुक करतो,तमुक करतो. - तोंडानी कशाला बोलायचे उगीच! करायचे फक्त, जर आपल्या मुखाने धर्म सांगितला गेला, तर तो संपला. धर्म म्हणजे इथे पुण्य असा अर्थ घ्यायचा.

तसंच पाप म्हणजे अधर्म आहे. माझ्या हातून असे दोष घडलेले आहेत. प्रायश्चित्त घेताना विद्वान ब्राह्मणांच्या सभेमध्ये "कशाकरता प्रायश्चित्त घेता?" "माझ्या हातून असं पाप घडलं आहे, त्याकरता मी इतकं दान करतो, अमुक करतो." असे सांगून प्रायश्चित घेतात. म्हणजे प्रश्चात्ताप मनाला झालेला असेल तर असे होईल.

तर प्रल्हादजींची वृत्ती अशी आहे. काही अहंकार नाही. हरीभजन, हरीचे स्मरण अखंड चाललेले आहे. त्याकरता पिता शासन करतो आहे. रागावला, कंटाळला. गुरुजींच्या ताब्यात मुलाला देऊन टाकले. बघा, बुद्धी बदलली तर बघा याची, असे गुरुजींना सांगितले. अशी सर्व बाजूंची विरोधी परिस्थिती आहे. हिरण्यकश्यपू तपश्चर्या करण्याकरता गेलेला असताना देवांनी त्याची राजधानी लुटली, सगळ्या दैत्यांना मारले. दैत्य पळून गेले. आणि प्रल्हादाच्या आईला ते स्वर्गात घेऊन गेले. ती गर्भवती होती. प्रल्हाद तिच्या उदरात होता. तिकडून नारद महर्षी आले. "का रे देवेंद्रा! या राणीने तुझा काय अपराध केलेला आहे? तुझ्या शत्रूकडे पाहा तू. तो तपश्चर्येला गेलाय. परत आल्यावर तो काही स्वस्थ बसणार नाही. हिला का घेऊन चाललास?" असे नारदांनी विचारले. देवेंद्र म्हणाला, ही गर्भिणी आहे. हिला मुलगा झाल्यानंतर त्याला मी ठार मारणार आहे आणि नंतर हिला सोडून देणार." देवराज्य मिळालेले आहे. पुण्य किती असेल त्याचे! किती यज्ञयागादिक सत्कर्मं घडली असतील! पण या मनातल्या दुर्वासना जात नाहीत. त्यामुळे चिंता, भय सारखे आहे.

नारदांनी सांगितले, या मुलाला तू मारू शकणार नाहीस. सोडून दे." नारदांच्यापुढे देवेंद्राचे काय चालणार! त्या प्रल्हादाच्या आईला नारदांनी आपल्या आश्रमात आणून ठेवलेले आहे. तिला सांगितले, "इथे राहा. इथे तुला कोणाची भीती नाही. तुझा पती तपश्चर्या करून परत येईल. नंतर राजवाड्यामध्ये तुला पोहोचवू." ऋषीमंडळींना कोणाचा प्रतिग्रह नाही. कोणाचे काही घेणे नाही. मागणे नाही, काही नाही. त्यांच्या अंत:करणामध्ये वासनाच नाहीत. कोणाला काय मागायचे? कमी काय आहे? अशा वृत्तीने राहून परोपकाराची कामे त्यांची चालू आहेत. आम्ही अमुक केले किंवा तमुक केलं म्हणून स्वत:च्या तोंडून एक शब्दही नाहीये.

त्यावेळेला ती राणी तिथे राहिली. तिच्या गर्भात अनेक जन्म भगवत भक्ती करून जन्माला

येणारा महात्मा आहे. प्रल्हादजी काय एका जन्मामध्ये भक्त बनले काय?

**बहुत सुकृताची जोडी।**
**म्हणूनी विठ्ठले आवडी।।**

गुरुजी बाहेर गेले असताना त्यावेळी सर्व मुले म्हणाली, आपण खेळूया. आपल्याला आता आज सुट्टी आहे. प्रल्हादजी आसनावर बसले. म्हणाले, मित्रहो, या. नारद महर्षींनी मला केलेला उपदेश तुम्हाला सांगायचा आहे. प्रल्हादजींवर त्यांच्या मित्रांचे फार प्रेम होते. आदर होता. वडीलधारी मंडळी हिरण्यकश्यपूच्या भीतीने काही बोलत नसतील, पण ही मुले मात्र प्रल्हाद मोठा गुणी आहे, असे म्हणत. आणि सर्व मुले जवळ येऊन बसल्याबरोबर प्रल्हादजींनी सांगायला आरंभ केला.

**कौमार आचरेत्प्राज्ञो धर्मान् भागवतानिह।**
**दुर्लभं मानुषं जन्म तदप्यध्रुवमर्थदम्।।**

पहिला उपदेश आहे-

भगवत् भक्तीचा आरंभ लहान वयापासूनच केला पाहिजे, हा पहिला सिद्धांत आहे, प्रल्हादजींचा. मनुष्यजन्म दुर्लभ आहे. आणि अध्रुव आहे. टिकणारा नाही. केव्हा जाईल सांगता येत नाही. मनुष्यजन्म मिळालेला आहे. करू की सावकाश देवाची भक्ती! संसार वगैरे झाला, मुलबाळं झाली, नातवांची, मुलांची व्यवस्था वगैरे लागली, मग करू स्वस्थ बसून म्हातारपणी. काही काम नसते. होतही नाही. ज्या वासना सबंध आयुष्यभर वाढत असतात, त्या वाढण्याचेच प्रसंग येतात. हे झालं पाहिजे. ते व्हायला पाहिजे. चांगलं-वाईट विचार न करता मनामध्ये जी वासना येईल, ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करायचा आणि त्या वासना वाढत जायच्या. थांबणार कुठे? वासना अत्यंत वाढलेल्या आहेत. अशा परिस्थितीमध्ये, म्हणजे म्हातारपणामध्ये काय होणार परमार्थ! आयुष्य मात्र फुकट गेलं.

शंभर वर्षे आयुष्य गृहीत धरली तरी पन्नास वर्षे झोपेमध्ये जातात. गणित करूनच त्यांनी मांडलेले आहे. आणि धनसमृद्धी झाली पाहिजे. जितके मिळविता येईल तेवढे मिळीवले पाहिजे. पापपुण्याचा विचार करण्याचे कारण नाहीये. - त्या मोहामुळे दिवसाचे सारे आयुष्य अर्थार्जनामध्ये आणि कामामध्ये जाते.

वेळ केव्हा मिळणार? म्हातारपणी मिळणार. सगळी कामे संपली आहेत. आता काही राहिली नाहीत. कृतकृत्य म्हणून अवस्था आहे. संपली माझी कामे, आता काही नाहीत. असं केव्हा होणार? बंगला बांधल्यावर नावाची पाटी लावली. रिटायर्ड सेशन जज्ज.

रिटायर्ड कशाला द्यायला पाहिजे ? आता काही त्याचा उपयोग आहे ? कोणी येणार आहे तुमच्याकडे ? कामे मिळणार आहेत का ? पण ती आठवण कायम आहे.

तर अशी परिस्थिती असताना प्रल्हादजी सांगताहेत, - मन सगळे वासनेने भरलेले आहे. त्यामुळे अनंत चिंता मनामध्ये आहेत. धनाची चिंता आहे, मुलाबाळांची चिंता आहे आप्तेष्टांची चिंता आहे. मम, मम म्हणून जेवढे आहेत, कमी अधिक प्रमाणात, त्या सर्वांची चिंता आहे. याचं कसं होईल ? त्याचं कसं होईल ? अशावेळेला ईश्वराची भक्ती कशी घडणार ? हा प्रल्हादजींचा प्रश्न आहे. त्यामुळे अहंकारादिक विकार मनामध्ये उत्पन्न होताहेत. जास्तीत जास्त वासनेने कर्म घडल्यामुळे अहंकार कर्मं होतात. तो अहंकार धरू नका, एवढं ते सांगताहेत.

**परि मने वाचा देहे।**

मनामध्ये अहंकार उत्पन्न झालेला असतोच. अहंकार हा मनाचाच एक विभाग आहे. त्यामुळे कोणी विरुद्ध वागला की वाट्टेल तसं बोलणं. त्यामुळे वाणीचंही तप होत नाही. अरण्यामध्ये कुठे न जाता घरात बसूनही तपश्चर्या करता येते, असं भगवंतांनी सांगितले आहे. शरीराने घडणारी तपं कोणची, वाणीनं घडणारी तपं कोणची, हे त्यांनी सांगितले आहे.

वाङ्मय तपाचं महत्त्व सांगताना भगवान् सांगतात, ''कोणाच्याही मनाला उद्वेग वाटणार नाही, असं बोलायला शिकावे.'' वाणीचा निग्रह तसा करावा. सौम्य वाणी पाहिजे. हे तप आहे. तपश्चर्या म्हणजे काय निराळी केली पाहिजे असे नाही. सत्य वाणी पाहिजे. प्रिय वाणी पाहिजे. आणि हितकारक सांगता आले पाहिजे. नामस्मरण भगवंताचे, जगदंबेची भक्ती, हे वाङ्मय तप आहे. वाणी मिळालेली आहे. त्या वाणीचा सदुपयोग केला पाहिजे; हे ही सांगून ठेवलंय त्यांनी. तसे जर करण्याचा प्रयत्न केला तर त्या वाणीमध्ये किती सामर्थ्य उत्पन्न होतंय त्याला वाचासिद्धी म्हणतात. अशी मंडळी होऊन गेलेली आहेत. त्यांच्या मुखातून जे निघेल, ते खरे होते. अजूनही असतील असे ईश्वरकृपासंपन्न महात्मे. त्यांचे त्या वाणीचे तप झाले आहे. सत्य वाचेचे तप किती केलंय ज्ञानेश्वर महाराजांनी कितीतरी कल्प केले. म्हणून त्या वाणीमध्ये सामर्थ्य आहे. त्यांचा उपदेश जो आहे, तो ऐकायच्या वेळेला तरी मन जरासे स्तब्ध होते आहे. खरं आहे असे वाटते. खरं वाटून आचरण घडायला चांगले प्रारब्ध पाहिजे. शुद्ध भाव पाहिजे, शुद्ध अंत:करण पाहिजे. तर अशी तपश्चर्या संसारात राहूनसुद्धा करता येण्यासारखी आहे. पण तशी भावना पाहिजे. तसं लक्ष पाहिजे तिकडं, कसे बोलतो आपण ? म्हणून अगदी विचार करून बोलावे,

अविचाराने कधी बोलू नये. सवय लागलेली असती अहंकारामुळे आणि वाणीवरतीही त्याचा परिणाम होतो. वाणीनेही आणखी साहंकार कर्म होते आणि शरीरानेही घडते. पण-

**परि मन वाचा देहे । जैसा व्यापार जो होये ।।**
**तो मी करीत आहे । ऐसे न म्हणे ।।**

ही त्यांनी युक्ती सांगितली आहे. कोणचीही क्रिया शरीराने, मनाने, वाणीने झाली तरी मी करतो आहे, मी केले आहे, माझ्याकडून झालेले आहे, असे तरी समजू नका. पाप घडू दे, पण-

**केनापि देवेन हृदिस्थितेन ।**
**यथा नियुक्तोस्मि तथा करोमि।।**

विचार करण्याच्या वेळेला झालं असं. मी बोललो. त्याच्या मनात लागलं पण तो प्रेरणा करणारा जो आहे परमात्मा, इंद्रियांना, मनाला बुध्दीला, शरीराला, त्याच्या प्रेरणेने हे घडलेले आहे, असे त्याच्यावर तरी टाकता आले पाहिजे. सोयीकरता नाहीये हा उपदेश. हा सिध्दांत सोयीकरता घेतात.

हंसराजस्वामी परांड्याला होऊन गेले. त्यांनी आचार्यांच्या एका ग्रंथावर टीका लिहीली आहे. त्याच्या आरंभालाच ते म्हणतात, ''हे आम्ही लिहिलेले कोणी वाचू नये. शपथ आहे त्यांना देवाची.'' म्हणजे मग ग्रंथ लिहिला कशाला त्यांनी ? कारण आहे. साधनचतुष्ट संपत्ती मिळाल्याशिवाय हा ग्रंथ वाचायचा नाही, ऐकायचा नाही. विवेक पाहिजे. वैराग्य पाहिजे. शम पाहिजे. वासना कमी कमी झाल्या पाहिजेत. तोच वेदांत ऐकण्याचा अधिकारी आहे. इंद्रियांचा निग्रह पाहिजे. तितिक्षा म्हणजे सहनशील वृत्ती पाहिजे. चित्ताचे समाधान पाहिजे. ही सगळी साधनं जवळ असतील तर हा ग्रंथ वाचा नाही तर वाचू नका.

मुद्रणकलेच्या सोयीमुळे आता कोणचेही ग्रंथ छापले जातात. आम्हाला वाचताही येतंय, मग कोणचाही ग्रंथ वाचायला काय हरकत आहे ? वाचता येणं हाच फक्त सुशिक्षितपणा ठरतो.

तर ही सगळी साधनसंपत्ती जवळ पाहिजे. मनाची तयारी पाहिजे. मगच ऐकल्याचा उपयोग होईल. सांगणाऱ्याचाही काळ फुकट जाणार नाही. आणि ऐकणाऱ्याचेही ऐकलेले फुकट जाणार नाही. ''अधिकार तैसा करु उपदेश !'' असे तुकाराम महाराज सांगतात. अधिकार तुमचा नाहीये. मनाचा संयम पाहिजे. मनाची एकाग्रता पाहिजे. मनाची स्थिरता पाहिजे. घरातून निघताना आपण कुलुप लावून आलो की नाही ? पक्कं बसलेलं आहे की नाही ?

कीर्तन ऐकायच्या वेळेला हा विचार मनात. काय उपयोग ? म्हणजे कीर्तनही लक्षात राहणार नाही. आणि ते तर कायमचेच जाणार. त्याचे संरक्षण करण्याची कायमची वासना आहे. ती जास्त वाढत जाणार. म्हणून ज्ञानेश्वर महाराज भगवंतांनी केलेला उपदेश सांगतात;- मनाने, वाणीने आणि देहाने जी क्रिया होईल, ती मी केली आहे असे समजू नका.

दुसऱ्याला आपण काही बोललो, किंवा काही कोर्टात केस जिंकली म्हणा; मी जिंकलेली आहे असा जर अभिमान उत्पन्न जाला, तर मनाची अवस्था काय होईल ? अहंकार जास्तच वाढत जाणार ना ! कमी होईल का ? त्यापेक्षा सहन का करू नये कर्म ? हे एवढे सांगितले ज्ञानराजांनी. पण हे शक्य कसे आहे ? सांगताहेत पुढे सांगताहेत.

मनाने झालेली कर्म अहंकारापूर्वक करू नये. होऊ देत. घडू देत. मनात येईल तसं वागलो, कोणाला बोललो हरकत नाही. वाणीनेही तसंच चाललंय. देहानेही तसंच चाललंय. पण ते मी केलंय, कर्तृत्व माझं आहे, एवढं तरी समजू नका. तर पुन्हा ती कर्म जन्माला कारण होणार नाहीत. ती इथेच संपली. कर्म लगेच संपताहेत.

दुसऱ्याला उद्वेग होईल असे आपण बोलतो. हे वाणीचं कर्म आहे. शब्द आपण उच्चारले. ते शब्द त्याच्या मनाला लागले. ही शब्दात्मक वाणी आहे. कोणाची स्तुती केली, तोही शब्द आहे. निंदा केली, रागावून बोललो, तोही शब्दच आहे. शब्द उत्पन्न झाला आणि गेला. संपलं. तो काय राहणार आहे काय ?

शरीराने कर्म झालं तेही संपून गेलं. कोणचही कर्म राहणार नाहीये. पण हे राहणारे आम्ही करून ठेवतो. ते कर्म मी केलेले आहे, म्हणजे त्याची वासना, त्याचे संस्कार मनामध्ये कायम राहिले आहेत. म्हणजे पुन्हा तसे कर्म करण्याची तयारी आम्ही करून ठेवली. तेव्हा कोणीही आम्हाला बोलला की आम्ही बोलल्याशिवाय राहणार नाही. मी सहन करणार नाही. हाच अभ्यास आमच्या मनाचा कायम राहिल्यानंतर पुन्हा कर्माची तयारी आहे. कर्म संपून जाताहेत. पण हे कर्म हे जन्ममरण कायमचे देणारे केव्हा ठरते ? तर साहंकार झाले म्हणजे ठरते. मी केलेले आहे. माझ्यामुळे ही सगळी व्यवस्था झालेली आहे. तेव्हा साहंकार कर्म होऊ नये. संपणारी आहेत, संपून जातात. पापही राहात नाही आणि पुण्यही राहात नाही. अशी वस्तुस्थिती आहे. पण त्या कर्माबद्दल संस्कार, वासना आपण मनामध्ये वाढवीत असतो. त्यामुळे पुन्हा कर्म निर्माण होत असते. मग हे थांबायचे कसे ? ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

**करणे वा न करणे। हे आवघे तोचि जाणे।।**
**विश्व चलतसे जेणे । परमात्मेनि।।**

केवढी मोठी भूमिका आहे त्या भूमिकेवरून सांगताहेत ज्ञानराज. **कोणचे कर्म करावे आणि कोणचे करू नये याचे ज्ञान आपल्याला नाहीये.** हे फक्त त्याला ज्ञान आहे. सर्वज्ञ आहे तो. आणि सर्वांना त्याची भीती आहे. जगदंबा, परमात्मा पूर्ण ज्ञानसंपन्न आहे. चिद्रुप आहे. सच्चिदानंदघन, कर्म कितीतही होताहेत. सगळे जग निर्माण करणे, संरक्षण करणे, संहार करणे, ही ईश्वराची कर्म चाललेली आहेत. पण त्याचा काही संबंध नाही. थोडसं आमच्याकडून काही पापपुण्य घडलं तर त्याच्याकरता आम्हाला जन्म घ्यावा लागतो. पण ईश्वराच्या हातू अनंत कर्म झाली तरी ती दिव्य कर्म आहेत.ईश्वराचे कर्म तसे होते, महात्म्यांचे कर्म तसे होते. हे जर पाहिले, आणि तसा विचार केला, तर आपल्याही मनाची, वाणीची तशी तयारी होऊ शकते.

मूळ विचार हा आहे की कर्तृत्व आपले आहे की नाही ? माझ्या बुद्धीने सगळे झालेले आहे, माझ्या वाणीने सगळे झालेले आहे. माझ्या शरीराने मी सगळे करतो. आजारी पडलेला आहे, किंवा बुद्धी कमी झालेली आहे, वाणीवर परिणाम झालेला आहे, बोलता येईनासे झालेले आहे, त्यावेळाला का करता येत नाही याला ? अपवाद असे काही सापडल्याबरोबर तो नियम संपला. मी सगळं केलेले आहे, अशी फक्त समजूत आहे. संत महात्म्यांनी ओळखलेले आहे, की खरा सिद्धांत वेगळा आहे. कोणच्या जीवाकडून कोणची कर्म व्हावीत हे जाणणारा तो परमात्मा आहे. त्याची सर्वांना भीती वाटते. ''विश्व चलतेसे परमात्मेनि !'' हा सिद्धांत सांगताना जगन्मातेची, सच्चिदानंदघन परब्रह्माची जी स्वरूपे सांगितली आहेत वेदांतशास्त्रामध्ये, ती अशी की, विराट् स्वरूप आहे श्रोत्र आत्मा आणि अंतर्यामी आहे आणि परब्रह्म आहे.

त्यात श्रोत्र आत्मा म्हणून जे स्वरूप आहे - हिरण्यगर्भ श्रोत्र आत्मा प्राण इत्य विधियते - व्यवस्था जी केली गेलेली आहे, शहराची म्हणा, राज्याची म्हणा, जिल्ह्याची म्हणा. त्या त्या ऑफिसमध्ये काम करणारी मंडळी असतात, त्यांना कामे नेमून दिलेली असतात. बाहेरची व्यवस्था बघायला पोलीस, शिपाई वगैरे ठेवलेले असतात. अमक्या शिपायाने इथे उभे राहावे. वगैरे व्यवस्था शहरामध्ये केलेली असते. त्या त्या शिपायाने त्याचे काम नेमून दिलेल्या भागापुरते करायचे. पहारा करणे, वहातुकीचे नियंत्रण करणे, वगैरे. ह्या व्यवहारामध्ये एका एका कक्षेमध्ये कामे चालू असतात. संबंध शहराचा अधिकारी असतो की नाही ? कलेक्टर किंवा कमिशनर कोण असेल तो ? त्या शहराची, जिल्ह्याची जी काही सगळी कामे असतील, त्यांची जबाबदारी त्याच्यावर असते. समष्टि आणि व्यष्टि.

नारायण अथवा नारायणी कोणीही असो. कोणतंही स्वरूप असो. त्या स्वरूपाच्या ठिकाणी चित्त इतकं स्थिर झाले आहे. की तोच विषय आहे. चित्ताची अखंड धारावृत्ती एकाच

विषयासंबंधी आहे. असा एक मोठा अभ्यास आहे. तो होण्याकरता फार मोठं सुकृत पाहिजे. ध्यानाचा अभ्यास करण्याची योग्यता येणं फार कठीण आहे. मनातले सर्व विषय बाजूला करून एकाग्रता प्राप्त करून घेता आली पाहिजे. तर ध्यान सिद्ध होते.

द्रोणाचार्य महाराजांच्या कानावर बातमी आली की अश्वत्थामा मारला गेला. त्यांनी लढाई थांबवली. एकुलता एक एवढा पराक्रमी चांगला मुलगा मारला गेला त्यांचा फक्त धर्मराजावर विश्वास होता. म्हणून त्यांनी धर्मराजाला विचारायचे ठरविले. धर्मराज असत्य बोलणार नाही ही खात्री आहे. धर्मराजाकडे, पांडवांकडे भीष्माचार्यांचा, द्रोणाचार्यांचा ओढा होता. पांडवांचे कल्याण व्हावे असे त्यांना वाटत होते. पांडव श्रेष्ठ आहेत असे स्पष्ट सागंत होते, याचे कारण हेच आहे. पांडव केवळ व्यवहारामध्ये आसक्त नाहीयेत. ईश्वराबद्दल त्यांच्या मनात भक्ती आहे. त्यांची आस्तिक वृत्ती असून ते अत्यंत गुणी आहेत. ईश्वरप्रसाद आपल्यावर झाला पाहिजे, असे आपले वर्तन ठेवले पाहिजे असा त्यांचा प्रयत्न आहे. म्हणून भीष्म, द्रोण जरी दुर्योधनाच सेनापती - कार्य करणारे होते, तरी त्यांचा ओढा पांडवांकडे होता.

द्रोणाचार्यांनी धर्मराजाला बोलावणे पाठीवले. त्यांना विचारायचंय मला अश्वत्थामा मेला का ? त्यांनी सांगितले तर ते खरं आहे असे म्हणाले. श्रीकृष्णांनी धर्मराजाला सांगितले. ''तू जर खरं बोललास, तर तुम्ही कोणीच जिवंत राहणार नाही. आज द्रोणाचार्यांचा शेवटचा दिवस. पाचवा दिवस युद्धाचा. 'अश्वत्थामा जिवंत आहे' असं जर तू बोलून गेलास, तर त्यांना जास्त राग येणार. शत्रूने मुद्दाम खोटी बातमी उठवली. त्यांच्यापैकी एकालाही जिवंत ठेवायचा नाही. त्यांच्याजवळ तशी शक्ती आहे. त्यांच्यासारखे अस्त्रज्ञान कोणालाही नाही. वाट्टेल त्या अस्त्राचा उपयोग करून तुमचे सगळे सैन्य आज ते मारल्याशिवाय राहणार नाहीत. इतक्या लोकांची हत्या झाल्याचे पाप तुला लागणार आहे. काय करणार तू ?''

धर्मराज म्हणाले, खरं असेल ते सांगायचे.

भगवान म्हणाले, ''खरं असेल ते सांगायचे, मग लढाई सुरु कशाला केलीस ? राज्य पाहिजे ना तुला ? राज्य देणार नाही असे दुर्योधनाने सांगितले म्हणून तर लढाईला आरंभ झाला. आणि इथे आता खरं खोट्याचा विचार कसा करता येईल ? व्यवहारामध्ये पूर्ण सत्य हे कठीण आहे. सत्यही करावं लागतं, असत्यही बोलावं लागतं. केव्हाही आणि कुठेही खोटं बोलणार नाही. हा नियम शक्य कसा आहे ? म्हणून अल्प व्रत आहे. सत्य हे बोलायचे आहे. पण संसारी लोकांना सत्य बोलायचे महाव्रत घेता येणार नाही. सर्व कालामध्ये, सर्व देशामध्ये सत्यच बोलावे. खोटं बोलायचे नाही. एकदम कसं शक्य आहे ? वाणीला तशी सवय तरी आहे का ? मनाची तयारी तेवढी आहे का ? म्हणून अभ्यास करण्यासाठी

शास्त्रकारांनी अल्पव्रते सांगितली आहेत.

गुरुवार आहे आज. दत्तात्रेयांचा वार. गुरुवारी खोटं बोलायचे नाही. म्हणजे तेवढा तरी अभ्यास होतो. आश्रमात असेपर्यंत तरी खोटं बोलायचे नाही. म्हणजे बाहेर गेल्यानंतर बोलायचे असा अर्थ नाही. पण सवय लागली पाहिजे. अल्पव्रत. देशाची आणि कालाची मर्यादा ठेवूनच कोणत्याही व्रताचे पालन करावे.

श्रीकृष्ण म्हणाले, ''धर्मराज, तू सत्यव्रती आहेस. पण तुला हे व्रत घेता येणार नाही. महाव्रत नाही. अरण्यात राहिला होतास तेच बरं होतं. तिथं सगळी महाव्रतं तुला करता आली असती. तुझ्यामुळे सगळ्यांना दु:खामध्ये पडावं लागलेलं आहे. मरणाच्या दारामध्ये सगळे सापडलेले आहेत तुझ्या सत्यनिष्ठेमुळे.'' असे काही श्रीकृष्णांनी धर्मराजाला सांगितले.

धर्मराजाचे भाषणही संदिग्ध झालं. त्यामुळे द्रोणाचार्यांच्या मनावर परिणाम झाला. आणि त्यांनी शस्त्रसंन्यास घेतला. तरीसुद्धा अश्वत्थामा गेला की नाही हे स्वत: आपण समजून घेऊ या. म्हणून ते आसन घालून बसले. ध्यानाचा अभ्यास त्यांचा किती आहे. हे लक्षात घेण्यासारखं आहे. सर्व बाजूंनी लढाई चालू आहे. धुमश्चक्री चालूच आहे. वाद्य वाजताहेत. आरडाओरडा चालू आहे. आणि तिथे आसन घालून बसले, चित्त स्थिर केलेलं आहे. संयम ज्याला म्हणतात.

योगसूत्रकार सांगतात, धारणा ध्यान आणि समाधि तिन्ही एकत्र आहेत. ज्या विषयाच्या ठिकाणी चित्त स्थिर करण्याचा प्रयत्न चालू आहे, त्याचे ध्यान सुरू आहे. आणि त्या ध्यानाचा परिपाक म्हणजे समाधिअवस्था. ध्येयाकार चित्त झाल्यावर त्या पदार्थाचे प्रत्यक्ष ज्ञान होते त्या संयमाने.

तो अभ्यास आहे त्यांचा. बाहेर धनुर्वेदाचा अभ्यास आहे. त्यातही अद्वितीय आहेत. अजिंक्य आहेत. सगळं आहे. तर हा अंतरभ्यासही मोठा होता त्यांचा. सर्वही विषयांपासून मन हे एकाग्र करू शकत होते. आणि त्या समाधिअवस्थेमध्ये अश्वत्थामा जिवंत आहे की नाही हे पाहायचे आहे. मग ती ऋषीमंडळी आली अंतरिक्षामध्ये. त्यांनी सांगितले, द्रोणाचार्य, आता इकडून चित्त तुम्ही काढून घ्या. शेवटचा काळ आलेला आहे. यात आता चित्त ठेवू नका. अश्वत्थामा असला काय ? आणि नसला काय ? तुम्हाला काय करायचंय ? तुमच्या हिताचा विचार करा.'' मग परमेश्वराचे चिंतन करीत असताना धृष्टद्युम्नाने त्यांचा नाश केलेला आहे.

ध्यानावस्थेसाठी अंत:करण अत्यंत विशुध्द झाले पाहिजे. कोणाचाही मल किंवा दोष त्या

चित्तामध्ये राहून उपयोगी नाही. त्याकरता ते सर्व ऋषी नदीतीरावर जाऊन तप करीत असायचे. तप म्हणजे चिंतन करणं. परमेश्वराच्या गुणांचे, कर्माचे, स्वरुपाचे, नामाचे चिंतन करणे, विचार करणे. म्हणजे दुसरीकडे चित्त नाही. संसारी असून संसार मनामध्ये नाही. ही स्थिती प्राप्त करून घेतलेली असते. काहीही अहंकार नाही. अहंकार जाण्याकरता ईश्वराचे चिंतन झाले पाहिजे. ज्ञानराजांनी सांगितले आहे;

**हे अवघे तोचि जाणे ।**

सर्वही क्रियाशक्ती ही त्या सूत्रात्म्याची, परमात्म्याची आहे. हे पाहून सांगताहेत, अनुभव घेऊन. कारण आलोचन सारखं ते आहे. चित्ताची शक्ती इतकी वाढीवता येणे शक्य आहे की अदृश्य पदार्थही आणखी चित्ताला समजू शकतात. वाणीचाही तसा अभ्यास होतो. सत्यनिष्ठा ही जर खरी झाली, तर सर्वही कर्मांचे फल त्याला आपोआप मिळते. निष्फल कर्म कोणचंही होत नाही. तर त्याकरता अहंकार सोडा म्हणतात. लहानमोठी सर्वही क्रियाकर्म ही त्या सूत्रात्मा, परमात्म्याकडून चालू आहेत. क्रियाशक्तीरूप तोच आहे. मी केलं असं म्हणायचं कसं? हा विचार करा तुम्ही. त्या ईश्वरशक्तीचाही विचार करा. म्हणजे हा अहंकार कमी होऊ शकेल. तो अहंकार जोपर्यंत कमी झालेला नाही, तोपर्यंत काही नाही. ध्यान नाही, पूजन नाही, काही घडत नाही. प्रत्येक ठिकाणी अहम् येणार. पूजा केली तरीसुध्दा मी पूजा केली आहे.

**यत्कारोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासियत्।**
**यत्तपस्यासि कौन्तेय तत्कुरुष्व मदार्पणम् ।।९.२७।।**

अर्पण कर म्हणतात.

**क्रिया अर्पण कशा करायच्या? क्रिया काय हातात घेऊन देता येण्यासारखा पदार्थ आहे का? कर्म ईश्वरार्पण करणं याचा अर्थ मी कर्ता नाही. प्रत्येक कर्माच्या वेळेला निरहंकार वृत्ती झाली पाहिजे. म्हणजे कर्माची शक्तीही संपली. कर्मामध्ये जीवाला जन्ममरण द्यायची जी शक्ती आहे, ती गेली. कर्म करताना बुद्धी निरहंकार होणं, हीच ईश्वरार्पण बुद्धी आहे.** वस्तुतः कर्तृत्व आपले नाहीये हे शास्त्रप्रमाणाने आणि सिद्धमहात्म्यांच्या सांगण्यावरून आपल्याला कळून येतंय. त्याप्रमाणे समजून घेण्याचा प्रयत्न करायचा आहे. बुद्धीला आणखी तो विषय द्यायचा आहे. कर्तृत्व आपले नाहीये हे शास्त्रप्रमाणाने आणि सिध्दमहात्म्यांच्या सांगण्यावरून आपल्याला कळून येतंय. त्याप्रमाणे समजून घेण्याचा प्रयत्न करायचा आहे. बुद्धीला आणखी तो विषय द्यायचा आहे. कर्तत्व आपलं नाही. क्रियाशक्तीही परमेश्वराची आहे. हे पक्कं समजल्यानंतर अहंकार राहू शकत

नाही. आरोप आहे हा. मी करतो असं नुसतं समजून घ्यायचं.

दुर्योधनाचा तो अहंकार शेवटपर्यंत गेला नाही. भीष्माचार्य पडले. त्यांनी सांगितले, ''बाबा, आता तरी थांबवा युद्ध. माझ्या सांगण्याचा तुझ्या मनावर काही परिणाम झाला नाही. संपलं. आता याच्यापुढे तरी आनंदाने राहा.'' पण नाही. दुर्योधनाचा अहंकार कमी झाला नाही. अहंकारामुळे त्याला वाटले, अजून तो युध्द करू शकेल. द्रोणाचार्य आहेत, कर्ण आहे. हे सगळे माझ्या इच्छेप्रमाणे वागणारे आहेत. या अहंकारामुळे शेवटी त्याचा विनाश झालेला आहे.

ईश्वराची शक्ती अदृश्य आहे. पण ईश्वर प्रत्यक्ष अवतार धारण करून आलेला आहे. रामवतार झाला, कृष्णावतार झाला, जगदंबेचा महालक्ष्मी अवतार झाला. कितीतरी सुकृत आहे. त्या त्या अवताराचे सान्निध्य आहे. दर्शन प्रत्यक्ष होतंय तरीसुद्धा अहंकार जाऊ शकत नाही.

भगवान गोपालकृष्णांचे चरित्र किती दिव्य आहे, हे अर्जुनाला माहिती नव्हते का ? अर्जुनाचा विश्वास, भक्ती मोठी होती. युद्धाला निमंत्रण करण्याकरता गेला अर्जुन, 'आम्हाला सहाय्य करा आपण', अशी भगवंतांची त्याने प्रार्थना केली. दुर्योधनही गेला होता. पण त्याची फक्त बहिरंग वृत्ती होती. कृष्ण मोठा शूर आहे, पराक्रमी आहे. तो जर आपल्या पक्षाला मिळाला तर आपला विजय निश्चित आहे. भीष्म, द्रोण आहेतच. त्यापैकी एक कृष्ण एवढीच त्याची समजूत आहे. अर्जुनाची बुद्धी निराळी आहे. कृष्ण भगवान् परमेश्वर आहे. परमेश्वराची शक्ती मोठी आहे. ही त्याची श्रद्धा आहेच आहे. संस्कारही उत्तम आहेत. ''दैवीसंपत्ती घेऊन तू जन्माला आलेला आहेस.'' असे भगवान स्वतःच त्याला सांगताहेत.

पण अशा परिस्थितीमध्ये गोपालकृष्णांनी सांगितले, लढाईमध्ये मी काही शस्त्र हातात घेणार नाही. सल्लागार म्हणून येईन मी. गोष्टी सांगेन युक्तीच्या चार.'' हे ऐकल्यावर दुर्योधनाच्या मनावर परिणाम झाला. त्याला वाटले कृष्ण शूर आहे, पराक्रमी आहे, मोठा मुत्सद्दी आहे वगैरे. जी कल्पना होती, ती ही राहिली नाही. ''शस्त्र घेणार नाही म्हणजे काय युद्धात'' म्हणजे शस्त्र घेऊन जो युद्ध करणारा जो आहे, त्याचा पराक्रम त्याच्या शस्त्रावर अवलंबून आहे. ही भावना आहे. प्रत्यक्ष ज्ञानशक्तीसंपन्न, क्रियाशक्तीसंपन्न जो कृष्ण आहे, ती त्याची क्रियाशक्तीसुद्धा शस्त्र घेतल्यावर आहे, ही दुर्योधनाला जाणीव झाली आहे. म्हणजे शस्त्रावर जास्ती विश्वास. कृष्णाने हातामध्ये जर शस्त्र घेतले, तर तो पराक्रम करेल आणि शत्रूचा पराजय करील. म्हणजे त्याने शस्त्राला अधिक महत्त्व दिले. कृष्णाला महत्त्व कमी दिले. हे सगळे आपल्या मनानेच ठरवायचे आहे. आपल्या बुद्धीनेच ठरविले. पण अर्जुनाची

बुद्धी मात्र कायम आहे. ''शस्त्र तुम्ही घ्या अगर नका घेऊ. तुम्ही आमच्या बाजूला या. बसून राहा. तुमची आमच्यावर दृष्टी असली तरी पुष्कळ आहे. शस्त्राला महत्त्व नाहीये.'' अर्जुन खरा वीर होता. केवळ शस्त्रावर शौर्य अवलंबून आहे असं नाहीये. हे त्याला माहित होतं. कृष्णांच्या ज्ञानशक्तीवर, क्रियाशक्तीवर त्याचा पूर्ण विश्वास होता. तुम्ही शस्त्र नाही घेतले तरी चालेल म्हणाला.

दुर्योधन म्हणाला, ''नुसते श्रीकृष्ण माझ्या बाजूनं नको,'' मग श्रीकृष्णांनी आपले सैन्य त्याला दिले. एका व्यक्तीपेक्षा अधिक संख्या असली म्हणजे विजय मिळतो. शस्त्रास्त्र चांगली असली, वापरणारा चांगला असला म्हणजे विजय मिळतो. असे सगळे संस्कार मनामध्ये असल्याकारणाने त्याला श्रीकृष्णांच्या सैन्याचे महत्त्व जास्त वाटले.

कृष्ण भगवानांनं लोकोत्तर कार्य करून दाखविलेले आहे. कालियामर्दनाच्या वेळेस त्यांची केवढी शक्ती दिसून आली. कालियामर्दन झाल्यानंतर गोकुळातल्या लोकांना श्रीकृष्णांच्या शक्तीची जाणीव झाली. तोपर्यंत दैत्य मरताहेत, पुतना मेली, अघासूर मेला, तरी आमच्या मुलाचे संरक्षण देवाने केले म्हणून देवाचीच प्रार्थना करीत बसले. आणि देव तिथे जवळच आहे, या असुरांना मारणारा पण त्यांना श्रीकृष्णांच्या शक्तीची जाणीव नव्हती.

अर्जुनाची बुद्धी आणखी शुद्ध आहे. पण शुद्ध बुद्धीमध्येसुद्धा अहंकार केव्हा निर्माण होईल याचा नियम नाहीये. तो अहंकार अनेक जन्म पाठीमागे लागतो. बुद्धीचे स्वरुपच आहे ते. त्या अहंकारामध्ये सापडलेला जीवात्मा ईश्वराचं स्वरूप असलं तरीसुद्धा ओळखू शकत नाही. ईश्वर दिसत नाही; कशाला मानायचा? काय करायचाय? आपली शक्ती कमी केल्यासारखं आहे. उत्साह सगळा आपला जातो. ईश्वर न मानता आपण प्रयत्न केला पाहिजे वगैरे वगैरे विचार आपण ऐकतो. पण हा अहंकार बाजूला करण्याचे कार्य संतमहात्म्यांचे चाललेले असते. देवाचे कार्य हे चालू आहे. अहंकार भक्ताला होऊ नये.

**अहंकारचा वारा न लागो राजसा।**
**माझिया विष्णुदासा भाविकांसी।।**

द्वारकेमध्ये अर्जुनाचे येणेजाणे चालू होते. श्रीकृष्ण व तो मित्र होते. एका ब्राह्मण स्त्रीला मुलगा झाला आणि त्याचा प्राण गेला. ज्या दराबारामध्ये राम, कृष्ण वगैरे मोठीमोठी मंडळी बसली होती, तिथे त्या ब्राह्मणाने त्या मुलाचे प्रेत आणून टाकले. तो म्हणाला, या राजशासनकर्त्यांच्या दोषामुळे माझ्या मुलाला मृत्यू आला आहे. माझा काही दोष नाहीये. एक मुलगा गेला. दुसरा गेला. तिसरा गेला. प्रत्येक वेळेला ते प्रेत आणून टाकायचं. त्यांना ताकीद करायची, तुम्ही पाप करता, तुमच्या पापाचे फळ मला भोगायला लागते. सात-

आठ मुले गेली. एकदा अर्जुन तिथे आलेला होता. अर्जुनाला आपल्या शक्तीचा अहंकार वाटला.त्याने त्या ब्राह्मणाला जाऊन प्रार्थना केली, ''काय महाराज, आपल्या मुलाचे संरक्षण करणारे इथे कोणी नाही ? मी तुमच्या मुलाचे संरक्षण करतो. घाबरता का ?'' सगळी मंडळी बसलेली आहेत. गोपालकृष्णही बसलेले आहेत. अर्जुन त्या ब्राह्मणाशी बोलतो आहे.

तो ब्राह्मण म्हणाला, तू कोण आता नवीन आलेला आहेस ? इथे बलराम, कृष्ण, प्रद्युम्न यांच्यासारखे पराक्रमी वीर बसलेले आहेत आणि आज तू असा अहंकाराने काय बोलतो आहेस ? ते जिथे माझ्या मुलाचे रक्षण करू शकत नाहीत, तिथे तू कोण करणार ?''

अर्जुनाने विचारले, ''मी कोण आहे तुम्हाला माहित नाही का ? शंकरांच्या बरोबर मी लढाई केलेली आहे. पाशुपतास्त्र मिळविलेले आहे. मला राम किंवा कृष्ण समजू नका तुम्ही.''

या मंडळींच्या तोंडावरच अर्जुन हे बोलला. अहंकारी मनुष्याला भीती राहात नाही. रामकृष्णांच्या तोंडावर बोलायचे, मला काय राम समजता काय ? कृष्ण समजता काय ? अर्जुनाने त्या ब्राह्मणाला सांगितले, ''तुमच्या बायकोचा प्रसूतीकाल बरोबर सांगा. मी येऊन रक्षण करतो तुमच्या मुलाचे.''

पुढे तो ब्राह्मण, बायकोचा प्रसूतीकाल जवळ आल्याचे सांगायला आला. अर्जुन त्याच्याबरोबर गेला. अर्जुनाला धनुर्वेदज्ञान उत्तमच आहे. ईश्वराची कृपा आहे. सगळ्या देवांची कृपा आहे. सगळ्या देवांची अस्त्रं मिळाली आहेत. शंकरांकडून अस्त्र मिळालेले आहे. द्रोणाचार्य तर प्रसन्नच आहेत त्याच्यावर. सगळी अस्त्रविद्या त्यांनी अर्जुनाला दिली. अर्जुनच सर्वश्रेष्ठ ठरला पाहिजे. अशी त्यांची इच्छा होती. अर्जुनाची योग्यता आहे, पण मी योग्य आहे हे तोंडाने सांगणे, ही योग्यता नाही. अज्ञान आहे. कर्तृत्व आपल्याकडे घेतले की ते अज्ञानामध्ये जमा होते.

बलीराजाने तीन पावले भूमी देण्याचे कबूल केले. वामनांनी आपलं विश्वरूप प्रगट केलं आणि दोनच पावलात त्यांनी भूलोक, स्वर्गलोक व्यापून टाकला. मग त्यांनी विचारले, ''तिसरं पाऊल कुठे ठेवू ?'' आत्ता असं कोणा ब्राह्मणाला विचारता येणार नाही. ''तुम्ही इतकं कबूल केलं होतं, मग तितकं का देत नाही ?'' म्हणजे पुन्हा त्याला बोलावणेच यायचे नाही. पण बलीराजा तसा नाही. समर्थ आहे. कबूल केलेले आहे. त्याने सांगितलं, ''तिसरं पाऊल ठेवायला माझे शरीर अद्यापि शिल्लक आहे ना ! माझी भूमी दिली. राज्य संपले. पण माझे मस्तक आहे, त्याच्यावर तिसरे पाऊल ठेवा.'' आता हे दान किती मोठे

झालेले आहे राज्य तर सगळं गेलंच. शुक्राचार्यांची संमती नाहीये. ते म्हणाले, ''हे असं दान करता येत नाही.'' पण बलीराजाने सांगितलं, ''मी आता कबूल केले आहे.'' पण शेवटी आपले शरीरसुद्धा अर्पण केले आहे. आत्मनिवेदन भक्ती याला म्हणतात. ही बलीराजाची आत्मनिवेदन भक्ती मोठी आहे. माझं शरीर घ्या म्हणाला. ''तीन पावले भूमी देण्याचा मी संकल्प केला हो. पूर्ण केला असे सांगा.'' वामनांना आता काय बोलता येणार ?

पण त्या बलीराजाची जी स्त्री होती, ती मोठी विवेकसंपन्न होती. तिने वामनांना प्रार्थना केली, ''महाराज, माझे पतिदेव अज्ञानाने बोलताहेत, तुम्हाला दान करायचे म्हणजे मालकी पाहिजे ना! स्वत:च्या वस्तूचे दान दुसऱ्याला करता येते. 'इदं न मम।' म्हणून ते स्वत्व सोडायचे आहे. ते दोन पावलं भूमी दिली असं म्हणताहेत, ही एक चूक आहे. आणि तिसरं पाऊल त्यांच्या शरीरावर ठेवायला सांगताहेत. ह्यांच शरीर ? शरीर ह्यांनी केलंय का तयार ? संपूर्ण जग ज्याने निर्माण केलंय तो जगाचा स्वामी आहे, एवढं ह्यांना कळत नाही ? विश्वेश्वर स्वत:ला समजतात. स्वत: च्या शरीरावरचे स्वामित्व आपले समजतात ? आणि हे शरीर माझे मी तुम्हाला देतो आणि मी दान केलं असं म्हणा. कोणी सांगितलं दान करायला ? तुमचीच वस्तू तुम्हाला द्यायची आणि दान केलं म्हणायचं, केवढं अज्ञान आहे! त्याबद्दल ह्यांना क्षमा करा. हे दान होऊ शकत नाही.''

**क्रीडार्थमात्मन इदं त्रिजगत् कृतं ते ।**
**स्वाम्यं तु तत्र कुधियोऽपर ईश कुर्यु:।।**
**कर्तु: प्रभोस्तव किमस्यत आवहन्ति ।**
**व्यक्तह्रियस्त्वदवरोपितकर्तृवादा:।।**
**(खंड १ अष्टम स्कंध २२ अ. पृ. १७२)**

''परमेश्वरा, लीला म्हणून सहज सर्व विश्व निर्माण करणारे आपण आहात. परंतु आपल्याला अहंकार नाहीये. सर्वांच्या कल्याणाकरता आपण अवतार धारण करता; अनेक रुपं धारण करता; अनेक लोकांची कार्य करता; संकटाचे निवारण करता. तर मी केलंय अस काही म्हणता येणार नाही. आणि तुम्ही दिलेले, निर्माण केलेले, राज्य म्हणा, शरीर म्हणा माझं समजून मी दान करतो म्हणावं म्हणजे केवढं अज्ञान आहे! ह्यांच्या ह्या दानाला चांगलं म्हणायचं का ?''

वास्तविक केवढे ज्ञान आहे! सर्वस्व देऊन टाकले. विश्वरुप दर्शन होण्याची योग्यता त्या बलीच्या संकल्पामध्ये आहे. हा (वामन) जे मागेल ते द्यायचं. त्यामुळे विश्वरूप दिसलं.

पण त्याच्या स्त्रीला हे पसंत नाहीये. जोपर्यंत चित्तामध्ये अहंकार आहे;- माझं शरीर आहे; माझं राज्य आहे; - तोपर्यंत दान होऊ शकत नाही. दान करण्याचा अधिकार कोणालाच नाही. ''कशाने देवा तुझी पूजा करावी ?'' तुकाराम महाराज म्हणताहेत. फळ, फुलं, पाणी सगळं तुम्हीच निर्माण केलंत. अहंकार नाहीये. आपण अभंगरचना केली असं तुकाराम महाराजांना कधीही वाटलं नाही. अभंगाच्या वह्या इंद्रायणीमध्ये बुडिवल्यानंतर तिथेच बसून राहिले बारा दिवस. 'आपले अभंग गेले.' असे त्यांना वाटले असेल का ? मी अभंगांचा कर्ता आहे असा अहंकार तुकाराम महाराजांना कधीही झाला नाही. मग बसले का ?

**आपुल्या बळे नाही बोलवत।**
**सखा कृपावंत वाचा त्याची ।।**

ही धारणा त्यांची आहे. माझी वाणी नाहीये. अर्थात ज्याच्या वाणीतून हे अभंग निर्माण झालेत, ते अभंग शिल्लक राहिले तर लोकांचे कल्याण होईल. ही तळमळ मनामध्ये आहे. तुका म्हणे असं लोकांनी म्हणावं आणि माझी कीर्ती लोकांच्यात व्हावी असं कसं वाटेल त्यांना ? वाणी माझी नाहीच आहे. विश्वरुपी परमेश्वर आहे. कर्तृत्व त्याचं आहे. माझं नाही.

भगवान् शंकराचार्य महाराजांनी सौंदर्यलहरी या नावाचा एक मोठा ग्रंथ लिहिला आहे. तो संपूर्ण मंत्रमय आहे. त्यातला प्रत्येक श्लोक मंत्रात्मक आहे. प्रयोग आहेत त्यांचे. त्याचे अनुष्ठान केले म्हणजे ती ती फले प्राप्त होतात. सर्व ग्रंथ लिहून झाल्यावर शेवटचा श्लोक त्यांचा आहे.

**प्रदीपज्वालाभिर्दिवसकरनीराजनविधिः।**

''आई ही रचना माझी नाहीये. हे स्तोत्र मी केले असे मी म्हणू शकत नाही. तसे म्हटले तर निरांजने लावायची आणि सूर्याल ओवाळायचे हे काय शोभते का ?'' सूर्याचा प्रकाश केवढा आणि तुमच्या निरांजनाचा प्रकाश केवढा काय उपयोग आहे ?

**सुधासूतेश्चन्द्रोपलजललवैरर्घ्यरचना।**

चंद्र प्रकाशित झाल्याबरोबर चंद्रकांत मण्यातून पाझर फुटतो आहे. ते पाणी घ्यायचे आणि चंद्राला अर्पण करायचं. आणि मी अर्पण केलं म्हणायचं. हे काय शोभते का ?

**स्वकीयैरम्भोभिः सलिलनिधिसौहित्यकरणं।**

समुद्राच्या जवळ जायचं, समुद्राचेच पाणी घेऊन समुद्रालाच अर्पण करायचं. चांगलं झालं

असं समजायचं, त्याप्रमाणे;

**त्वदीयाभिर्वाग्भिस्तव जननि वाचां स्तुतिरियाम् ।।**

''हे वाग्जननि आई, तुझ्याच वाणीने तुझी स्तुती झालेली आहे.'' आचार्य महाराज ''जगदंबेचीच वाणी आहे.'' असं सांगताहेत. तुकाराम महाराज ''सखा कृपावंत वाचा त्याची।'' म्हणतात. माझी वाचा नाहीये. तुकाराम महाराज आणि शंकराचार्य महाराज सारखेच ज्ञानी आहेत.

**सर्वेत ज्ञानीन सम ।**

सर्व शक्ती - ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती जगदंबेची आहे, परमेश्वराची आहे, अशी भावना आचार्य महाराजांची आहे, तुकाराम महाराजांची आहे. ज्ञानामध्ये वैषम्य नाही. ज्ञानी सगळे सारखे आहेत. हे न समजल्यामुळे ज्ञानेश्वर महाराजांचे लेखन उत्तम आहे. शंकराचार्यांचे लेखन कमी दर्जाचे आहे, अशारीतीने बोलणारे लोक जे आहेत- हा निष्कारण वादविवाद आहे. ज्ञान म्हणजे काय याची कल्पना नाही. आणि साम्य कसं आहे, हे ही पाहायचे नाही. आणि ही श्रद्धा खरी श्रद्धा नसते. लोकांचा यामुळे बुद्धिभेद होतो.

तर ही निरहंकार वृत्ती आहे. आणि अहंकार गेल्यामुळे ते अभंग पुन्हा परत मिळाले तुकाराम महाराजांना. ''तुमचे अभंग आहेत. जगाचे कल्याण करण्याकरता तुमची वाणी आहे. माझी वाणी नाही. असंच ते म्हणतात.''

अर्जुनाला झालेला अहंकार- गेला अर्जुन त्या ब्राह्मणाच्या घरामध्ये. चारीबाजूला त्याने बाणांचा पिंजरा तयार केला. आत वारासुद्धा जात नव्हता. त्या बाईला मुलगा झाला आणि मुलगा नाहीसा झाला. इतके दिवस मुलाला मृत्यू आल्यावर त्याचे प्रेत तरी राहत होते. पण या वेळेस शरीरही नाहीसे झाले. इतक्या व्यवस्थेतून तो ब्राह्मण अर्जुनाची निंदा करायला लागला. ''काय गप्पा मारल्यास तू! मला काय कृष्ण समजता काय ? राम समजता का ? काय केलंस तू ? मुलाचे शरीरसुद्धा नाहीसे झाले ? हीच का तुझी शक्ती ? व्यर्थ अहंकार कशाला करतोस ?''

अर्जुनाचा अहंकार जाण्यासाठी ही योजना होती. अर्जुन सगळ्या लोकांत फिरून आला. पण मुलाचा पत्ता लागला नाही. मग त्याने प्रतिज्ञा केली की जर त्या ब्राह्मणाच्या मुलाचे तो रक्षण करू शकला नाही तर तो अग्निप्रवेश करेल. प्रायश्चित्तही घ्यायची तयारी आहे. अग्नी प्रदीप्त केलेला आहे. धनुष्यबाण घेऊन अग्नीत प्रवेश करण्याकरता अर्जुन निघालेला आहे. आले गोपालकृष्ण. अर्जुनाच्या खांद्यावर हात ठेवून विचारले, ''काय चाललंय

अर्जुना?'' अर्जुन रागावून म्हणाला, ''काय तुम्हाला माहीत नाही का? काय चाललंय म्हणजे? ह्या ब्राह्मणाला मी वचन दिले होते. ती माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली नाही.''

भगवान म्हणाले, ''अरे! एवढंच काम होते तर मला सांगायचे नाही का? तू आपला बोलायला लागलास, 'मला राम समजता काय? कृष्ण समजता काय? वगैरे,' म्हणून आम्ही गप्प बसलो. चल दाखवतो तुला ह्या ब्राह्मणाची मुले कुठे गेली ती.''

श्रीकृष्णांची साहजिक शक्ती आहे. आणलेली शक्ती नाही. अहंकाराची शक्ती आणलेली असते. ती टिकत नाही. नुसते म्हणायचे तेवढे. आणि आपल्या दिव्य रथातून सप्तसमुद्र, सप्तद्वीप, सप्तलोकांच्याही पलीकडे अर्जुनाला घेऊन त्या महाकालाच्या स्वरूपापर्यंत गेलेले आहेत. दोघांनी नमस्कार केला, त्या परमेश्वरस्वरूपाला, महाकाल म्हणाले ''आत्तापर्यंत गेलेली त्या ब्राह्मणाची सगळी मुले आणली आहेत. ती घेऊन जा आणि त्या ब्राह्मणाला द्या'' त्यावेळी अर्जुनाच्या मनाची खात्री झाली. अहंकार पूर्ण गेला. जगामध्ये पौरुषेय जेवढं म्हणून आहे, ते सगळं कृष्णांच्या अनुकंपेचेच फळ आहे. त्यांच्या अनुकंपेमुळे जगातले सगळे कार्य करणारे लोक कर्तृत्व बाळगतात, अभिमान बाळगतात, तो समजणे (बाळगणे) बरोबर नाही. सगळे देवाचे आहे. श्रीकृष्णांच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान अर्जुनाला ह्या वेळेला झालेले आहे. पण चमत्कार दाखवावा लागला. चमत्काराशिवाय काय होणार आहे? संत महात्मे सुधारणा करण्याकरता असे चमत्कार दाखवितात. त्यात त्यांना काही स्वत:ची कीर्ती झाली पाहिजे, हा अभिमान नाही. ज्ञानेश्वर महाराज बसलेली भिंत चाललेली आहे. चांगदेव वाघावर बसून येताहेत. अंतराळातून येताहेत. त्यांना अभिमान आहे त्याचा. वाघावर बसलेलो आहे. साप हातात घेतलाय. ''ह्यांचे नियंत्रण मी करू शकतो. '' हा अभिमान घेऊनच गुरुंच्या दर्शनाला आलेले आहेत. आणि इकडे तर भिंत चालायला लागली. निवृत्तीनाथांची इच्छा म्हणून भिंतीवरून सामोरे गेले. अभिमान बाळगण्यासारखी शक्ती कोणाची आहे? हा विचार केला पाहिजे. वाघावर बसून साप हातात घेऊन अंतराळातून येणे वगैरे योगसामर्थ आहे. ते चेतन आहे. वाघ चेतन आहे. त्याचे नियंत्रण सर्कसवालेसुद्धा करू शकतात. पण दगडाच्या अचेतन भिंतीमध्ये क्रियाशक्ती निर्माण करणारे जे आहेत,त्यांची शक्ती मोठी आहे. पण यापेक्षाही जास्ती विचार करायचा म्हणजे इतकी सगळी मोठी शक्ती ते विसरून गेलेले आहेत. ही खरी मोठी शक्ती आहे. अहंकार बाळगण्यासारखी परिस्थिती असूनसुद्धा आपल्या क्रियाशक्तीचा ज्याना विसर पडलेला आहे, याचा अर्थ सर्वही कर्तृत्व परमेश्वराचे आहे, आपलं काही नाहीये. ही पक्की बुद्धी ज्याची झाली, तो विसरून जाऊ शकतो. मी काहीच केले नाही. ही मोठी शक्ती आहे.

तर अशारीतीने चित्तामध्ये जोपर्यंत अहंकारादिक विचार आहेत, तोपर्यंत ध्यान होणार नाही. तप होणार नाही. तप करणाऱ्या मंडळींना संसाराची आसक्ती नाहीये. सर्वच. शक्ती त्याची म्हटल्यानंतर संरक्षक शक्तीही त्याचीच आहे ना! विश्व निर्माण करणाराच संरक्षण करू शकणार. काळजी त्यालाच असणार ना! भाडेकऱ्याला जागेची काळजी असणार किती ? तेवढ्यापुरतं राहायचं. झाडून काढायचं. पडलं काय आणि झडलं काय! त्याला किती काळजी असणार! खरा मालक जो आहे, त्याला जास्त काळजी. पण ही जाणीव चित्तामध्ये उत्पन्न करून देण्याकरता सर्व संत महात्मे प्रयत्न करताहेत. त्यांचे सांगणे आहे. ईश्वराकडे लक्ष द्या.

**जो जे वांछील तो ते लाहो।**

केवढा आत्मविश्वास आहे अंत:करणामध्ये।

**दुरितांचे तिमीर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।।**
**जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात ।।**

**स्वधर्मचरण झालं पाहिजे आणि दुरितक्षय झाल्याशिवाय स्वधर्माचरण होत नाही. जास्ती घोटाळेच होत जातात.**

**अधर्मम् धर्ममितीयामन्यते तपसावृता।**

अशी बुद्धी बदलून जाते. माझेच बरोबर आहे काय चूक काय झाली ? त्यामुळे श्रीकृष्णांवर इतका विश्वास ठेवणाऱ्या अर्जुनाने त्या वेळेला श्रीकृष्णांचा उपमर्द केला. ''रामकृष्ण मला समजू नका.'' म्हणायला लागला. आता काय म्हणायचे ?

'श्रीकृष्ण हा आपला प्रत्यक्ष मुलगा आहे.' एवढीच वसुदेवाची कल्पना होती. ईश्वर आहे ही भावना नाहीये. म्हणून कोणी ऋषीमंडळी आली को तो त्यांना म्हणायचा. ''मला संसारातून मुक्त होण्याकरता काही मार्गदर्शन करा. अमुक सांगा.'' वगैरे. त्या ऋषींना आश्चर्य वाटायचे. प्रत्यक्ष परमेश्वर वैकुंठलोकातून याच्याकरता आला आहे. याची सेवा करतो आहे, ह्याचे हातपाय दाबतो आहे, आज्ञापालन करतो आहे, आणि हा मात्र आम्हाला संसारातून मुक्त होण्याचा उपाय सांगा म्हणतोय.

पण नारद म्हणाले;

**सन्निकर्षोत्य मर्त्यानाम् अनादर कारणम्।**

अहंकार का निर्माण होतो ? अनादर का निर्माण होतो ? जास्ती सान्निध्य आहे. वासुदेवाला

जास्ती सान्निध्य आहे. मुलगाच आहे हा आपला. ईश्वर काय समजायचे ह्याला! किती लोकोत्तर गोष्टी त्याच्या डोळ्यादेखत घडल्या आहेत. कंसाचा नाश केलेला त्यानेच पाहिलंय. सर्वांची सुटका केली. सगळे त्याने पाहिलेले आहे. दहा हजार हत्तींचे सामर्थ्य ज्या कंसाजवळ आहे, होते, त्याला एका झटक्यासरशी मारून टाकलेले आहे.

अहंकाराने केलेला प्रयत्न हा शेवटी समूळ नष्ट होतो. ईश्वरशक्तीपुढे जीवाची अहंकारयुक्त वैयक्तिक शक्ती काय असणार!

कंसाने काय कमी प्रयत्न केले? आठवा मुलगा होऊच नये म्हणून देवकीलाच मारायचं ठरविलं. पण मुलगा नाही, मुलगी झाली. मुलगी निघून गेली आकाशामध्ये. मग कोणाच्या सांगण्याप्रमाणे त्या दहा दिवसात जन्मलेली सगळी मुले मारायचे ठरविले, आपण जिवंत राहण्यासाठी. मुले गेली तरी हरकत नाही . परंतु त्याचा उपयोग झाला ?अवतार व्हायचा तो झाला. अनेक दुर्जनांचा संहार केला. कालिया नाग तिथे गोकुळामध्ये येऊन राहिला, त्यालाही घालवून दिलेले आहे. इथे राहण्याचा तुला अधिकार नाही. गायी किंवा माणसे यांचा हक्क आहे या पाण्यावरती. आणि रोज जर ते मरायला लागले, तर तू इथे राहू शकत नाहीस. किती विषारी तो नाग आहे! काही त्या विषाचा संबंध नाही.

कोणचीही शक्ती ईश्वशक्तीपुढे कार्य करू शकत नाही ना! ईश्वरभक्ती, योगाभ्यास करणाऱ्या महात्म्यांनासुद्धा विषबाधा होत नाही म्हणतात. त्यांना कोणचीच बाधा होत नाही. मग प्रत्यक्ष ईश्वराला काय बाधा होणार!

त्या कालियाला डोहातून हाकलून देऊन ते पाणी शुध्द केले. गोपी-गोपालांचे संरक्षण करण्याकरता भगवान् अवतार घेऊन गोकुळात आले होते. आईलासुद्धा सोडून आले. इतकं प्रेम त्या गोपींवर, यशोदेवर किंवा नंदावर होते. तेही ह्यांच्यावर प्रेम करीत होते.

परमेश्वराबद्दल आदरभाव आपल्या अंत:करणामध्ये कायम राहिला पाहिजे. त्यांच्याकरता देव येणार नाही का?

तर ही जी चित्ताची शुद्ध अवस्था आहे, त्यावेळेला भगवतीचे ध्यान घडू शकते. परमेश्वराची ध्यानभूमिका मिळाल्यानंतर पुढचे सर्व दोष हळू हळू कमी होतात. समाधिअवस्थेमध्ये कालाचे ज्ञान नाही, देशाचे ज्ञान नाही, देहाचे ज्ञान नाही. संपलं. कालच बुद्धीतून निघून गेल्यावर आयुष्य किती? आमच्या घरात किती हे? पुरेल की नाही? हे कालावर अवलंबून आहे. इतका काल जायचाय. सध्याचा काल असा आहे. इतक्या कालाला इतके पुरले

पाहिजे. काल ही भूमिकाच नाहीये. त्यामुळे अंत:करण अत्यंत मोकळे झाले आहे. भीष्माचार्य महाराज उत्तरायण लागल्याबरोबर गोपालकृष्ण उभे आहेत. त्यांच्याकडे पाहाताहेत. आणि स्तुती करताहेत. भगवंता!, मी आपल्याला मी बुद्धी अर्पण केलेली आहे. मनाचं निरीक्षण आहे सारखं. कोणची वासना आहे का? कामक्रोधादि विकार मनामध्ये आहेत का? ते काढून टाकायचा प्रयत्न केला पाहिजे. हाच अभ्यास आहे. भगवत् भक्तीचे सहाय्य त्याच्या जोडीला आहे. सदाचरणाचे सहाय्य आहे. आणखी मनाचे निरीक्षण अखंड चाललेले आहे. की थोडाही दोष राहू द्यायचा नाही. देवाचे चिंतन करायचंय आपल्याला त्या मनात. ते स्थान शुद्ध पाहिजे. जन्मभर आपल्या मनाचे निरीक्षण करून आपले मन शुद्ध केले. तृष्णा नाहीये. काहीही वासना नाही मनामध्ये. अशी बुध्दी मी आपल्याला अर्पण केली म्हणजे संसार सगळा देऊन टाकला. मनापासून बाजूला होणं, मन माझं नाही अशी समजूत झाली की संसार संपलेला आहे. सर्वत्र अंहकार जोपर्यंत आहे, तादात्म्य जोपर्यंत देहामध्ये आहे, मनामध्ये आहे, इंद्रियांमध्ये आहे, तोपर्यंत संसार आहे. असे मोठे अधिकारी महात्मे संसारात राहून आलिप्त आहेत.

भगवान् गोपालकृष्णांनीही भीष्माचार्यांचे महत्त्व वर्णन केले आहे. त्यांनी धर्मराजाला सांगितले, बाबा! भीष्माचार्यांची केवढी ज्ञानशक्ती आहे! वेदांचे ज्ञान आहे, शास्त्राचे ज्ञान आहे, धनुर्वेदाचे ज्ञान आहे, मंत्रशास्त्राचे ज्ञान आहे, दिव्यज्ञानशक्ती आहे. तुला जेवढे घ्यायचे तेवढे घे. त्यांचे आता फक्त ५५-५६ दिवस राहिलेले आहेत. नंतर ते जाणार आहेत. तुला काही विचारायचे असेल ते विचारून घे. जिज्ञासू आहेस तू. ह्यांच्यासारखे ज्ञान दुसरीकडे कुठेही नाही.'' ते जाऊ नयेत असे गोपालकृष्णांनाही वाटत होते. त्या ज्ञानाचा इतका उपयोग झाला आहे, की मनातले सगळे दोष काढून टाकून तृष्णारहीत आपली बुद्धी परमेश्वराला अर्पण करून भीष्माचार्यांनी ब्रह्मप्राप्ती करून घेतली.

अशारीतीने शुद्ध चित्ताशिवाय ध्यान होणे शक्य नाही. परमेश्वराचे ध्यान हेच खरं तप आहे. त्या तपाचा अधिकार प्राप्त होण्याकरता देवानुग्रह पाहिजे. जगदंबेची कृपा पाहिजे. उपासना अखंड झाली पाहिजे. त्या उपासनेच्या योगाने ही सगळी साधने आपोआप प्राप्त होतात. दोषनिवृत्ती होते. गुणप्राप्ती होते. साधनाभ्यासही अखंड चालू राहतो. प्रतिबंध सगळे दूर होतात. हे ईश्वराच्या अनुग्रहाचे कारण आहे.

व्यास महर्षी महालक्ष्मीचे अवतार कसे झाले हे जनमेजय राजाला पुढे सांगणार आहेत.

कायेन वाचा मनसेंद्रियेवा।
बुद्ध्यात्मनावा प्रकृती स्वभावात्।।
करोमि यद्यत् सकलं परस्मै।
नारायणायति समर्पयामि।।

सर्व मंगल मांगल्ये । शिवे सर्वार्थसाधिके।।
शरण्ये त्र्यंबेक गौरी । नारायणी नमोस्तुते।।

## दिवस सहावा

व्यास महर्षींनी सर्व देवतांची पुराणे तयार केली आहेत. योगसामर्थ्य मोठं आहे. बुद्धी सामर्थ्यही फार मोठं आहे. शुध्द बुद्धी आहे. त्यामुळे कोणच्या कोणच्या देवांचे कुठे कुठे कोणच्या कोणच्या कालात अवतार झाले, हे सर्वही त्यांनी व्यवस्थित मांडून ठेवले आहे. एकत्व बुद्धी सगळीकडं आहे. शिवपुराण लिहीताना शिवांचं सगळं वर्णन, विष्णुपुराण लिहिताना विष्णुंचं, देवीपुराणात देवीचे.तर अशी पुराणे भिन्न भिन्न देवतांची लिहिली असे जरी दिसले, तरी सर्वही शक्ती एक आहे, ही पक्की जाणीव आहे. म्हणजे हा अनुभव आहे, हे ज्ञान आहे, साक्षात्कार आहे. ऐकणाऱ्याची बुद्धी वेगळी वेगळी आहे.

आता नवविधाभक्ती आपण म्हणतो. श्रवणम्, कीर्तनम्, स्मरणम्, पादसेवनम् - नऊ प्रकार आहेत. पण नऊ प्रकरची भक्ती एक मनुष्य करू शकत नाही. कारण सगळे प्रकार त्याला आवडत नाहीत ना! अर्चन म्हणून एक भक्ती आहे. पूजा करणं. पण पूजा करणं सगळ्यांना आवडतं का? काय तासभर शांतपणे बसून व्यवस्थितपणे सोळा उपचार अर्पण करणे कोणाला नाही पसंत. नुसत्या देवाच्या कथा ऐकाव्यात, नामसंकीर्तन करावं. अशी एकेक भक्तीची आवड असणारीही मंडळी आहेत. म्हणून तो काही दोष नाहीये. अनादर नाही. पूजा नाही आवडत. काय बुवा आम्हाला कंटाळा येतो पूजा करायचा. बरे देवाची चरित्रं वाचत जा. वाचन करण्याची आवड आहे. ते ऐकावं, ते वाचावं. तरी हरकत नाही. परमेश्वराचं अस्तित्व मान्य आहे. आस्तिक्य बुध्दी आहे. ईश्वराची योजना आहे. प्रत्येक वेळेला वेदव्यासांचा अवतार होत असतो म्हणतात. त्यांनी पुराणांची रचना करायची. सप्तऋषी म्हणून नेमलेले आहेत परमेश्वराने. वेदपंरपरा त्यांनी सुरक्षित ठेवायची आहे. एक युग झाल्यानंतर वेदांचा लोप होतो, ऱ्हास होतो. त्यांनी सगळ्या एकंदर जे असतील, त्यांना शिकवायचे, पुन्हा वेदपरंपरा चालू करायची. ते ऋषींचे काम आहे. अशी विश्वाची व्यवस्था ही परमेश्वराने केलेली आहे.

वेदव्यास मुनींनी शिवपुराण लिहिले. शिवांचे महत्व वर्णन केले म्हणजे विष्णुंबद्दल अनादर असा अर्थ नाही. विष्णुपुराण लिहिले त्यात विष्णुंचे महत्त्व सांगितले. शिवभक्त असतील त्यांची शिवभक्ती वाढावी हा उद्देश. त्यांची स्वत:ची भूमिका वेगळीच आहे. शिव काय, विष्णु काय, देवी काय, गणेश काय, सगळीही एक शक्ती आहे. भेद नाही. अद्वैत बुद्धी झालेली आहे आणि द्वैताचं प्रतिपादन करताहेत. पण ते सुद्धा उत्तम आहे. सप्रमाण आहे. किती राजांची म्हणजे उपासकांची चरित्रं लिहिली आहेत. शिवभक्तांची आहेत. विष्णुभक्तांची आहेत. देवीभक्तांची आहेत. त्या त्या वेळेला तन्मय होऊन जाणं. भागवतामध्ये श्रीकृष्णांचं चरित्र लिहिताना किती तन्मय होऊन गेलेत व्यासमहर्षी! गोपींच्या बरोबर रासक्रीडा चाललेली आहे. भगवान् श्रीकृष्ण परमात्मा गुप्त झाले. गोपी अतिशय दु:खी झाल्या. त्या गोपींचे जे गीत त्यांनी लिहिले आहे. ते गोपीभाव धारण करून लिहिलेले आहे.

**जयति तेऽधिकं जन्मनाव्रज:।**
**श्रयत इंदिरा शश्वदत्र हि।।**
**(श्रीमद्भागवत स्कं. १० अ. ३१ श्लो. १)**

हे जे सबंध गीत आहे, ते गोपीरूप होऊन त्यांनी वर्णन केलेले आहे. संतांनी गोपींचे, गवळणींचे वर्णन केले आहे. गोपी प्रार्थना करताहेत, ''वृंदावनांत कसे जाऊ? तुझी मुरली वाजवू नकोस. अमुक करू नकोस.'' म्हणजे अगदी गोपीमय होऊन त्यांच्या मुखातून ती वाणी निघतेय.

तेव्हा श्रीकृष्णांचं वर्णन किंवा विष्णुंचं पुराण लिहिताना विष्णुमय होताहेत. तीच शक्ती आहे. शिवपुराण लिहितानाही शिवमय होऊन जाताहेत.विष्णु सोडून दिले, आता शिवाकडे वळले. असा अर्थ नाहीये. अद्वैत बुद्धी आहे. एक बुद्धी आहे. आमची तशी बुद्धी राहात नाही ना! त्यामुळे आमच्या बुद्धीमध्ये जी मूर्ती किंवा जो आकार, जे आणखी स्वरूप आलेले आहे. तेच पक्कं राहावं - तिथून मग सर्वव्यापी बुद्धी होते मग - त्या उद्देशाने त्यांनी सगळी वेगळी वेगळी पुराणे लिहिली आहेत.

तर अशारितीने देवी पुराणाचेही वर्णन त्यांनी केलेल आहे. देवी भागवत म्हणून आहे. महालक्ष्मीचे जे स्वरुप, ते मुख्य स्वरुप गृहीत धरले आहे.

**सर्वस्य आद्या महालक्ष्मी ।**

आद्य महालक्ष्मीचे रुप मानलेले आहे, तीच महालक्ष्मी आहे, तीच भुवनेश्वरी आहे. तीच परब्रह्मरुप आहे. विराट स्वरुप, सूत्रात्म स्वरुप, अंतर्यामी स्वरुप आणि सच्चिदानंद ब्रह्मस्वरुप; असे चार विभाग आहेत.

**मनन म्हणजे मनाने विचार करायचा. वेदांतशास्त्रामध्ये मनन करायला सांगितले आहे. एकट्याला जर तशी विचार करण्याची बुद्धी असेल, तर एकट्यानेही विचार करावा. किंवा समानशील जी मंडळी आहेत;- भक्ती आहे, जिज्ञासा आहे; - त्या चार मंडळींनी मिळून मनन करावे. चिकित्सा करावी. एकट्याने करावी, सर्वांनी मिळून करावी. चिकित्सा करून योग्य-अयोग्य निर्णय करून अयोग्य सोडून द्यायचे आणि योग्य तेवढे बुद्धीमध्ये ठेवायचे. हे करता आले पाहिजे. विवेक साधला पाहिजे. नित्य काय आहे? अनित्य काय आहे? काय प्रमाण त्याच्याबद्दल आहे? असा सगळा विचार आहे.**

**विचार करण्याचे तीन विषय सांगतात.**

जगाचा एक पहिल्या प्रथम विचार करावा. **विश्व म्हणजे काय आहे?** त्याचे मूलतत्व काय आहे? हे कायम राहणारे आहे? का बदलणारे आहे? असे विचारांचे प्रकार पुष्कळ असतात. तर जगाचा एक विचार करावा. विचार करणे हे बुद्धीचे काम आहे. आणि विचार करून मग आचार आहे. हे सगळं नंतर आहे.

त्यानंतर जीवस्वरुप म्हणजे काय आहे? हा 'अहम्' कोण आहे? प्रत्येक वेळेला मी करतो; मी बोलतो; मी ऐकतो; ही जी सगळी कार्य 'अहम्' कडून चाललेली आहेत, त्यातला खरा 'अहम्' कोण आहे? मी ऐकतो आहे, मी ऐकले आहे, श्रवण केलेले आहे. म्हणजे श्रवणेंद्रियालाच 'अहम्' , 'मी' समजतो आहे. पाहातो आहे. चंक्षुद्रियालाच तो 'अहम्' समजतो आहे. यातला 'अहम्' कोणचा? खरा कोण? हा ही विचार आहे. निवडून काढायचे आहे. धान्य निवडावं लागतं ना!

निवडताना कोणचं आणखी साधन चांगलं हा ही विचार आहे. कोंडा काढून टाकायचा आणि धान्य तेवढ शिल्लक ठेवायचे. चाळण चांगली की सूप चांगले? सगळा विचार करायचाय. चाळणीनेसुध्दा चाळायला लागल्यानंतर कोंडा खाली पडतो. पण काही काही चांगले पदार्थही खाली पडतात. सगळं काही चाळणीत राहात नाही. चाळणीसारखा विचार उपयोग नाही.

सुपाने निवडायचंय. पाखडल्यानंतर कोंडा, खडे वगैरे सगळे पुढे येतात आणि सगळे निघून जातात. आणि शुद्ध धान्य शिल्लक राहातं. सुपाप्रमाणे विचार केला पाहिजे. 'विचार करण्याची पद्धत सुपाप्रमाणे पाहिजे.' असा सिध्दान्त आहे. दोष तेवढे टाकून द्यायचे. सुपाने पाखडताना खडे, कोंडा काढून टाकायचे कौशल्य बायकांकडे असते. आपल्याला ते येईल की नाही कोणास ठाऊक.

तेव्हा जगाचा विचार करताना दोष म्हणून जे आहेत, त्याज्य आहेत, ते काढून टाकायचे आहेत. सुपाप्रमाणे विचार करता आला पाहिजे. आणि गुण तेवढे घ्यायचे; शिल्लक ठेवायचे.

चाळणीप्रमाणे विचार करण्याची बुद्धी दुर्जनांची असते. सगळे धान्य खाली पडून जाते. मोठे खडे वगैरे तेवढे वरती राहतात. गुण सगळे गेले. दोष शिल्लक राहिले. विचार करण्याची पद्धती कशी पाहिजे इथून सुरुवात आहे. तो विचार कसा केला पाहिजे ? मूळ श्रद्धा कायम ठेऊन विचार झाला पाहिजे. 'ईश्वर नाहीच आहे.' असे पक्के ठरवून विचार करायला लागल्यावर हाताला काय लागणार आहे ? 'ईश्वर आहे.' असे सिध्द होईल ? 'ईश्वर कसा आहे ?' हे आमच्या मनाला पटवून घेण्यासाठी विचार हे एक साधन आहे. 'ईश्वर नाही' हे ठरविण्याकरता विचार नाहीये. ईश्वर आहे हेच ठरविणे मोठे कौशल्य आहे.

भगवतीचे विराट स्थूल रुप समोर आहे. पंचमहाभूतांपासून तयार झालेले आहे. तेसुद्धा अनंत आहे. विश्वाचा पत्ता हा बुद्धीने लागणे कठीण आहे. कितीही वैज्ञानिक प्रगती झाली तरी संपूर्ण विश्व समजले. असं कोणीही म्हणू शकणार नाहीय. महासागर किती आहेत ? कुठे आहेत ? त्याच्यामध्ये कोणते कोणते प्राणी आहेत ? अरण्ये किती आहेत ? कुठे समजले आहे ? अजून असी कितीतरी अरण्ये आहेत, की जिथे मानवाचे पाऊलही पडलेले नाही. गेलेला माणूस परतही येत नसेल. कोण कशाला जाईल ? संशोधन करण्याची आवड असेल तरी प्राण गमवायला कोण जाणार ?

डोळ्यांनी दिसणारे जे विराट् स्वरुप आहे, तेच तेवढे खरे मानायची आमची तयारी आहे. बरं ते तरी किती आहे पहा. सगळे विश्व किती आहे हे समजतंय का ? स्थूलस्वरूप भगवतीचे आहे, जगदंबेचे आहे. पृथ्वी, जल, तेज, वायू , आकाश, एकेक महाभूत आहेत. पुराणामध्ये पृथ्वीचा विचार करताना त्यांनी सांगितलंय, पृथ्वीवर सात द्वीपे आहेत. वेगवेगळे देश आहेत; द्वीपे आहेत. एकापेक्षा दुसरे द्वीप दुप्पट मोठे आहेत. एक लाख योजने विस्तीर्ण जंबूद्वीप. त्यांच्या दुप्पट म्हणजे दोन लाख योजने विस्तीर्ण - पृथ्वी मंडलाकार आहे. - जंबूद्वीपाच्या पुढे शाकद्वीप, कुशद्वीप वगैरे एकापेक्षा एक मोठी द्वीपे आहेत. तिथे कोण कोण राहतात ? ती सगळी माहिती पुराणामध्ये दिली आहे. पण आमची बुध्दी बदलून गेलेली आहे. नाही म्हणायचा अभ्यास बुध्दीला झालेला आहे. काहीही मानायचे नाही. ईश्वर नाही असे तर आम्ही म्हणतोच आहोत. छापूनही येते. अमक्या अमक्याचे असे मत आहे. ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करणारी जी प्रमाणे आहेत, ती प्रमाणेही आम्हाला मान्य नाहीत. पुराणे ही प्रमाण आहेत. मोठे मोठे ज्ञानी महात्मे त्यांचे कर्ते आहेत. जिज्ञासू जीवांची श्रद्धा, भक्ती वाढावी म्हणून ती लिहिली आहेत. पगार घेऊन लिहिलेली नाहीत. व्यास हे एक

ऑफिस होते म्हणतात. एकटे व्यास कसे करतील ? महाभारत एकट्या व्यासांना करणे शक्य आहे का ? आम्हाला शक्य नाही म्हणजे त्यांनाही शक्य नाही म्हणायचे. स्नान-संध्या आटोपून बसल्यवार शिष्यांनी फक्त लिहून घ्यायचे. ज्ञानेश्वरी किती लवकर झाली. हे खरं वाटेल कोणाला ? सच्चिदानंदबाबा म्हणतात, ''ज्ञानेश्वर महाराज बसलेत, गीतेचा गुढार्थ सांगताहेत, विवरण करताहेत.'' त्यांची बुध्दिमत्ता, आमची बुद्धिमत्ता आणि आक्षेप घेणाऱ्यांची बुद्धिमत्ता यात जमीन अस्मानाचा फरक आहे. हे मान्य नाही आम्हाला. अभिमान आहे अखंड.

तर लोक कल्याणाकरता निर्माण झालेले ग्रंथ प्रमाण आहेत. त्यांनी सांगितलेले सगळे योग्य आहे. ते तपासून घ्या तुम्ही कमी जास्ती काळावरून एखाद्या गोष्टीची योग्यता कोणी ठरवायची ? आणि काळाचा निर्णय तरी आमच्या बुद्धीने बरोबर तरी होतो कशावरून ? आणि काय त्याचा उपयोग ? प्रमाण ग्रंथांनी उद्देश पुढे मांडलेले आहेत. कोणच्या प्रधान देवतेची उपासना त्यात्यात दिलेली आहे, वेदव्यास पुराणात या ठिकाणी काय सांगताहेत ? वक्त्याचा अभिप्राय काय काय आहे ? हे समजून आल्यानंतर यथार्थ ज्ञान होते. ते समजून घेण्याकरता श्रद्धा पाहिजे, जिज्ञासा पाहिजे. श्रद्धा जाऊ दे, ज्ञान व्हावं. अशी इच्छा तरी पाहिजे ना! का सगळंच ज्ञान आणखी खोटे आहे ? आधीच ठरवून बसायचे विचार न करता!

वेदव्यासांनी जगदंबेचे विराट स्वरूप, भिन्न भिन्न देवतांच्या शक्ती, पुराणरुपाने आपल्या सर्वांसमोर मांडल्या आहेत. त्यांचे सांगणे बरोबर नाही असे म्हणण्याचा अधिकार आम्हाला नाही. आमची बुद्धी त्यांच्या पासंगालासुध्दा लागणार नाही. त्यांनी नि:पक्षपातीपणे सगळे समोर मांडले आहे. त्यांच्या मताने सर्व शक्ती एक आहे. त्यामुळे त्यांचा बुध्दीभेद होण्याचा प्रसंगच येत नाही.

परीक्षित राजाने विराट् स्वरूप जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली. काही मंडळी म्हणाली, आता सातव्या दिवशी मरणार हा, आणि भूगोल कशाला ऐकतो आता ? काय करायचाय ऐकून ? पण राजाने सांगितले, भूगोल म्हणजे भौतिक दृष्टीने जाणून घ्यायचा नाहीये. ते एक ईश्वराचे रूप या दृष्टीने जाणून घ्यायचा आहे. विश्वरुपी परमात्मा त्याने धारण केलेले विराट् स्वरुप आहे तरी किती ? हे जेवढे समजावून घेता येईल. तेवढे घेऊ. शुकाचार्यांनीही सांगून टाकले, मी सगळे सांगू शकणार नाही. ते अनंत आहे. तेव्हा जेवढे विराट् स्वरुपाबद्दल प्रतिपादन करता येईल, तेवढे त्यांनी केले, सप्तद्वीप, सप्तसागर, त्यात राहणारे राजे कोण आहेत ? भक्त कोण आहेत ? हे सगळे वर्णन केले. त्याच्यानंतर पुढे काय आहे ? त्रैलोक्याच्या

सभोवती लोकालोक पर्वत आहे. एकंदर हा पृथ्वीचा विभाग आहे. पृथ्वीच्यानंतर जल भाग आहे. जल पृथ्वीपेक्षा दसपट आहे. त्याच्यापेक्षा दसपट तेज आहे. त्याच्यापेक्षा दसपट वायू आहे. आणि आकाश अनंत आहे. हे सगळे पुराणकारांनी निश्चितपणे आणि व्यवस्थितपणे मांडून ठेवलेले आहे. श्रद्धा, भक्ती, जिज्ञासा वाढण्यासाठी जेवढे आहे, तेवढे पुढे ठेवले आहे. ज्याला ज्या देवतेची आवड आहे, त्या देवतेची त्याने भक्ती करावी.

अय्यप्पा दीक्षित म्हणून एक मोठे शिवभक्त होऊन गेले. त्यांनी सांगितले परमात्मा एकच आहे. संपूर्ण ठिकाणी एकमेव अद्वितीय ब्रह्म आहे. 'वासुदेव: सर्वम्।' भगवान् श्रीहरि परमात्मा हाच सर्वरूपी आहे. दुसरे कोणीही नाही. हे ज्ञान झालेले आहे. ते म्हणतात. ''भगवान शंकर, भगवान विष्णु याच्यात काहीही भेद नाहीये. एक शक्ती आहे. आचरण वेगळे वेगळे असेल. पण पूर्ण शक्ती ही दोन्ही ठिकाणी एकच आहे. पारमार्थिक दृष्टीने भेद नाहीये. माझी भक्ती, माझी बुद्धी त्या चंद्रचुडाकडे जाती आहे.'' जाऊ दे. काही हरकत नाही. त्यांच्यात (म्हणजे शिव व विष्णुंच्यात) भांडण नाहीये. 'हा शिवाची भक्ती करतो' अशी विष्णु तक्रार करीत नाहीयेत. त्यांचे भक्तच जर इतक्या अद्वैत भूमिकेवर गेले, तर त्यांच्यात कुठला भेद? अयप्पा इतके मोठे भक्त होते, की द्वैतामध्ये राहून त्यांनी शिवभक्ती केली. अद्वैत पूर्ण मनामध्ये आहे. पण द्वैतही मान्य आहे. त्यांनी एकदा त्यांच्या मुलाला सांगितले, ''आज संध्याकाळी माझ्या खोलीमध्ये ये आणि माझ्या मुखातून काय निघते ते सगळे लिहून ठेव.'' त्यांनी सकाळी मुद्दाम विषारी धोत्र्याचे बी खाल्ले. पाच वाजता तो मुलगा त्यांच्या खोलीत आला. त्यावेळी अय्यप्पांच्या मुखातून शिवस्तुती चालू होती. ती त्याने सगळी लिहून घेतली. विष उतरल्यानंतर त्यांनी ती स्तुती पाहिली. समाधान वाटले. मरणाच्यावेळी आपल्याला भगवंताची आठवण येते की नाही? हे पाहण्यासाठी स्वत: वरच त्यांनी प्रयोग केला. विष घेऊन पाहिले. हे आम्हाला शक्य आहे का? इतकी भक्ती आहे का आमची?

तर अशारीतीने भक्ती कोणाची करावी याबद्दल स्वातंत्र आहे आम्हांला. कर्ममार्गामध्ये प्रत्येकाची कर्म वेगळी आहेत. ती लष्करी आज्ञा आहे. हे असं का करायचे? हे त्या सैनिकांची विचारायचे नाही. 'चला! पुढे चला!' म्हटल्यावर पुढे गेलेच पाहिजे. गोळीबार होतोय, मरण येणार वगैरे काही विचार येणार नाही. भक्तीमार्ग हा प्रेमाचा आहे. प्रेमामुळे कमी जास्ती प्रमाणात तुम्ही भक्ती करू शकता. 'पत्रम्, पुष्पम्, फलम्, तोयम्' सांगताहेत भगवान्. काहीही चालतं म्हणाले. पण काहीही चालतं म्हणजे तशी निस्सीम भक्ती असेल तर चालतं. नाहीतर आपलं उपचार आमच्याजवळ काही नाही, फुले आज आणली नाहीत, 'पुष्पर्ते नमस्कारं समर्पयामि।' किंवा 'अक्षताम् समर्पयामि।' असे म्हणून नमस्कार करून

उठून आम्ही ऑफिसला निघून गेलो म्हणजे झालं. पण ही खरी निस्सीम भक्ती नाहीये. देवाने सांगितले म्हणून काय झाले? पत्रम्, पुष्पम्, फलम्, तोयम् काहीही चालते. पण कोणाचे चालते?

शबरी तळमळीने वाट पाहते आहे. तिच्या गुरुमहाराजांनी तिला सांगितले, ''भगवान् रामचंद्र तुला भेटतील. त्यांचे दर्शन झालं म्हणजे तू ये'' शबरी साक्षात्कार भूमिकेपर्यंत गेलेली आहे. पण सगुण भक्तीही मोठी आहे. रामचंद्रांच्या दर्शनाची तळमळ अंत:करणामध्ये लागलेली आहे. ते येणार म्हणून समजले. आपल्याजवळ दुसरे त्यांना देण्यासारखे काहीच नाही म्हणून रानांत जाऊन बोरं गोळा करून आणली. पिकलेले बोर कोणचे आणि कच्चे बोर कोणचे हे तिला माहित असणार. पण तरीही तिला वाटले एखादे वेळेला आंबट, तुरट एखादे बोर असले तर! आपण त्याची चव घेऊन देवाला देऊ. आपल्या इंद्रियांनी अनुभव घेऊन देवाला द्यायचे. बाहेरच्या व्यावहारिक पूजापद्धतीमध्ये हे बसणार नाहीये. पण या भक्तिमार्गामध्ये ते मान्य आहे. बोर चांगलं दिसून उपयोग नाही. खायची आहे ती वस्तू. राम खाणार आहेत. माझ्यासारखं पाटीतली बोरं पाहिली आणि ठेऊन दिली असं नाहीये. ज्या इंद्रियांनी राम ती बोरं खाणार, त्या इंद्रियांनी ती बोरं चांगली आहेत की नाही पाहायची हे तिला वाटलं तर चूक आहे का? तिच्या प्रेमाला ते साजेसे आहे. म्हणून दाताने चावून आंबट-गोड पाहायचे. गोड असेल ते ठेवायचे. देवाला द्यायचे ते चांगलेच दिले पाहिजे. **चांगल्या वाईटाचा निर्णय दुस-याच्या सांगण्याप्रमाणे घेऊन उपयोग नाही. आपल्या स्वत: च्या बुद्धीने केला पाहिजे. आपल्या इंद्रियांच्या द्वाराने केला पाहिजे. पण तिथे संशय येऊन उपयोग नाही. आमची भक्ती संदेहामध्ये पडलेली आहे.** आम्ही खाऊन देवाला कधीच देणार नाही. नावे ठेवू. ''काय खातोय! देवाला काय देतोय! तेही योग्य आहे.''

राम, लक्ष्मण आलेले आहेत. शबरी म्हणाली, ''या! या! रामचंद्रा, समोर बोरं ठेवलेली आहेत ती घ्या. अगदी गोड आहेत हो! सगळं अगदी निष्कपट अंत:करण आहे तिचे. आत एक बाहेर एक असं नाहीये. मी खाऊन पाहिलेली आहेत. सांगते आहे ती. गोड आहेत. आंबट लागणार नाहीत तुम्हाला.'' हे धैर्य आमच्याजवळ आहे का? कोणी मोठा मनुष्य आला तर त्याला आपण इतकं प्रेम दाखवू शकतो का? इतके बोलू शकतो का? पण रामरायांनी ही बोरं घ्यावीत एवढीच इच्छा आहे. त्यांचीच बोरं आहेत. त्यांचेच सर्व विश्व आहे. सर्व विश्वरुपी ते आहेत. पण आज या जन्मामध्ये माझ्यावर हा प्रसंग आलेला आहे. हे भाग्य आज मला गुरुंच्या कृपेने मिळालेले आहे. ही पराभक्ती आहे. पराभक्तीला सर्व क्षम्य आहे. ''रामराया! मी ती चाखून पाहिली आहेत. आपण घ्या!'', म्हणाली. आणी

रामरायांच्याही मनात काही नाही. एकेक बोरं घेताहेत आणि खाताहेत. त्या बोरावर शबरीचे दात उठलेले आहेत. त्या लक्ष्मणाची हे पाहूनसुध्दा बोलायची छाती नाहीये. भक्ताचीही योग्यता आणि देवाचीही योग्यता. दोघे एकरुप होऊन गेलेले आहेत. लक्ष्मण काय करू शकतो ? उष्टी आहेत म्हणेल ? त्याला बोलायची इच्छाच नाहीये. गप्प बसलेला आहे. मुकाट्याने पाहतो आहे. रामराय बोरं खाताहेत.

तर ही जी अवस्था आहे, - भक्तिमार्ग फार मोठा आहे. भक्तीचाही उत्कर्ष झाला पाहिजे. म्हणून कृष्णावतार झालेला आहे. हे कारण आहे. कृष्णावताराचे अनेक वेगवेगळे हेतू आहेत. त्यात हा एक हेतू आहे. कुंतीमाता स्तुती करते, ''तुमचा अवतार परमहंस परिव्राजकाचार्य, म्हणजे ज्यांनी आपले अंत:करण निर्विषय केलेले आहे. स्थितप्रज्ञता ज्यांनी मिळविलेली आहे. अनेक जन्मांमध्ये ईश्वराची, सद्‌गुरुंची भक्ती करून, सदाचारणाने वागून ही भूमिका ज्यांनी मिळविलेली आहे. अशाप्रकारचे ज्ञानी महात्मे, त्यांना भक्तियोग समजावून सांगायचा आहे.'' पांडुरंग पंढरपुरला भक्तियोग सांगण्याकरता येऊन राहिले. धर्माचरण करणारी मंडळी असतील, शास्त्र वाचतील, अभ्यास करतील, उत्तम वक्तृत्व असेल, लोकांचे मन आकर्षित करून घेतील, सगळं असेल. हा भक्तियोग स्वतंत्र आहे. त्यांना भक्तियोग शिकविण्याकरता भगवान् श्रीकृष्णांनी अवतार घेतला, हे कुंतीने ओळखले आहे. कृष्णावताराचा हा एक हेतू आहे.

तर अशी ही भक्ती त्या शबरीच्या अंत:करणात असल्या कारणाने, बाहेरचे जे काही दोष आहेत, ते सगळे संपलेले आहेत. देवाच्या मनात तर नाहीच. कशाला ? उष्टबिष्ट काहीच नाही. त्यावेळी सहभोजन चालू होते, असे संशोधन करून सांगणारे बुद्धिमान भेटतील आता आपल्याला. ते सहभोजन फार वेगळे आहे. अत्यंत पुण्य असल्याशिवाय ते मिळणार नाही. स्वत: खाण्याकरता त्या शबरीने बोरं काढली नाहीत. हा पहिला विचार आहे. रामरायांना बोरं द्यायची आहेत. त्यांच्या जिभेला ती चांगली लागली पाहिजेत म्हणून आपल्या जिभेने ती तपासून पाहिली पाहिजेत. ही शुद्ध बुध्दी आहे. ही ऋजुता आहे. सर्व गुणांमध्ये आर्जव हा मोठा गुण आहे. ऋजुता ज्या ठिकाणी असेल, त्या ठिकाणी भगवंताची कृपा निश्चित असेल.

तर विराट् स्वरुपाचे, साकार ईश्वरस्वरुपाचे चिंतन करून त्याप्रमाणे वागणे ज्यांचे आहे, अशा अधिकारी भक्तांना भगवान् सांगताहेत-

**पत्रम्, पुष्पम्, फलम्, तोयम्-**

ते मला मान्य आहे. भगवतीचे विराट् स्वरुप आणि सर्वात सुक्ष्म म्हणजे सूत्रात्मा स्वरुप,

स्थावर म्हणजे वृक्ष वगैरेसारखे एका ठिकाणी स्थिर राहणारे, चलनवलनादि क्रिया आहे, ज्ञानशक्ती आहे, अशाप्रकारचे जीवात्मेसुद्धा अनंत आहेत. ईश्वराचे स्वरूप किती विराट्, विश्वरुप आहे, याचा विचार सुरु केल्यावर बुद्धी स्तब्ध होते. विचार थांबतो, शेवटी आपले अज्ञान मान्य करावे लागते 'नाही ! पुढे आम्ही जाऊ शकत नाही. अचिंत्य आहे सगळे.' ह्या जंगम सृष्टीमध्ये अनेक जीवात्मे आहेत. भूमीवर राहणारे आहेत, पशुपक्षी आहेत. जलचर प्राणी आहेत. अनेक शरीरात राहणाऱ्या जीवात्म्यांना ज्ञान करून देण्याची साधने आहेत. ज्ञानेंद्रियं आहेत, कर्मेंद्रियं आहेत. काही काही जण एकाच इंद्रियाने दोन इंद्रियांचे काम करू शकतात. संशोधन करणऱ्याला माहीत आहे. सापाला कान नसतात म्हणतात. काय खरं खोटं संशोधन करणाऱ्यांना माहित. चक्षुश्रवा सापाला म्हणतात. त्याच्या डोळ्यात दोन प्रकारची शक्ती असते. पाहू ही शकतो, ऐकूही शकतो, ऐकायला येत नाही असे नाही. श्रवणेंद्रिय आहे.

तर ज्ञान करुन देणारी इंद्रिये आहेत. परमात्मा विश्वरुप झाले. आणि आपले स्वरुप पाहता यावे, म्हणून ही सगळी इंद्रियं निर्माण केली. कर्मेंद्रियं आहेत. कुठे कुठे परमेश्वराची व्याप्ती तिथपर्यंत आपल्याला जाता यायला पाहिजे ना ! शास्त्रकारांनी या ज्ञानेंद्रियांचा व कर्मेंद्रियांचा संबंध सांगून ठेवला आहे. डोळे हे ज्ञानेंद्रिय आहे. मूर्त स्वरूप, वर्ण, पदार्थ वगैरेंचे ज्ञान करून देणारे इंद्रिय डोळे आहेत. आणि पाय हे कर्मेंद्रियं आहेत. पण या इंद्रियांच्यात परस्पर काही संबंध आहे म्हणतात. डोळ्यांची आग व्हायला लागल्यावर जर काशाच्या वाटीने तूप तळपायांना चोळले तर डोळ्यांची आग शांत होते. म्हणजे तळपायांचा आणि डोळ्यांचा काहीतरी संबंध आहे ? सगळे अतिंद्रिय आहे. भिन्न भिन्न भुतांच्यापासून तयार झालेली परस्परांशी संबंध असलेली ही इंद्रिये ज्ञानाची साधनं म्हणून परमेश्वराने निर्माण करून ठेवलेली आहे. त्याच्याही पलीकडे ही इंद्रिये नसते ज्ञान करून देतील. ही पोथी आहे. हे फक्त डोळ्यांनी दिसून येतं. आकार आहे. पण काय आहे ? हे डोळे सांगू शकत नाही. पण ही पोथी आहे किंवा घड्याळ आहे, हे ज्ञान करून देणारी शक्ती मन आहे. हे वेगळेवेगळे आहे. पदार्थ कोणचा आहे, हे ज्ञान करून देणारी शक्ती मन आहे. हे वेगळेवेगळे आहे. पदार्थ कोणचा आहे, हे ज्ञान ज्ञानेंद्रियांनी होणार नाही. फक्त कोणतातरी पदार्थ आहे हे समजेल.

तर मानसिक शक्ती असणारे मन, हे फार मोठे इंद्रिय ईश्वराने निर्माण करून ठेवले आहे. आपल्याकडे मनाबद्दल फार मोठा विचार केला गेला आहे. पाश्चात्य देशामध्ये मनाचे होणारे संशोधन अद्यापि अपूर्ण आहे. मन वगैरे इंद्रियसुद्धा त्यांना मान्य नाही. स्थूल शरीरापुरताच त्यांचा अभ्यास मर्यादित आहे. आपल्या शरीरात चक्रं आहेत. त्या चक्रांच्या देवता आहेत.

शास्त्रकारांनी त्या चक्रांची स्थाने व देवता सांगून ठेवल्या आहेत. आणि ते पाहता येते. जर त्या एखाद्या चक्रावर लक्ष एकाग्र केले, त्याचे चिंतन केले, तर ते चक्र मनात प्रगट होते. त्याचा साक्षात्कार होतो.

पाहाता आले नाही म्हणून एखादा पदार्थ अस्तित्वात नाही असे म्हणणे अगदी स्थूल बुद्धी आहे. मी सुखी आहे किंवा दु:खी आहे हे कसे समजते ? मनाप्रमाणे घडल्यानंतर सुख आहे. मुद्रा आनंदित झालेली आहे. त्याला सुख आहे. पण मी सुखी आहे हे ज्ञान कशाने झाले ? डोळ्यांनी ? सुख काय डोळ्यांनी दिसणारा पदार्थ आहे काय ? सुखदु:ख म्हणून जे आपण म्हणतो, ते डोळ्यांनी दिसणे शक्य नाही. कसं आहे सांगा बघू सुख ? आणलं असतं आम्ही. बाजारात कुठेतरी मिळाले असते म्हणजे फार चांगली सोय झाली असती. पण तो अदृश्य पदार्थ आहे. विश्वामध्ये अशा काही वस्तूही ईश्वराने अदृश्य ठेवलेल्या आहेत. त्यांचे ज्ञान करून घेण्याकरता माणसाने काहीतरी प्रयत्न केला पाहिजे.

सुखदु:ख कसे कळते ? अर्थात 'मी सुखी आहे.' किंवा 'मी दु:खी आहे.' हे समजण्याचे साधन 'मन' आहे. त्याकरता मन हे स्वतंत्र इंद्रिय आहे. त्या मनाची शक्ती फार मोठी आहे. सर्व वासना त्या मनामध्ये निर्माण होतात, सर्व संस्कार त्या मनावर होतात. काही नको असलेले संस्कार काढता येतात. काही चांगल्या संस्कारांची भर घालता येते. हे कार्य चाललेले आहे. मनाकडूनंच चाललेले आहे. म्हणून मनालाच बोध केला समर्थांनी. लोकांच्यापुढे मांडले नाही, उपदेश करायला आले नाहीत.

**मना सज्जना भक्तिपंथेची जावे।**

समजून घेणाऱ्यांने त्यातून समजून घ्यायचंय आणि वागायचंय. ही मानसिक शक्ती आहे. मनामध्येसुद्धा पुष्कळ प्रकार आहेत. अहंकार हे त्याचेच रुप आहे, अभिमान ! त्याचप्रमाणे संदिग्ध अवस्था. हे करावं की ते करावं ? हे खरं की ते खरं ? अशी संशयाची स्थिती असणे, हा एक मनाचाच प्रकार आहे. स्मरण करणं हा मनाचा धर्म आहे. असे वेगळे वेगळे प्रकार त्या त्या कार्याकरता केलेले आहेत.

तर ही सगळी आणखी साधनसृष्टी आहे. अनंत जीवात्मे आहेत. त्यांची संख्या जगामध्ये किती आहे ? हे कोणालाही समजून येणार नाही. लोकसंख्या किती आहे हे सुद्धा निश्चित ठरविता येत नाही. प्रत्यक्ष दिसणारी असूनसुद्धा. मग किती जीवात्मे आहेत ! त्या जीवात्म्यांची किती शरीरे आहेत ! त्या शरीरामध्ये असणारी साधनसृष्टी जी आहे, त्यांना ज्ञान व्हावे, त्यांच्याकडून कर्मं व्हावीत आणि विशेषत: मनाचा उपयोग मानव करून घेऊ शकतो. ते मन, ती बुध्दी त्याच्याकरता दिली आहे.

या सगळ्या साधनसृष्टीला शास्त्रकार सूक्ष्म शरीर म्हणतात वेदांतात. याचे संशोधन कसे करायचे ? हे ही विषय शास्त्रकारांनी सांगून ठेवले आहेत. इंद्रियांचा निग्रह केला पाहिजे म्हणतात. इंद्रियं मिळाली म्हणजे वाट्टेल तशी वापरायची नाहीत. डोळ्यांचा उपयोग कसा करायचा ? श्रवणेंद्रियांचा उपयोग कसा करायचा ? रसनेंद्रियांचा उपयोग कसा करायचा ? किती पाहिजे ? कसे परिमित पाहिजे ? हे सगळे शास्त्रकारांनी व्यवस्थित मांडून ठेवलेले आहे. मानसिक शक्तीचा विकास हा जर व्हावा अशी इच्छा असेल, तर ही सगळी बाहेरची इंद्रियं नियमित बनविली पाहिजेत. ती मनाने नियमित बनवायची आहेत. विचार करू शकणारे मन आहे. योग्य अयोग्य ठरविणारे मन आहे. त्याल अशाप्रकारचे मार्गदर्शन करणारे महात्म्यांचे उत्तम ग्रंथ आहेत. कोणचा विचार कसा योग्य आहे ? त्या विचाराने इंद्रियांचा, मनाचा निग्रह कसा होऊ शकेल ? हे सगळे त्यांनी सांगून ठेवले आहे. कार्यकारण भाव सृष्टीचा, पूर्ण दृष्टीने समजून घेणे हे अशक्य आहे.

मनामध्ये कोणचे गुण आहेत, कोणचे दोष आहेत, हेच अगोदर कळू शकत नाही. रावणच मुख्य आहे. राम नाही, हीच मनाची धारणा झाल्यानंतर काय करायचे ? कोण रामायण वाचणार आणि कोण लिहिणार ? मन बदलून टाकले. हिरण्यकश्यपू तपश्चर्येला गेल्यानंतर सगळे देव ब्रह्मदेवाकडे जाऊन म्हणाले, "अहो ! त्याची तपश्चर्या जराशी बंद करा. तो तुमच्यापेक्षा वरचढ होणार आहे. तुमची सगळी सृष्टी बदलून टाकायची शक्ती त्याला मिळवायची आहे. तुम्ही ज्याला पाप ठरविलयं, त्याला तो पुण्य म्हणून ठरविणार आहे. अशी नवीन सृष्टी बनविणार आहे. पुण्याला पाप ठरविणार आहे. देवांना दैत्य आणि दैत्यांना देव करणार आहे. अशी सगळीच सृष्टी बदलायची आहे त्याला" ही स्थिती कायमची राहू शकत नाही, काही काळ राहते. मर्यादित काल राहते. पण अशी बुद्धी असल्यानंतर त्या गुणदोषांचा विचार कोण करणार ? सगळंच खोटं वाटतं आपल्याला. म्हणून या सगळ्याचा विचार करणारी जी साधनं दिलीत, त्यात मन मुख्य आहे.

इंद्रियांचा निग्रह जितका जितका आपल्याला साधेल, तितका मनाचाही निग्रह होतो आहे. आणि मन जर एकाग्र झाले. तर प्राणवायूही एकाग्र होतो. फार मोठी शक्ती एकाग्र मनाची आहे. कोणचेही ज्ञान त्याला होते. सर्व सिद्धी प्राप्त होतात. सूर्यमंडळामध्ये काय आहे ? काय चाललंय ? हे पाहण्यासाठी मनुष्य अंतराळात पाठविण्याची जरूरी नाहीये. इथे बसून तो कुठे काय चाललंय हे सांगू शकतो. ही मानसिक शक्ती आहे.

मानसिक शक्ती असू शकत नाही. हा कायम विश्वास आपल्या बुद्धीमध्ये निर्माण झाल्याकारणाने प्रयोग करायची कोणाचीच तयार नाही. एखादाच महात्मा तसा असणार. तेही आणखी

काही जास्ती इच्छा करीत नाहीत. अध्यात्ममार्गाने जाणारा एखादाच येणार. आमचा प्रसार करण्याकरता हे शास्त्र नाहीच आहे. आणि योगशास्त्राचा प्रसार होणारही नाही. ती पुस्तकी विद्या नाही. आचरण केले पाहिजे.

सबंध साधनसृष्टी, इंद्रिय, मन, बुद्धी वगैरे सर्व ताब्यामध्ये ठेवणारी एक शक्ती आहे. ते जगदंबेचे स्वरुप आहे. त्यालाच सूत्रात्मा असे म्हणतात.

**विश्व चळतसे जेणे परमात्मेनी।**

हे ज्ञानराजांनी मुद्दाम घातलंय. सर्व क्रियाशक्ती त्या परमात्म्याच्या इच्छेने चालू आहेत आणि त्याच्याही पुढे अंतर्यामी म्हणून आहे. सर्वही स्थूल सृष्टी, सूक्ष्म सृष्टी आणि त्या सर्वांच्या आत राहणारा म्हणा, सर्वांशी संबंध ठेवणारा असा जो परमेश्वर आहे, अंतर्यामी; ईश्वर असे त्याला म्हणतात.

''अहंकाराच्या आहारी जाऊ नकोस अर्जुना ! तू काय करतोयस ? मी मरणार म्हणतोस ? कौरवांच्या सैन्यामध्ये मोठे मोठे योद्धे पुष्कळ आहेत. मी युद्धात भाग घेतला तर सगळे मारले जाणार आहेत हे कशावरून समजतोस ? तुला काय भविष्य कळते काय ? अज्ञानामध्ये सापडू नकोस. सर्वांच्या अंतर्यामी, नियामक परमात्मा आहे.'' कृष्णाष्टकामध्ये भगवान् आचार्य महाराजांनी याचा उल्लेख केला आहे.

**पृथिव्यां तिष्ठन् यो यमयति महीं वेद न धरा।**
**यमित्यादौ वेदो वदति जगतामीशममलम्।।**
**नियन्तारंध्येयं मुनिसुरनृणां मोक्षदमसौ।**
**शरण्यो लोकेशो मम भवतु कृष्णोऽक्षिविषयः।।**

आचार्यांच्या आईला वैकुंठलोकाला जायची इच्छा होतीच .आचार्यांनी भगवान् विष्णुंची स्तुती करायला सुरुवात केली. त्या भगवान विष्णुंचे स्वरुप कोणचे हे आचार्य महाराज सांगताहे, ह्या सर्वही भूतांच्या अंतर्यामी तो आहे. तो आमच्या अंतर्यामी आहे याची आम्हाला जाणीव होत नाही. प्रेरणा होते मध्ये मध्ये, पण ती आमच्या लक्षात येत नाही. अहंकार एकदम आडय येतो. ती जाणीव नष्ट होते. पृथ्वी, आप, तेज, ही पंचमहाभूते फक्त जड भूतं नाहीत. ते जीवात्मे आहेत. त्यांच्या अंतर्यामी जो परमात्मा आहे, तो त्यांचे नियमन करतो आहे. पंचभूतं जर एकमेकांवर आदळली तर जगाचे काय होईल ? पण नाही. तो अंतर्यामी जो परमात्मा आहे, तो असे होऊ देणार नाही. आवरून धरणारी निग्रहशक्ती मोठी

आहे . पण पृथ्वी, आप वगैरै जी भूतं आहेत, त्यांना त्यांच्या अंतर्यामी असलेलल्या परमात्म्याची जाणीव नसते, तर आम्हाला कुठून असणार ? असा तो अंतर्यामी परमात्मा श्रीकृष्ण, मला त्याचे दर्शन द्यावे. अशी इच्छा आचार्यमहाराजांनी व्यक्त केली आणि त्यांना दर्शन झालेले आहे. परमेश्वराचे स्थूल रुप कोणचे आहे ? सूक्ष्म रुपही तोच परमात्मा बनलेला आहे. आणि अंतर्यामीरुपही तोच आहे. आणि हे सर्व घालवून सच्चिदानंदघन ब्रह्मरुपही तोच आहे. अशी निःसंदिग्ध दृष्टी ज्यांची झालेली आहे, त्यांनी प्रार्थना केल्यावर दर्शन व्हायला काय वेळ लागणार आहे? भगवान् श्रीकृष्ण परमात्मा विष्णु आलेले आहेत. आचार्यांनी त्यांना सांगितले. ''आईची इच्छा तुमच्याकडे येण्याची आहे.'' भगवान् श्रीहरि त्यांच्या मातेला वैकुंठलोकाला घेऊन गेले.

अगोदर शंकरांची आचार्यांनी स्तुती केली होती म्हणतात. शंकरांचे दूत आले. त्या दूतांचे साप वगैरे अंगावर खेळत असलेले रुप पाहून ती आई घाबरली. ती म्हणाली, ''यांच्याबरोबर मला पाठवू नकोस.'' मग भगवान् विष्णुंची स्तुती केली. तिथे काय शंकरांना सोडून विष्णुंना बोलावले म्हणून काय शंकरांना राग नाही आला. राग नाहीये. शंकरच विष्णु आहेत. ही अभेददृष्टी भक्ताचीही आहे. त्यामुळे भक्त त्यांना काहीही सांगू शकतो. शास्त्राप्रमाणे सांगितलेल्या मार्गाने जाऊन शंकरांची, विष्णुंची कोणाचीही उपासना करून आपले कल्याण करून घ्या. त्यांच्या मनामध्ये भेद नाहीये. शिवरूपाने कल्याण करणारीही तीच शक्ती आहे. शंकर किंवा जगदंबेच्या रुपानेही कल्याण करणारी शक्ती तीच आहे. एकच ईश्वरशक्ती आहे. ही अव्दैत भावना पूर्ण होण्याकरता व्दैतातून सबंध विचार करून मनामध्ये ते रुप स्थिर करून पुढे जायचे आहे. त्याशिवाय होणार नाही. संदेह मनामध्ये उत्पन्न झाला की तो विचार संपलेला आहे. मंत्राचा जप चालू आहे. पण संशय उत्पन्न झाला की संपलं. गेलं. नामस्मरण संपलं संदिग्ध उपयोग नाही. असंदिग्ध पाहिजे. असंदिग्धपणाने, श्रद्धेने झाले पाहिजे.

तेव्हा ही सगळी भगवतीची रुपं सांगितली आहेत. महालक्ष्मीस्वरुप कसं निर्माण झालं ? मूळ स्वरुप कसं आहे ? याचाही विचार करायचा. उद्याचा दिवस ही सेवा करायची आम्हाला सूचना आहे. परवाही दसरा आहे. तेव्हा उद्याचा दिवस यथामती थोडासा विचार करून असाच विचार निरंतर प्रत्येक जन्मामध्ये व्हावा, आणि विचाराचे पर्यवसान या पराभक्तीमध्ये झालं पाहिजे. तेच जगदंबेजवळ मागायचे आहे. एवढीच प्रार्थना उद्याच्या दिवशी करायची आहे.

कायेन वाचा मनसेंद्रियेवा।
बुद्ध्यात्मनावा प्रकृती स्वभावात्।।
करोमि यद्यत् सकलं परस्मै।
नारायणायति समर्पयामि।।

सर्व मंगल मांगल्ये । शिवे सर्वार्थ साधिके।।
शरण्ये त्र्यंबके गौरी । नारायणी नमोस्तुते।।

## सातवा दिवस

सर्व मंगल मांगल्ये । शिवे सर्वार्थ साधिके।।
शरण्ये त्र्यंबके गौरी । नारायणी नमोस्तुते।।

अश्विन महिन्यातील नवरात्रामध्ये भगवतीची, जगदंबेची उपासना सर्वत्र चालू आहे. केवळ शक्तीची उपासना करणारी मंडळीही आहेत. पाठ चालू असतात. पूजा चालू असती, शतचंडी आहे. सहस्त्रचंडी आहे. वाङ्मय तप हे चालू असते. दक्षिणेकडे, तिकडे उत्तरेकडेही काही ठिकाणी आहे. मार्कंडेय सांगतात. महालक्ष्मी ही मुख्य आहे. त्रिपुरसुंदरी, भुवनेश्वरी अशी तिची नावे आहेत. आणि परब्रह्म आहे ती. विराट् स्वरुप, सौत्रात्म स्वरुप आणि अंतर्यामी स्वरुप हे विश्वामध्ये आलं आणि ह्याचापुढं अधिष्ठान सच्चिदानंद ब्रह्मरुप जे आहे, तेच जगदंबेचे मुख्य रुप आहे. महालक्ष्मी त्याला म्हणतात.

महालक्ष्मीचं स्वरुप कसं निर्माण झालं ? याचाही विचार सप्तशतीमध्ये, देवीमहात्म्यामध्ये केलेला आहे. दुसरा, तिसरा आणि चौथा अध्याय अशा तीन अध्यायामध्ये ते चरित्र आहे. महिषासुर नावाचा एक मोठा असुर देवांच्याबरोबर पुष्कळ वर्षपर्यंत युद्ध करत होता. आणि देवराज्य त्याने प्राप्त करून घेतलं. असुर मंडळी तपश्चर्याही करतात. सकाम तपश्चर्या जरी असली, तरी आपली कामना, इच्छा पूर्ण होण्याकरता शरीराला कितीही कष्ट पडले तरी ते घ्यायची त्यांची तयारी आहे. निग्रह मोठा आहे. अन्न नाही, पाणी नाही. शास्त्रविधीप्रमाणे आचरण करतात. ते त्यांना मान्य आहे की नाही कोणाला ठाऊक ! परंतु विश्वामध्ये असणारी शक्ती जी आहे, सर्वोच्च शक्ती जी सर्वांना वरप्रदान करते, सर्वांची व्यवस्था लावते, तिला आपण ब्रम्हदेव म्हणतो. तर त्या महिषासुराने तपश्चर्या करून ब्रह्मदेवांपासून वर मिळविला.

''कोणाही पुरुषापासून माझा वध होऊ नये.'' असा वर त्याने मागितला. रावणापेक्षा हा

बुद्धिमान निघाला. देवांच्यापासून माझा नाश होऊ नये. दैत्यांकडून नाही, गंधर्वांकडून नाही, पण माणसाकडून नाश होऊ नये हे मात्र मागून घेतले नाही. इथे त्याचा अहंकार आड आला. माणसं काय करणार आहेत माझं! मनुष्य माझ्यापुढे टिकणारच नाही. मनुष्यांचा नाश आम्ही करतो. त्यामुळे भगवंताला मनुष्यरुप धारण करावे लागले. महिषासुराने ती व्यवस्था आधीच केली. देव, दैत्य पुरुष सगळे आधीच बाजूला काढले. आणि आता त्याचा नाश करायचाय. कोणच्याही पुरुषाकडून नाश व्हायचा नाही. शंकर, विष्णु, इंद्रादिक देव झाले. काही नाही. बरं, तपश्चर्याच तशी आहे. कर्माचं फळ हे मिळाले पाहिजे. हा एक सृष्टीचा नियम ईश्वराने लावून दिलेला आहे. कर्म करणाऱ्याची बुद्धी कशीही असली तरी हरकत नाही. झालेले आहे ना कर्म? मग त्या कर्माचे फल त्याला मिळाले पाहिजे.

म्हणून हे असुर तपश्चर्या करून ते फल मिळिवतात. आता प्रयत्न करुन हे फल निर्माण केलेले असते, ते विनाशी आहे. कोणच्याही कर्माचे फल अविनाशी असत नाही. यज्ञयागादिक कर्म करून सुख, आनंद मिळेल, इच्छेप्रमाणे फल मिळेल पण टिकणार नाही. ती कर्म पुन्हा करावी लागतील. पुन्हा कोण करणार! पुन्हा ते कर्म करणाऱ्याची बुद्धी तशी राहिली पाहिजे. शक्ती राहिली पाहिजे. त्यामुळे महिषासुराचा नाश करणे कठीण होऊन बसले होते. महिषासुराने देवांचे राज्य ताब्यामध्ये घेतले आणि सर्वही अधिकार आपल्याकडे घेतले. सूर्य, चंद्र, वरुण वगैरे देवतांकडे जी खाती होती, ती काढून आपल्याकडे घेतली. पण त्याने ते सर्व चालवले हे विशेष आहे. तपशक्ती आहे. देवांनी तप केले काय आणि दैत्यांनी तप केले काय, तपच आहे ते. सत्कर्माचे फल हे त्याला मिळालेले आहे. सर्व देवांची स्थाने दैत्यांनी घेतल्यामुळे ते बाहेर पडले. स्वर्ग रिकामा करून दिला दैत्यांना. शंकर, विष्णु, ब्रह्मदेव इंद्रादिक देव सगळे जमले. स्वर्गात राहणाऱ्या देवांनी ह्यांच्यापुढे आपले दु:ख सांगितले. देव म्हणाले, ''महिषासुराने सर्वाधिकार आपल्याकडे घेतलेले आहेत. सर्व देवतांची जी जी काही कर्तव्य आहेत, ती त्याने आपल्याकडे घेतली आहेत. आम्हाला काही काम नाही आणि स्वर्गात आम्ही राहू शकत नाही.''

ईश्वराने नेमलेले हे सगळे अधिकारी आहेत. पापपुण्याचा निर्णय करणारे यमधर्म आहेत. सूर्य आहे. देव म्हणाले, ''आम्ही तिथून निघून आलो. कुठेतरी फिरतो. कसेतरी राहतो.'' पुण्यकर्म अजून त्यांचे आहे. पण पुण्यकर्म असतानाही मध्येच हे पाप आलेले आहे. कर्म कोणचे सुरू आहे? काय फल आहे? किती दिवस मिळणार आहे? ह्यांचे व्यवस्थित रीतीने आपल्याला ज्ञान होऊ शकत नाही. पुण्यकर्माने स्वर्गलोकाला जाऊन राहिलेले देव, त्यांना तिथून बाहेर पडण्याचा प्रसंग आला. म्हणजे दुसरे कोणचे तरी त्यांचे पाप हे आड आलेले आहे. एका कर्माचे फल भोगणं चालू असताना त्याला प्रतिबंध आलेला आहे

महिषासुराच्या पुण्यकर्माने. त्याची तपश्चर्या ही पुण्यकर्मच आहे. सकाम का असेना! ते प्रतिबंध निर्माण करू शकते.

अशी देवमंडळी सात्त्विक आहेत. राज्य करतात. स्वार्थही आहेच त्याठिकाणी, पण चांगल्या वासना जास्ती आहेत. देवाने असुरांच्याकरता वेगळे राज्य ठेवलेले आहे. सप्त पातालांपैकी रसातल म्हणून एक मोठा लोक आहे. स्वर्गाप्रमाणे सर्व सोयी तिथे आहेत. सुखसमृद्धी आहे. आणि तिथे त्या दैत्यांनी राहावं अशी व्यवस्था केलेली आहे. दैत्यांना रसातलही पाहिजे, आणि स्वर्गही पाहिजे. अशी वासना निर्माण झालेली आहे ना! आणि त्याच्या जोडीला तपश्चर्या आहे पुन्हा. मागायला आले म्हणजे उगीच मागत नाहीत ते. योग्यता संपादन करून ब्रह्मदेवांना मागताहेत. देय भाग आहे. देवांचे पुण्यकर्म आहे, ते थांबलेले आहे असे म्हणायला पाहिजे. त्यांचे सुख बंद झालयं. पडले बाहेर. आणि दैत्यांचे राज्य सुरू झाले आहे. सगळीकडे दैत्य आहेत, मनुष्यलोकामध्ये, स्वर्गलोगामध्ये, सूर्य, चंद्र, वरूण वगैरे सगळ्या देवता महिषासुराच्या अधिपत्याखाली आल्या आहेत. म्हणजे ही शक्तीही त्यांनी मिळविली आहे. वायूचे काम सर्वत्र संचार करणे, इंद्राचे काम पर्जन्यवृष्टी करणे. ह्या सगळ्यावर महिषासुराचे नियंत्रण आलेले त्यांना कसे चालणार! आपले कार्य आपल्या हातून गेले. या भावनेने त्यांना दु:ख झालेले आहे. आणि दु:खी होऊन त्यांनी आपले गाऱ्हाणे सर्वांच्या समोर मांडले. त्या वेळेला चमत्कार झालेला आहे. क्लेश झाल्यामुळे संतप्त झालेल्या सर्व देवांच्या शरीरातून तेज बाहेर पडले. कोणाला काही कळेना. पण थोड्याच वेळात त्या सर्व तेजाचे एकत्रीकरण झाले. आणि तेजस्वी देवी निर्माण झाली. कोणाकोणाच्या तेजापासून या देवीचे कोणकोणचे अवयव झाले हे देखील मार्कंडेयांनी सांगितले. महिषासुरमर्दिनी किंवा महालक्ष्मीची उत्पत्ती ही अशी झालेली आहे.

या महालक्ष्मीने महिषासुराचा आणि त्याच्या सैन्याचा नाश केला. त्याचे सेनापतीही मोठे पराक्रमी होते. दैत्यांचे सैन्यही पुष्कळ होते. त्यामुळे देवांचे सैन्य आणि दैत्यांचे सैन्य यांच्यात फार अंतर पडले. दैत्यांना तपोबलाने ब्रह्मदेवाचा वर मिळाला.त्यांची शक्ती वाढली. त्या सर्वांचा नाश करून विश्वाचं संरक्षण करायचंय. हा मोठा प्रसंग आहे. प्रत्येक देवाने आपल्या आयुधांची पूजा करून ती देवीला अर्पण केली. अलंकार अर्पण केले. या देवीकडून आपले कार्य होणार आहे. केवळ तेजोरूप अशाप्रकारची महालक्ष्मी आहे. आणि मग त्या देवीचे रूप पाहून तो महिषासुर, त्याचे सगळे सैनिक, सेनापती वगैरे युद्धाला आलेले आहेत. मोठं युद्ध झालं.

ईश्वरशक्तीच विश्वसंरक्षणाकरता संकल्प करून आलेली आहे. तिथे काही मानवी संकल्प

नाही. जीवांच्या संकल्पामध्ये आणखी मतभेद आहेत. स्पर्धा आहे. दुसऱ्याने अमुक अमुक मिळविले, म्हणून ह्यानेही पुष्कळ तपश्यर्या केली. आणि तेही घेतलं. त्यामुळे देवांना संरक्षणाची जरूरी उत्पन्न झाली. त्यांनी त्यांच्या स्थानावर राहावे. आम्ही आमच्या स्थानावर राहावे. जी ईश्वरशक्ती निर्माण करून दिलेली आहेत त्या सगळ्यांचीच स्थानं आहेत. विशाल विश्व आहेत. आकाशामध्ये अनंत स्थानं निर्माण करून ठेवलेली आहेत. जागा संपलीकी दाटी झाली असं नाहीये. किती विशाल आहे ब्रम्हांड! त्याच्यामध्ये सर्वांना स्थाने ईश्वराने दिलेली असताना, स्वत:च्या बुद्धीमध्ये काही विकार निर्माण झाला, अशुभ वासना निर्माण झाली, आणि आपलंही सुख आहे त्याप्रमाणे दुसऱ्याचेही सुख आपण घ्यावे ही तामसी वृत्ती उत्पन्न होऊन हा सगळा प्रकार झालेला आहे. म्हणून देवांना सहाय्य करण्याची वेळ आली आहे. देवही मोठे सात्त्विक होते. भगवतीची भक्ती करणारे होते.

विष्णुंनी सुदर्शन चक्र दिले. शंकरांनी त्रिशूल दिला. इंद्राने वज्र दिलेले आहे. वायूचे बाण दिलेले आहेत. त्याने दिलेल्या भात्यातून बाण कधीही संपत नव्हते. अक्षय भाता होता. युद्धाच्या वेळेला शस्त्रपुरवठा करणे किती कठीण आहे! शस्त्रास्त्रांचा पुरवठा करणारे स्वतंत्र खाते असते. शस्त्र संपल्यावर सैनिक जिवंत कसे राहतील? पण इथे तसे नाही. बाणाचे भाते नेहमी भरलेले आहेत.

अर्जुनाला असा अक्षय भाता अग्निदेवतेकडून मिळाला होता. एकदा दोन्ही बाजूंना बाणांचे भाते बांधून तो युद्धाला गेल्यावर ते बाण संपायचेच नाहीत. किती बाण तो मारायचा! दोन्ही हातांनी तो बाण मारत होता. म्हणून त्याला सव्यासाची म्हणतात. किती वेगाने अर्जुन बाण मारतोय हे कळायचे नाही. कौशल्य आहे ते. अभ्यास आहे तो. ईश्वरकृपा आहे. सद्‌गुरुंची - द्रोणाचार्यांची कृपा आहे. त्याला एक तसे अक्षय भाते मिळाले होते.

तर महालक्ष्मीची सगळी युद्धाची व्यवस्था झालेली आहे. आणि महिषासुर, त्याचे सेनापती युद्धाला येऊन पुढे उभे राहिले. एकेक सेनापतीचा नाश केला. शेवटी महिषासुराचाही नाश झालेला आहे. महिषाचे रुप धारण करीत होता म्हणे तो. असुर होता. सिंह बनायचा, मनुष्य बनायचा, कोणेचेही रुप धारण करायचा. त्याचा शेवटी नाश झाला. त्याचे सगळे दैत्य मारले गेले आणि रसातलामध्ये जाण्याची त्यांना आज्ञा केली. इथे थांबायचे नाही. भूलोकातसुध्दा राहायचे नाही. रसातल म्हणून पाचवा, सहावा लोक आहे. तुमच्याकरता स्वतंत्र लोक आहे. तिथे तुम्ही जाऊन राहा. ताकीद करणारा आणि त्याप्रमाणे भीती दाखविणारा कोणीतरी पाहिजे. त्याशिवाय हे असे कार्य होणार नाही. अशारीतीने सगळे दैत्य रसातलाला निघून गेले आणि नंतर मग सर्व देवांनी महिषासुरमर्दिनीची स्तुती केली आहे. हिमालयाने

सिंह हे वाहन दिले होते म्हणतात, जगदंबेला सिंह म्हणेज कोण आहे ? देवीची पूजा करीत असताना महिषासुराचीही पूजा करावी असा शास्त्राचा विधी आहे. देवीच्या डाव्या बाजूला महिषासुराची पूजा करावी का ? तर तो भगवतीच्या स्वरुपामध्ये तो लीन झालेला आहे. शेवट त्याचा फार चांगला झालेला आहे. तो जगदंबास्वरूप होऊन गेला. त्याची पूजा म्हणजे जगदंबेचीच पूजा आहे. आणि सिंह म्हणून जे वाहन आहे. त्याचीही पूजा आहे. तो सिंह म्हणजे साक्षात धर्मरूप आहे. विश्वाला आधारभूत जो धर्म आहे. तो नृसिंहरुपाने देवीचे वाहन बनलेला आहे. सिंहानेही पुष्कळ सेनापती मारले. त्या सिंहाचीही पूजा आहे. भक्ताचीही पूजा आहे. देवीचीही पूजा आहे. हे सर्व विधी लक्षात घेऊन अर्चनभक्ती जर झाली, तर त्याचे फल निश्चित मिळते. फल आणि साधन ही आणखी वेदप्रमाणाने दाखविलेली आहेत. ऋषीमंडळींनी ती प्रगट केलेली आहेत. त्याचे प्रयोग सगळे त्यानी लिहून ठेवलेले आहेत. विधी कसे करावेत ? काय करावेत ? आपत्तीच्या वेळेला काय करावे ? चांगली परिस्थिती असताना काय करावे ? सगळे त्यांनी व्यवस्थित लिहून ठेवले आहे.

तर देवांनी स्तुती केलेली आहे. त्यात हे वर्णन करताहेत देव. जगन्मातेचे, महालक्ष्मीचे स्वरुप कसे निर्माण झाले, हे त्यांनी मांडले. सर्व देवांच्या शरीरातून तेज बाहेर पडलेले आहे. अन्यायाचा तिरस्कार एवढा उत्पन्न झाला, की त्याच्याबरोबर देवीचे ते तेज बाहेर पडले. संरक्षण त्यावेळेला होते. नाहीतर संरक्षण होणार नाही. चालायचंच, सहन केलं पाहिजे असे म्हणून उपयोग नाही.

राज्य स्थापनेच्या वेळेला शिवाजीमहाराजांना अन्यायाची अशीच तीव्र चीड निर्माण झाली. निष्कारण वैरी. काय कारण आहे ? कुठेही जावे, लुटालुट करावी, वाट्टेल ते अत्याचार करावेत. आपल्याला ही शक्ती मिळायची नाही का ? असा ज्यावेळेला त्यांच्या मनात तिरस्कार उत्पन्न झाला, त्यावेळेला 'काही तरी कार्य करीन नाहीतर हा देह तरी पडेल,' असा त्यांचा निश्चय झाला. देहाचीसुद्धा पर्वा नाही.

इतका अन्यायाचा तिरस्कार निर्माण झाल्यावर देवांच्या शरीरातून तेजोरुपाने ती जगन्माताच बाहेर आलेली आहे. भगवती महालक्ष्मी समष्टिरूपही आहे आणि व्यष्टिरूपही आहे. दोन्ही रूपं आहेत. देवांच्या शरीरातून तेज बाहेर पडले म्हणजे देवी हा देवांचा समूहच बनला. मग ही देवांची शक्ती आहे असं मनायचे का ? देवांची शक्ती स्वतंत्रही आहे म्हणतात. सर्वव्यापी ती आहे. देवीची स्वतंत्र निराळी शक्ती आहेच आहे. पण तिचे आवाहन करता आले पाहिजे. त्या शक्तीचे आवाहन देवांनी आपल्या शक्तीच्या द्वाराने केले. त्यामुळे सर्व देवांच्या शरीरातून शक्ती निर्माण झाली. असेही घडून आलेले आहे. देवीची आत्मशक्ती कायम आहे. त्यात कमीजास्ती काही नाही.

कर्माचरण करणारे जे जीवात्मे आहेत, त्यांची शक्ती कमी होती, जास्ती होती, कमी झाली तर पुन्हा प्रयत्न करावा लागतो. किती जन्म गेले तरी कर्म संपत नाही. सुख पाहिजे, कर्माने सुख मिळते आहे. अशा भावनेने सारखी कर्म करीत राहावे लागते त्यांना. यज्ञयागादि करून स्वर्ग मिळेल, पण कायमचा नाही. प्रत्येकाला आणखी कालमर्यादा ठरलेली आहे. सर्वांची स्थानं कालमर्यादित आहेत. ब्रह्मदेवांचे आयुष्यसुद्धा ठरलेले आहे. परार्ध त्याला म्हणतात. परार्ध हा संख्येचा भाग नाही. त्यापैकी त्यांचे अर्धे आयुष्य संपले आहे म्हणतात. आपल्या संकल्पामध्ये ....ब्रम्हण द्वितीय परार्धे... असे म्हणतो आपण. ब्रम्हदेवांचा दुसरा परार्ध आता सुरू झाला आहे. त्यातले हे अठ्ठाविसावे कलियुग आहे. त्यातले हे संवत्सर वर्ष आहे. त्या वर्षातला हा महिना आहे. या महिन्याची अमुक तिथी आज आहे. हे सर्व कालरुपी परमेश्वराचे स्वरुप मनामध्ये आणून वाणीने उच्चार करून मग संकल्प करायचा.... अर्चनम् करिष्ये। विधीचे मी अर्चन करतो.

तर ब्रह्मदेव इतके मोठे आहेत; सत्यलोकामध्ये राहणारे, पण त्यांचेही आयुष्य मर्यादित आहे. ब्रह्मदेवांचे आयुष्यही संपणार आहे. ब्रह्मलोकाला गेलेल्या जीवांना पुन्हा इकडे येण्याचे कारण पडत नाही. क्षत्रियांना राजसूय यज्ञ हा त्याकरता सांगितला आहे. 'पारमेष्ठ्य कामः।' परमेष्ठी म्हणजे ब्रह्मदेवांचा लोक मिळावा. तिथे जाऊन राहायला मिळावे. अशी धर्मराजाला इच्छा उत्पन्न जाली. आणि त्यांनी ती इच्छा भगवान् गोपालकृष्णांच्याजवळ प्रथम व्यक्त केली. ''ही एवढी माझी इच्छा आपल्या कृपेने पूर्ण व्हावी.'' अशी प्रार्थना केली. ''सर्व लोकांच्या दृष्टीला हे पडू दे की आपली सेवा करणारा जो भक्त आहे. त्याला काय फल मिळतं.'' मी राजसूय यज्ञ केला म्हणून माझी कीर्ती व्हावी ही इच्छा नाही. आपल्या सेवेचे फल काय मिळते ही सर्व लोकांनी पाहावे आणि त्याप्रमाणे सेवा करावी. अहंकार सोडून देऊन प्रार्थना केलीयं. 'तुम्ही माझे मामेभाऊ आहात' हा संबंध नाहीये. हे बाहेरचे संबंध आहेत. गोपालकृष्ण म्हणजे साक्षात परमेश्वर आहे. ईश्वरशक्ती आहे. सर्व देवस्वरुप आहे, ही जाणीव आहे म्हणून अगोदर त्यांच्यापुढे आपली इच्छा मांडली. सकाम आहे. ब्रह्मलोकाला जाऊन राहायची इच्छा आहे. तिथे पापपुण्याचा काही संबंध नाही. शुद्ध आत्मचिंतन होतंय. ब्रह्मदेवांचेही मार्गदर्शन लाभत असेल. आणि शेवटी ब्रह्मदेव असेपर्यंत तिथे राहायला मिळते आणि प्रलयाच्या वेळेला ब्रह्मदेवांचे आयुष्य संपून तेही मुक्त होतात, त्यांच्याबरोबर त्यावेळी ब्रह्मलोकात राहिलेले सर्वही जीवात्मे मुक्त होतात.

तर कोणचेही कर्म जे आहे, त्याचे फल संपणारे आहे. ब्रह्मलोक मिळाला तरी कायमचा नाही. शेवटी ब्रह्मदेवांचाही विलय आहे. त्या लोकात राहाणाऱ्यांचाही विलय आहे.

तेव्हा ऋषीमहाराज सांगतात, ''सर्वही देवांची शक्ती एकत्र होऊन हे महालक्ष्मीचे स्वरुप तयार झाले.'' पण त्या ठिकाणी आत्मशक्तीही आहेच आहे. जगदंबेची स्वतंत्र शक्ती म्हणून आहेच की. देवांच्या तेजोरुपी शक्तीने निर्माण झालेली जगदंबा म्हणजे देवांनीच सगळं कार्य केलं असे होणार. तो शक्तीसमुह देवीच आहे. पण आपण गृहीत धरलं आहे की तिच्या ठिकाणी देवांची शक्ती एकत्र झाली.

समजा, म्हणाले, लोकशाहीही आहे आणि एकशाहीही आहे. दोन्ही आहे. ईश्वराच्या सृष्टीमध्ये. उगीच म्हणायचे लोकशाही- लोकशाही, असायची एकशाहीच. एक कोणी आदरणीय पुढारी ठरला असेल, त्याच्या इच्छेप्रमाणेच सगळे ठराव होतात. हे पाहतो आपण. अमक्याने अमुक ठराव मांडला, सर्वांनी त्याला मान्यता दिली; असेच ऐकतो आपण. पण सर्व समष्टी म्हणून मान्य केल्यामुळे समष्टीचा तो निर्णय आहे असे फक्त समजले जाते. तो समष्टीचा निर्णय नसतो. एक व्यक्तीचा असतो.

या ठिकाणी संपूर्ण देवांचे स्वरुप एकत्र झालेले आहे. या बाह्य दृष्टीने विचार केला तर देवांची शक्ती एकत्र झाली. आणि त्यात आत्मशक्तीही आहेच आहे. सर्व विश्वामध्ये आत्मशक्तीने व्यापून राहाणारी जगदंबा आहे. तेव्हा आमची शक्ती आहे असे समजण्याचे काही कारण नाहीये.

आपल्याकडे मोठमोठे पराक्रमी वीर आहेत. सैन्य पुष्कळ आहे आपले. पांडवांचे सैन्य कमी आहे. असा अहंकार दुर्योधनाला होणं स्वाभाविक आहे. आणि पांडव १२/१३ वर्ष लोकांच्या पुढे होते कुठे? वनवासात होते. तेरा वर्षपर्यंत राज्य सगळं ताब्यामध्ये आहे दुर्योधनाच्या. सैन्य आहे, धन आहे. संपत्ती पुष्कळ आहे, सत्ता आहे. त्यामुळे दुर्योधनला पुष्कळ सैन्याची जमवाजमव करता आली. पैशाने म्हणा, मैत्रीने म्हणा. परंतु ती शक्तीसुद्धा ईश्वराची आहे. ही जाणीव त्याला नाही. आपलं सैन्य आहे. आपण त्याला वेतन देतो. आपल्याकरता ते प्राणत्यागसुद्धा करणार आहे. इतके सैन्य आपल्याला अनुकूल आहे. अशी त्याची समजूत आहे. बहुसंख्येने कार्य होतं हा एक मनामध्ये विचार आहे.

आत्मशक्ती ही स्वंतत्र आहे. देवांच्या शक्तीने हे महालक्ष्मीचे रुप निर्माण झालं नसतं म्हणजे देवीचा अवतार झाला नसता असे नाही. अन्यायाचा मनामध्ये इतका तिरस्कार निर्माण झाला की सर्वव्यापी असणारी ती शक्ती समूहरुपाने एकदम तयार झाली. म्हणजे महालक्ष्मीची पूजा म्हणजे सर्व देवांची पूजा आहे. हे महत्त्वाचे आहे. सर्व देवांची शक्ती त्या ठिकाणी आहे. परंतु आत्मशक्तीही त्या ठिकाणी आहे त्याशिवाय कसं होणार? तेव्हा जगदंबेचा अवतार हा त्या आत्मशक्तीने झालेला आहे. ईश्वराचा संकल्प आणि सर्वही

जीवात्म्यांचा संकल्प एकरुप झाला आहे. दैत्यांचाही पुण्याचा काल संपलेला आहे. पण त्यांना शासन होण्याची वेळ आलेली आहे. वेळ याचा अर्थ कालरुपाने सर्वव्यापी असणारी जगदंबा देवांना आता अनुकूल झाली आहे. तेव्हा बाह्यदृष्टीने देवांचा शक्तीसमुह म्हणजे जगदंबा असं जरी मानलं, तरी आत्मशक्ती तिथे कायम आहे. हे ही मानलं पाहिजे. हे आधीच सांगितलं त्यांनी. आणि देवशक्तीसमूह आहे म्हणून नंतर वर्णन करताहेत.

तेव्हा देवीची पूजा करीत असाताना सर्व देवतांची पूजा होते. ही भावनाही योग्यच आहे. सर्व देवतांचे तेज एकत्र आहे. तसं साक्षात् भगवती म्हणून जी आहे, विश्व निर्माण जिने केलं, तिने देव निर्माण केलेले आहेत. आणि देवांचे तेज बाहेर पडून आत्ता तयार झाले आहे. पण विश्वाच्या पूर्वी कोण आहे ? ती आत्मशक्ती कायम आहेच की. त्यामुळे केवळ बाह्य जी काही शक्ती आहे; जीवांची दिसणारी शक्ती; याच शक्तीवर विश्वास ठेवणं, यापेक्षा आत्मशक्ती जी आहे त्रैलोक्यातील, ईश्वरशक्ती जी आहे, तिच्यावर विश्वास पाहीजे. केवळ बाहेरून अनुकूलता आहे की नाही हा विचार मनामध्ये आल्यानंतर कार्य होईल असं नाही.

मारुतीराय लंकेला गेले. त्यांच्याशिवाय दुसरे कोणीही जाऊ शकणार नाही असा त्या सर्व वानरांनी निर्णय घेतला. सीता कुठे आहे, हे त्या जटायूच्या बंधूने पाहून सांगितले आहे. ''समोर सीता दिसते आहे मला. लंका नगरीमध्ये अशोकवन आहे. त्या झाडाखाली बसली आहे आणि तिच्या सभोवती सर्व राक्षसींचा पहारा आहे. हे मला डोळ्यानी दिसतंय.'' इथं बहुमत वापरायला पाहिजे होतं काय ? आणि निर्णय झाला असता का ? आम्हाला कोणालाच सीतादेवी दिसत नाही आणि तुला एकट्यालाच दिसते ? खरं कशावरून ? चिकित्सेचा उपयोग नाही. ज्याला ईश्वराने शक्ती दिलेली आहे, त्या ईश्वरशक्तीने तो पाहून सांगतोय. दूरचे पाहण्याची शक्ती त्या गृध पक्षांना दिली आहे. लांबचे ते पाहू शकतात. आकाशात उंच उडणारी घार जमिनीवर भक्ष्य दिसताच एकदम खाली येऊन ते घेऊन जाते. ही दूरदर्शनाची शक्ती आम्हाला नाही हे मान्य केलेच पाहिजे. आम्हाला कोणाला दिसत नाही म्हणून आम्ही मानणार नाही तर मरा म्हणणार. मला जे दिसतंय ते मी तुम्हाला सांगितले. ज्याला जायचे असेल त्याने जावे, सीतेशी बोलावे. तिला धीर द्यावा आणि यावे. नाहीतर तुम्ही प्रायोप्रवेशन करून बसलेलेच आहात. पण त्याच्या ईश्वरदत्त शक्तीवर विश्वास ठेवला म्हणून सीतेचा शोध लागला. एक मतही महत्त्वाचे आहे. केवळ बहुमत करून चालत नाही. मत देणाऱ्याची बुध्दिमत्ता कशी आहे ? त्यावर त्याचे मत ग्राह्य आहे.

तर याप्रमाणे त्या सर्व वानरांमध्ये फक्त मारुतीराय एकटे समर्थ ठरलेले आहेत. जातील आणि येतील. अंगद किंवा जांबवंतांनी सांगितले आम्ही फक्त जाऊ. पण यायची शक्ती

आमच्याजवळ नाही. केवळ व्यष्टी शक्तीमध्ये तो अहंकार धारण करून बसलेली सगळी मंडळी आहेत. माझी एवढीच शक्ती आहे. मारुतीरायांना शाप झाला होता. तुमची शक्ती तुम्हाला कळायचीच नाही. त्यामुळे त्यांना अहंकार नव्हता. रामांचे चिंतन करीत ते बसलेले आहेत. सर्व वानरमंडळी त्यांच्याजवळ आलेली आहेत. त्यांनी मारुतीरायांना सांगितले, ''अमुक, अमुक ठिकाणी सीता आहे. तुम्ही तिचा शोध घेऊन या. हे कार्य करायला तुम्हीच एकटे समर्थ आहात.'' मारुतीरायांना त्यांच्या शक्तीचे स्मरण करुन द्यावे लागत होते. हे वानरांचे सांगणे ऐकल्यावर त्यांना त्यांच्या शक्तीचे स्मरण झाले आणि ते लंकेत गेले. सगळं सामर्थ्य आहे.

**जितेंद्रियं बुद्धिमताम वरिष्ठम्।**

त्यांच्या एकेक शक्ती एकेक शब्दाने दाखविल्या आहेत. उत्तम बुद्धी आहे. प्रसंग आला तर त्यातून कसे बाहेर पडायचे? हे लगेच बुध्दीला समजले पाहिजे. दुसऱ्याने मत दिले. निर्णय दिला त्याप्रमाणे केले ही नकोय. आपली बुद्धी ही स्वतंत्र कार्य करणारी आहे. हा विश्वास आमच्या स्वत:च्या बुद्धीवर तरी आमचा राहिला आहे का आता? सर्व लोकांनीच आम्हाला लोकांनीच सांगायचे, ''बरोबर आहे. चांगले आहे. करा.'' लोकाशाहीमध्ये हा एक दोष आहे. असे म्हणायला काय हरकत आहे? कोणाचाही आपल्या बुद्धीवर विश्वास नाही. सर्वांनी मिळून ठरविलं म्हणजे होते. एकाच्या बुद्धीने दिलेले मत सर्वांना मान्य होते ना! मग एकाची बुद्धी मानायला काय हरकत आहे?

लंकेत रावणाच्या राजाधानीमध्ये जायचंय. बाहेर कुठे अरण्यामध्ये रावणाची गाठ पडली असती तर गोष्ट निराळी होती. तिथे त्याच्याबरोबर युद्ध वगैरे केले असते. पण इथे त्याच्या राजधानीमध्ये जायचंय. आणि सीतेचा शोध करून तिची भेट घ्यायची आहे. आश्वासन घ्यायचं आहे. ''आम्ही सुटका करणार आहोत. लवकरच येऊ'' हे कार्य किती कठीण आहे. शत्रूच्या राजधानीमध्ये जाऊन हे करायचय. हेर कसा पाहिजे? राजदूत कसा नेमला पाहिजे? मनुराजाने मनुस्मृतीमध्ये हे सगळे सांगितले आहे. त्याचे व्यक्तिमत्व असे पाहिजे की लोकांच्यावर छाप पडली पाहिजे. हा कोणीतरी बुद्धिमान मनुष्य आहे असे त्यांना वाटले पाहिजे. आणि मग बुद्धी तर आहेच आहे. त्या त्या वेळेला निर्णय करण्याची बुद्धी आणि ते आपल्या स्वामीचे, देशाचे कार्य करायचे अशी बुद्धी असणारा मनुष्य राजदूत म्हणून नेमावा. असे मनूने सांगितले आहे. मनूसारख्या क्षत्रिय राजाने लिहून ठेवलेले धर्मशास्त्र सगळ्या ऋषींना मान्य झाले. इतका तो ज्ञानी होता. जिज्ञासु बुद्धीने विचार करून त्याने सर्व मांडले आहे.

एकटे मारुतीराय  लंकेत गेले आहेत. काही भीती नाही. आपल्या वैयक्तिक शक्तीबद्दल काहीही विचार नाहीये. वैयक्तिक शक्ती कोणाची सर्वोत्तम आहे? रावण मोठा होता हे सगळं खरं पण त्या अंगदाने शिष्टाईने विचारले, ''कोणचा रावण मोठा? कार्तवीर्यार्जुनाने एका रावणाला बांधून ठेवले आपल्या मुलाच्या पाळण्यावर;  - बरा आहे आपल्या मुलाला हे दहा तोंडाचे खेळणे.'' तोच रावण होता, पण अंगदाने मुद्दाम असे म्हटले.

तर वैयक्तिक शक्ती कितीही तपश्चर्या करून मिळविलेली असली तरी ती प्रसंगाला कार्य करू शकत नाही. मारुतीराय ईश्वरशक्तीशी एकरुप झाले आहे. ईश्वरशक्तीचा पाठिंबा त्यांना आहे. आपली शक्ती ते विसरून गेलेले आहेत. त्यामुळे निर्भय आहेत. शत्रूच्या राजधानीमध्ये जाऊन तपास करायचाय. तपास केला त्यांनी. सगळीकडे फिरले. अशोकवनात गेले. सीतादेवींची अत्यंत दयनीय स्थिती पाहिली. ती अत्यंत निराश झाली होती. त्यावेळी मारुतीरायांनी तिची भेट घेतली. येण्याचे कारण सांगितले. तरीसुद्धा सीतेच्या मनामध्ये हा रावणच हे रुप घेऊन आलेला आहे असे वाटले. पण रामांना याची अगोदरच कल्पना होती. त्यांनी मारुतीरायांना  सांगितलं होते. ''तुझ्यावर विश्वास ठेवणार नाही ती. ही माझी अंगठी घेऊन जा तू. ही अंगठी तिला दाखविली की तिचा विश्वास बसेल. तू रामदूत आहेस.'' तर अशारीतीने सर्वही शोध केला. सीतादेवीला धीर दिला. साक्षात देवीरुप आहे ना ती! पण मानवाने कसं वागलं पाहिजे? मानवावर कसे प्रसंग येतात? त्या त्या प्रसंगाला कशी सहनशक्ती धारण केली पाहिजे, आपल्या धर्माच्या ठिकाणी किती स्थिर राहिले पाहिजे, हे सर्व लोकांना दाखविण्याकरता हा सीतादेवींचा अवतार आहे. देवी अवतार घेऊन हे सर्व दाखीवती आहे. माझ्यावरही प्रसंग आलेला आहे, येतो आहे. तुमची काय अवस्था?

राजदूत हा सांगकाम्या असू नये असे मनूने लिहून ठेवले आहे. आम्हाला एवढेच काम सांगितले आहे. दुसरे काम कुठाय? मारुतीरायांचे मुख्य काम सीतादेवींचा शोध करून येणे हे खरे आहे म्हणाले. पण या शत्रूची शक्ती किती आहे? हे पाहिले पाहिजे ना! हे काही रामांनी सांगितले नव्हते. पण शत्रूची शक्ती पाहायला स्वत:जवळ तेवढी शक्ती पाहिजे. रावणाच्या शक्तीचा अंदाज घ्यायचाय. ते काही सोपे काम नाही. म्हणून अशोकवनाचा विध्वंस केला. रावणाने पाठीवलेल्या सैन्याचा विध्वंस केला. आणि त्याच्या दरबारात जाऊन ताकीद केली. भूमिगत राहाणे हे शौर्य नाहीये. निर्भयता ही खरी निर्भयता नाहीये. ''मी रामदूत आहे. आलेलो आहे. सीतेचा शोध मला लागलेला आहे. आणि तुझाही नाश करण्याकरता राम लवकरच येणार आहेत.'' हे सांगून सबंध लंका दहन करून निघून गेले. पळून गेले नाहीत. त्यांच्याजवळ जाण्याची छाती इंद्रजिताची सुद्धा झाली नाही. नाथ महाराजांनी भावार्थ रामायणात सगळे वर्णन करून ठेवले आहे.

तर ही देवीची विश्वकार्य करणारी आत्मशक्ती कायम आहे. काही काळ जरी दुर्जनांना अनुकूल झालेला दिसला. तरी तो संपून जातो. धर्माची, सत्याची प्रतिष्ठा, हे जगदंबेचे मुख्य कार्य आहे. केवळ पुरुषवर्गाकडून माझा नाश होऊ नये असा वर मागून घेतल्यामुळे ईश्वरशक्तीने हे स्त्रीरुप धारण केले. स्त्रिया काय मला मारणे शक्य आहे काय ? अहंकार झालाच त्याला. पुरुष मात्र कोणीतरी असतील, त्यांच्यापासून आपला वध होऊ नये एवढी व्यवस्था त्याने केली. स्त्रियांचीही शक्ती मोठी आहे. जगदंबेची खरी उपासना करणारा जो आहे, त्याला हीच आज्ञा आहे. सर्वही स्त्रिया या जगदंबेचे स्वरुप आहेत; ही त्याची भावना पाहिजे, तर जगदंबेच्या उपासकाने लहान मुलगी जरी भेटली, तरी तिला नमस्कार केला पाहिजे. असे जो करील, तो देवीच्या उपासनेचा खरा अधिकारी आहे.

इथे पूर्वी शंकराचार्य महाराज होते. नारायणपेठेत त्यांचा मठ आहे. आम्ही होतो तिथे. ते देवीचे उपासक होते. लहान मुलीलासुद्धा ते नमस्कार करायचे. देवीचे स्वरुप समजायचे. देवीची अनेक स्वरुपे सांगितली आहेत. म्हणजे आमच्या या उपासनामार्गामध्ये शास्त्रमार्गामध्ये ज्याला आपली खरी उन्नती करून घ्यायची आहे, त्याने देवीबद्दल इतका आदरभाव म्हणजे सर्व स्त्रियांच्याबद्दल इतका आदरभाव ठेवला पाहिजे. हे धर्मशास्त्रकार सांगताहेत. हे कोणी वाचलंय का ? आमच्या धर्मामध्ये स्त्रियांना स्वातंत्र्य नाही. स्त्रीदाक्षिण्य नाही, असे सांगणाऱ्या लोकांनी हे सर्व पाहिलंय काय ? अनुभव घेतलाय काय ? अहंकार कमी झाला म्हणजे बुध्दीची शक्ती आणखी वाढते. हे समजून आले पाहीजे. हे शिक्षण ज्या आपल्या धर्मामध्ये आहे, त्या धर्मामध्ये स्त्री  दाक्षिण्य नाही हे म्हणणे साहस आहे. आक्षेप घेणाऱ्याला काहीही ज्ञान नाही असे म्हणावे लागेल. काहीही खरं समजले नसताना स्त्रियांच्यात आणि पुरुषांच्यात असा बुद्धिभेद निर्माण करून उपयोग काय ? असे करून काय होणार ? सगळे भेद कमी झाले पाहिजेत. शास्त्राचा हा ही उद्देश आहे. भेद दाखविणारे शास्त्र नाहीये. पण भेदातून मार्ग कसा काढला पाहिजे ? इथे तुमची बुद्धी चालवू नका म्हणतात. शास्त्रसंस्कार बुद्धीवर करा. आणि तसी बुद्धी चालवून तुम्ही जाऊ शकता. शास्त्रमर्यादा संरक्षण करून पुढे जायचंय.

जगदंबेच्या स्वरुपसंबंधी काही कथा सांगता आलेली नाही. आज शेवटच्या दिवशी ती सांगायची आहे. भगवत् भक्ती किती शुद्ध पाहिजे ? जे समजून घेण्याकरता शबरीचा थोडासा विचार काल आपण केला. तिची बुद्धी अत्यंत शुध्द आहे. त्यात व्यवहारदृष्टीने बरं वाईट कोणीही काही निर्णय करू शकत नाही. शबरीच्या भक्तीचा निर्णय कोणीही देऊ शकत नाहीये. संसारासक्त माणसाला तो अधिकारच नाहीये. शबरीने चांगले केले की वाईट ? देवाला मान्य झालेले आहे. ते आम्ही कोण सांगणार

आचार्य महाराज दोन तीन वर्षाचे होते. ते शंकरांचाच अवतार आहेत. त्यांचे पिताजी रोज देवीची पूजा करीत होते. जवळच मंदिर होते; नदीतीरावर. ह्यांनीही जावं त्यांच्याबरोबर. ते मोठे विद्वान आणि देवीचे मोठे भक्त होते. रोज पूजा करावी देवीची. आचार्यांनीही पाहावी. आणि परत यावे. एकदा आचार्यांच्या पिताजींना काही कामानिमित्ताने दुसऱ्या गावाला जायचा प्रसंग आला. आणि त्यांनी सांगितले. ''बाळ! शंकरा! तू उद्या देवीच्या मंदिरात जा आणि पूजा करून ये.'' आचार्यांना आनंद झाला. रोज पाहातही होते. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी आईने दिलेल्या पूजासामग्रीचे ताट घेऊन ते मंदिरात गेले. इतक्या लहान वयात मंत्र-तंत्र काही माहीत नाही. शुद्ध बुद्धी आहे. परंतु महिषासुरमर्दिनी महालक्ष्मी जगदंबा साक्षात् इथे बसलेली आहे, ही भावना ठेऊन पूजा चाललेली आहे. शास्त्रशुद्ध पूजा होऊ नये असा त्याचा अर्थ नाही. त्याचाही अभ्यास केला पाहिजे. मंत्रपूर्वक यथाविधी पूजा झाली पाहिजे. काय, आपल्याला वेळ मिळत नाही म्हणजे काय? सोळा मंत्र आहेत. सोळा उपचार आहेत. सोळा मंत्र आणि सोळा उपचार करून पूजा समाप्त करता येते. पण तीन वर्षाच्या आचार्य महाराजांनी देवीची पूजा केलेली आहे. धूप, दीप, नैवेद्य झाला. निरांजन ओवाळून ठेवले आणि देवीसमोर दुधाची वाटी ठेवली. ''आईसाहेब! दूध घ्या.'' आई दूध कसं घेणार?

देवाला नैवेद्य आम्ही दाखिवला असे म्हणतो. देवही नैवेद्य पाहिला असे म्हणतो. इथे तसे नाहीये. ''दूध घ्या.'' म्हटल्यानंतर दूध देवीने घेतले पाहिजे. इतकी योग्यता आहे, तीन वर्षाच्या बालकाची. पाच मिनीटे झाली, दहा मिनीटे झाली. देवीने दूध घेतले नाही. आचार्य महाराज रडू लागले. ''काय आई! माझ्याकडून पूजा बरोबर झाली नाही, चूक झाली, म्हणून तू दूध घेत नाहीस काय?'' देवीचे अस्तित्व या ठिकाणी नाही ही कल्पनाच मनामध्ये नाहीये. देवी या ठिकाणी आहे. माझ्याकडून चूक झालीये म्हणून तू घेत नाहीस का? मी काय अज्ञानी आहे. पिताजी मोठे ज्ञानी आहेत. त्यांची पूजा योग्य झाली आहे. मला तशी करता येत नाही. मी माझ्या बुद्धीप्रमाणे केलं.

अशारितीने आचार्य महाराजांना अत्यंत दु:ख झाल्यावर जगदंबा प्रगट झाली आहे. जगदंबेने ती दुधाची वाटी घेतली आणि सगळं दूध पिऊन टाकले. हे पाहिले त्यांनी. आणि सगळं दूध पिऊन टाकल्यावर जास्तीच रडायला लागले. देवीने विचारले, ''तुझ्या इच्छेप्रमाणे दूध घेतल्यानंतर आता रडायचे काय कारण आहे बाबा?'' आचार्य महाराज सांगताहे, ''रोज पिताजी पूजा करून आल्यावर मला दुधाचा प्रसाद देतात. त्यावेळेला मला वाटायचे, माझी आई किती दयाळू आहे! मला भूक लागली आहे म्हणून माझ्याकरता काही दूध शिल्लक ठेवते, आणि पाठवून देते. सगळे दूध ती पीत नाही; अशी माझी समजूत होती. आणि आज

तुम्ही यातले सगळं दूध पिऊन टाकले ? काय खरं आहे की खोटं आहे ?'' शुद्ध बालबुद्धी आहे. अनुभव सांगितलेला आहे. तुमचे दूध रोज मिळाले. आज मिळाले नाही. तुम्ही घेतले पण मला शिल्लक का ठेवले नाही ?

मग देवीने आचार्यांना स्तनपान दिलेले आहे. आचार्य महाराजांनी सौदर्यलहरी या स्तोत्रात देवीच्या या वात्सल्याचे वर्णन केले आहे. ''जगन्माते ! हे दूध नसून दुधाच्या रुपाने हे ज्ञानच माझ्या शरीरात गेले आहे. जगातल्या मोठ्या मोठ्या त्रिकालज्ञ माहत्म्यांना मी मान्य ठरलो, याचे कारण हे आपण दिलेले दूध आहे.'' स्वत:ची कीर्ती, स्वत:चे ज्ञान, स्वत:ची बुद्धी, हे सर्वही भक्ताला भगवतीचे आहे असे वाटते. आपले नाही. याप्रमाणे लहानपणीच हा प्रसाद झाल्यामुळे अप्रतिम ग्रंथ त्यांनी निर्माण केले. त्या ग्रंथांची उपासना करणारे, चिंतन करणारे, उपासक ज्ञानसंपन्न होऊन जाताहेत. आचार्य महाराजांची त्यांच्यावर कृपा होते. मात्र तळमळ पाहिजे.

या पुण्यामध्येच पेशव्यांच्या काळात शाळीग्राम शास्त्री म्हणून होऊन गेले असे सांगतात. मोठे पंडित होते. त्यांच्यासमोर कोणीही वादविवादाला जात नसे. पण त्यांना तळमळ लागली होती, की आचार्य महाराजांचे भाष्य आपल्याला कोणाच्यातरी मुखातून ऐकायला मिळावे. आचार्य महाराजांचे थोडे तरी भाष्य आपल्या कानावर पडले पाहिजे. सर्व पंडितांच्याकडे गेले ते. पण त्या सर्वांनी सांगितले, ''तुम्ही एवढे ज्ञानी, तुम्हाला आम्ही काय सांगणार''

तळमळ लागलेली. कसे समजेल आपल्याला आचार्यांचे भाष्य ? अन्न नाही, पाणी नाही. एका मंदिरात गेले असता तिथे एक संन्यासी बसले होते. यांना पाहताच ते संन्यासी म्हणाले, ''या, या शास्त्रीबुवा ! तुम्हाला आचार्यांचे भाष्य ऐकायचंय का ? रोज सकाळी या. ''

शाळीग्राम शास्त्री दुसऱ्या दिवशी सकाळी आले. त्या संन्यासी महाराजांनी भाष्य सांगायला सुरुवात केली. ऐकणाऱ्याला वाटायचे, हा कोणी ब्रह्मलोक वगैरे कोणता लोक पाहूनच आलेला महात्मा असावा. त्यांनी आधीच सांगून ठेवले होते की त्यांना घरी भिक्षेला वगैरे यायचा आग्रह करायचा नाही. ते भिक्षेला येणार नाहीत. शाळीग्राम स्वत: उत्तम पंडीत होते. त्यांचा अभ्यास तयार होता. जिथे जिथे अडले होते, ते त्या संन्यासी महाराजांना विचारून घेतले. त्यांनीही उत्तमप्रकारे समजावून सांगितले. सगळे संशय दूर केले. आपल्याला योग्य व्यक्तींकडून आचार्यांचे भाष्य ऐकायला मिळाले, त्याने शास्त्रीबुवांचे चित्त शांत झाले. भाष्य निरूपण संपल्यावर त्यांनी प्रार्थना केली, ''महाराज ! आमच्या घरी आपण भिक्षेला आले पाहिजे.'' स्वामी महाराज म्हणाले, ''तुम्हाला अगोदरच सांगितले होते.

आम्हाला भिक्षेला वगैरे बोलावायचे नाही.'' ''चला पुढे. येतो आम्ही.'' असे स्वामी महाराज म्हणाले. शास्त्रीबुवा पुढे निघाले आणि काही मिनीटांनी स्वामी महाराज येताहेत की नाही पाहायला मागे वळून पाहतात तो काय, काही नाही. स्वामी महाराज गुप्त झाले होते. इकडे तिकडे शोध केला, पण ते सापडले नाहीत. शास्त्रीबुवांना फार वाईट वाटले.

शास्त्रीबुवांना इतके वाईट वाटले, की त्यांनी त्या दिवशी अन्नपाणी घेतले नाही. रात्री त्यांना संन्यासी स्वामी महाराजांनी दृष्टांत देऊन म्हटले, ''शास्त्रीबुवा! हा भलता आग्रह का धरता? तुम्हाला कोणी भाष्य सांगितले असे वाटते? भाष्य ज्यांनी लिहीले, त्यांनीच भाष्य सांगितले. हा आग्रह नको भिक्षेबिक्षेचा.''

म्हणजे तळमळ जर मनामध्ये उत्पन्न झाली, तर साक्षात्कार होऊ शकतो, इच्छा पूर्ण होऊ शकते.

देवीने सर्वांची इच्छा पूर्ण केली. प्रत्येक देवतांना आपले स्थान दिले. महिषासुर आणि इतर असुरांना त्यांच्या रसातलामध्ये जाऊन राहायची ताकीद केली आहे. त्यामुळे सगळे असुर रसातलाला निघून गेले. ईश्वरशक्ती ही मोठी आहे. म्हणून देवांनी प्रार्थना केली.

**कायेन वाचा मनसेंद्रियेवा।**
**बुद्ध्यात्मनावा प्रकृती स्वभावात्।।**
**करोमि यद्यत् सकलं परस्मै।**
**नारायणायति समर्पयामि।।**
**।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।**

Graphic Printers Borivali (W) : 9322 840 846 / 2899 92 39 / 2899 93 30